


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २७ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# राणांच्या हनुमान गढीसाठी १२१ कोटी, पण स्त्री रुग्णालयासाठी साडेनउ कोटीही मिळत नाहीत

**अमरावती/प्रतिनिधी - जिल्हा स्त्री रूग्णालयामध्ये सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी साडेनउ कोटी रुपयांचा निधी आवश्यक होता, तो दिला गेला नाही, मात्र, माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या हनुमान गढीसाठी १२१ कोटी देताना सरकारची तिजोरी खुली केली जाते, हेच महायुती सरकारचे बालकांवरील प्रेम आहे, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या आणि प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी केली आहे.**



**पोलीस अधिका-याचा खोटा अहवाल-** बुधवारी सायंकाळी सुषमा अंधारे यांच्यासह आमदार नितीन देशमुख, गजानन लवटे यांनी जिल्हाधिका-यांशी चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. सुषमा अंधारे म्हणाल्या, राणा दाम्पत्याच्या हनुमान गढीच्या दर्शनासाठी १ लाख लोक येतात, असा अहवाल एका पोलीस अधिका-याने दिला. हा खोटा अहवाल देणारा अधिकारी कोण आहे, याची आपण चौकशी करणार आहोत. बालकांच्या सुरक्षेसाठी सरकारजवळ निधी नाही आणि राणांच्या हनुमान गढीसाठी १२१ कोटी रुपये दिले जातात, हे चुकीचे आहे, असे त्या म्हणाल्या.

**अन्यथा आंदोलन करावे लागेल-** या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी

## सुषमा अंधारेंचा आरोप

सरकारने समिती स्थापन केली आहे. सात दिवसांत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे, या समितीच्या चौकशीच्या कक्षेत जिल्हा शल्य चिकित्सक आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनाही घ्यावे, अशी मागणी आपण केली आहे. समीतीचे अध्यक्ष संजय काटकर हे देखील तितकेच दोषी आहेत हे आम्ही त्यांना पटवून दिले आहे. सात दिवसांत दोषींवर कारवाई झाली नाही, तर आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

**व्हेंटिलेटर्स पुरवणा-या कंपनीची चौकशी व्हावी-** राज्यभरात हाफकिन इन्स्टिट्यूटच्या शिफारशींवरून शिलर कंपनीचे व्हेंटिलेटर्स पुरवण्यात येतात. हे व्हेंटिलेटर्स पुरविणा-या कंपनीचा नागपूरशी काय संबंध आहे, याचा शोध घ्यावा लागेल, असे अंधारे म्हणाल्या.

सरकारने या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी समितीला आठवडाभराचा अवधी दिला आहे, पण आम्ही अवघ्या चार तासांत चौकशी करून आमचा अहवाल आणि संबधित कागदपत्रे जिल्हाधिका-यांच्या सुपूर्द केली आहेत, अशी माहिती अंधारे यांनी दिली.

**राणांसाठी तिजोरीच्या किल्ल्या-** राज्याचे अर्थमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. अनेक प्रकल्पांसाठी निधी नाही, असे सांगितले जाते, पण राणा दाम्पत्याच्या प्रकल्पासाठी तिजोरीच्या किल्ल्या कशा काय सापडतात, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यासाठी तत्परता कशी दाखवतात, हे सर्व अनाकलनीय आहे. बालकांच्या आरोग्याशी सरकारने खेळू नये, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा सुषमा अंधारे यांनी दिला.



नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रकरण

## ‘ते तर गुडघ्याला बाशिंग बांधलेले भावी मुख्यमंत्री’



## अमरावती रूग्णालय दुर्घटनेवरून सुषमा अंधारेंची पालकमंत्री बावनकुळेंवर टीका

**अमरावती/प्रतिनिधी-** अमरावतीच्या जिल्हा स्त्री रूग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. अशाच प्रकारची घटना भंडारा येथे घडली होती, त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे लगेच त्या ठिकाणी पोहचले होते. त्या प्रकरणात तीन अधिका-यांना बडतर्फ करण्यात आले होते. पण, येथे मुख्यमंत्री सोडाच, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अजूनही फिरकलेले नाहीत, ते इतर पक्षांमध्ये तोडफोड करण्यात व्यस्त असावेत, अशी टीका शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या आणि प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी येथे केली.

सुषमा अंधारे यांच्यासह शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख, गजानन लवटे आणि इतर पदाधिका-यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांची भेट घेतली. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सुषमा अंधारे यांनी सरकारवर टीका केली. अंधारे म्हणाल्या, चंद्रशेखर बावनकुळे यांना मुख्यमंत्रीपदाचे डोहाळे लागले आहेत. गुडघ्याला बाशिंग बांधून असलेले भावी मुख्यमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अजूनही अमरावतीत पोहचलेले नाहीत. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आरोग्य विभागासाठी पुरेशी तरतूद करणे, आलेले प्रस्ताव मान्य करणे, हे अपेक्षित आहे, पण हे काम सोडून ते इतर पक्ष फोडण्यात गुंतलेले आहेत. जिल्हा स्त्री रुग्णालयाचे फायर ऑडिट झालेले नव्हते, हे स्पष्ट झाले आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांनी वेळोवेळी पत्र आणि स्मरणपत्र देउनही या कामात दिरंगाई झाली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी आपले काम व्यवस्थितपणे केले नाही. नवजात शिशू अतिदक्षता विभाग सुरक्षित नाही, दुर्घटना होउ शकते, हे ठाउक असतानाही बाळांना त्या ठिकाणी ठेवण्यात आले. हा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल का करण्यात येउ नये, अजूनही या प्रकरणात एफआयआर झालेला नाही, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

या प्रकरणात सरकारने चौकशी समिती स्थापन केली आहे. ही समिती अमरावतीत पोहचली असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आम्ही ही समिती कुठे आहे, याची चौकशी करीत आहोत. अजूनही समिती आम्हाला आढळून आलेली नाही. या दुर्घटनेसाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. त्याविषयीची कागदपत्रे आम्ही मागितली आहेत, ती मिळालेली नाहीत, असेही अंधारे यांनी सांगितले.

## दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अन्यथा ठिय्या आंदोलन

### विजय वडेट्टीवार यांचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधी-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागाला लागलेल्या आगीत तीन बालकांच्या मृत्यूची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी व्हायला हवी. सरकारने आठ दिवसांमध्ये संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अन्यथा आम्ही जिल्हाधिका-यांच्या कक्षात ठिय्या आंदोलन करू, असा इशारा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे.

**व्हेंटिलेटर फेकून द्या-** विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी जिल्हा स्त्री रुग्णालयाची पाहणी केली. त्यानंतर विश्रामगृहावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. विजय वडेट्टीवार म्हणाले, या दुर्घटनेला कोणते घटक जबाबदार आहेत, याची माहिती समोर आली पाहिजे. यात आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, व्हेंटिलेटर पुरवणारी कंपनी यांची चौकशी व्हायला हवी. या रुग्णालयात पुरविण्यात आलेले व्हेंटिलेटर हे चायना मेड असल्याची माहिती आहे. असे सुमारे १० हजारावर व्हेंटिलेटर्स राज्यभरात आहेत. याचीही तपासणी व्हावी. सरकारने रुग्णांच्या जीवाशी खेळणे थांबवावे, सदोष व्हेंटिलेटर्स काढून फेकून दिले पाहिजे. तत्काळ चांगल्या दर्जाचे व्हेंटिलेटर्स बसवायला हवेत, असे वडेट्टीवार म्हणाले.

**मृतांच्या कुटुंबीयांना २५ लाख रूपये द्या-** या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाख रुपये द्यावेत, अशी मागणी आपण केली



आहे. या रुग्णालयात अत्यंत अल्प पगारावर कंत्राटी कर्मचारी काम करतात. त्यांना केवळ दरमहा ८ हजार रुपये मिळतात. या पगारात उदरनिर्वाह करणे कठीण आहे. विशेष म्हणजे कंत्राटदार कंपनी प्रत्येक कर्मचा-यामागे सरकारकडून २० हजार रुपये घेते, उर्वरित रक्कम मंत्री आणि कंत्राटदार कंपनी वाटून घेत आहेत का, असा प्रश्न आहे. यासंदर्भात आपण मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र पाठवणार आहोत, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.

मुदत संपण्याआधी सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट झाले पाहिजे. सरकारने तत्काळ सुधारणा केल्या नाहीत, तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. सरकारला शुद्धीवर आणण्याचे काम आम्ही करू, असे वडेट्टीवार म्हणाले. सरकार अत्यंत निर्लज्जपणे वागत आहे. एवढी मोठी दुर्घटना घडूनही जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना रुग्णालयाला भेट देण्यास वेळ मिळत नाही. जिल्ह्यातील इतर लोकप्रतिनिधी दखल घेत नाहीत. जय श्रीराम म्हटले की आपण निवडून येतो, या भ्रमात ते आहेत, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. पत्रकार परिषदेला डॉ. सुनील देशमुख, वीरेंद्र जगताप उपस्थित होते.

## महापूर नेपाळमध्ये; बिहार, उत्तर प्रदेशचा सीमावर्ती भाग संकटात

### गंडकी नदीवरचे सर्व ३६ दरवाजे उघडले

**पटणा/वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये झालेल्या आकस्मिक ढगफुटी आणि हिमनदीचे सरोवर फुटल्यामुळे तिबेट आणि नेपाळच्या सीमावर्ती भागातील नद्यांना प्रचंड रौद्ररूप प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या बिहार राज्यात महापुराचा मोठा धोका निर्माण झाला असून, संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी वाल्मिकीनगर येथील गंडक बॅरेजचे सर्व ३६ दरवाजे तातडीने उघडण्यात आले आहेत.

पाण्याच्या पातळीत प्रचंड वाढ- तिबेटमध्ये सकाळी ९ च्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या पातळीत सुमारे ३ मीटरची प्रचंड वाढ झाली आहे. ही नदी पुढे त्रिशुली नदी खो-याला मिळते, जी थेट गंडक नदी प्रणालीचा मुख्य भाग आहे. त्यामुळे पुढील काही तासांत गंडक नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग आणि पातळी कमालीची वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.


**बिहारमध्ये हाय अलर्ट जारी-** नेपाळमधील भोटेकोशी नदीचे पाणी त्रिशूली नदीतून पुढे भारतातील गंडक आणि कोशी नद्यांमध्ये येत असल्याने बिहारमध्ये पुराचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेत बिहार सरकारने संपूर्ण राज्यात हाय अलर्ट जारी केला आहे. बिहारचे उपमुख्यमंत्री/कार्यकारी मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी तातडीने आपत्कालीन बैठक घेउन एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक स्वतः परिस्थितीवर २४ तास लक्ष ठेवून आहेत. आपत्कालीन यंत्रणा सतर्क करण्यात आल्या असून सीमावर्ती भागात NDRF व SDRF च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

## नेपाळमध्ये जलप्रलयाचा कहर

### १०० ठार, १ हजार बेपत्ता, १३३ भारतीयांचा समावेश

**काठमांडू/वृत्तसंस्था :** बुधवारी सकाळी ९ वाजता नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात प्रचंड विध्वंस झाला. सकाळी ९ वाजता, तिबेटमधील भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या अचानक आलेल्या लोंढ्याने या भागाला वेढले आणि अनेक भाग पाण्याखाली गेले. नेपाळ पोलिसांच्या माहितीनुसार, आतापर्यंत १०० लोकांचा मृत्यू झाला आहे. नेपाळ पर्यटन विभागाच्या माहितीनुसार, १३३ भारतीय आणि ३०० हून अधिक परदेशी पर्यटकांसह १,००० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.

**१३३ भारतीय पर्यटक बेपत्ता-** नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, पुरामुळे प्रभावित भागात एकूण ३८४ प्रवासी बेपत्ता किंवा संपर्काबाहेर असल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये २९१ विदेशी पर्यटक आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. विदेशी पर्यटकांमध्ये १३३ भारतीय नागरिक



असल्याची माहिती अधिका-यांनी दिली आहे. मात्र, बचावकार्य अद्याप सुरू असल्याने बेपत्ता व्यक्तींची संख्या आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे अंतिम आकडे बदलण्याची शक्यता आहे.

**तिबेटच्या दिशेने आलेल्या पुरामुळे हाहाकार-** बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढली. तिबेटच्या दिशेने आलेल्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे रसुवा जिल्ह्यातील टिमुरे आणि स्याफरु बेसी परिसरात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे वाहने, मालमत्ता, रस्ते आणि पूल वाहून गेले. काही नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. पुरामुळे अनेक रस्ते आणि दळणवळणाचे मार्ग बंद झाल्याने नेपाळ सरकारने हवाई बचावकार्याला प्राधान्य दिले आहे. नेपाळ लष्कराने १४ हेलिकाप्टर बचाव आणि मदतकार्यासाठी तैनात केल्याची माहिती दिली आहे. ➪(पान २ वर)

## नेपाळमध्ये अडकलेल्या वाशिम जिल्ह्यातील पर्यटकांनी आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा –पर्यटक व नातेवाईकांनी तातडीने माहिती द्यावी

**वाशिम :** नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी ➪(पान २ वर)




## २०० कोटींच्या जमीन घोटाळ्यात आणखी एक निलंबन; तहसीलदारावर वरदहस्त कायम

■ तलाठ्याचा नकारार्थी अहवाल असतांनाही महसुली प्रक्रिया पुढे कशी?

■ नायब तहसीलदारानंतर मंडळ निरीक्षक चतुर निलंबित।

(विशेष प्रतिनिधी)

**अमरावती :** सुमारे २०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या जमीन प्रकरणात महसूल विभागाच्या कारभारावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नायब तहसीलदार टीना चव्हाण यांच्या निलंबनानंतर आता मंडळ निरीक्षक चतुर यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत.या काळात त्यांचे मुख्यालय धारणी राहील व त्यांना तहसीलदारांच्या परवानगी विना बाहेर जाता येणार नाही. एकामागून एक कनिष्ठ अधिका-यांवर कारवाई होत असताना संपूर्ण प्रकरणाची प्रशासकीय जबाबदारी असणा-या तहसीलदार विजय लोखंडे यांच्यावर अद्यापही 'वरदहस्त' कायम आहे.या प्रकरणातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तलाठी श्रीमती स्मिता लोखंडे यांनी सुरु वातीपासूनच नकारार्थी अहवाल वरिष्ठ स्तरावर सादर केला होता. म्हणजेच जमिनीबाबतची वस्तुस्थिती महसूल यंत्रणेला ठाउक होती. असे असतानाही त्यानंतरची महसुली प्रक्रिया पुढे गेली कशी, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

चौकशीत तलाठी स्मिता लोखंडे यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्याचे आणि त्याआधारे सुधारित अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे तलाठ्याचा नकारार्थी अहवाल असताना कोणाच्या दबावाने व आर्थिक लाभाच्या आमिषाने या जमिनीची बेकायदेशीर सौदेबाजी करण्यात आली, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.या प्रकरणात यापूर्वीच नायब तहसीलदार टीना चव्हाण यांचे निलंबन करण्यात आले आहे. आता मंडळ निरीक्षक चतुर यांच्यावरही निलंबनाची कारवाई झाल्याने महसूल विभागातील संबंधित यंत्रणेतील दोन महत्त्वाचे दुवे कारवाईच्या कक्षेत आले आहेत.प्राथमिक चौकशीत मंडळ निरीक्षकाच्या सहाय्याने आणि नायब तहसीलदारांच्या माध्यमातून संबंधित महसुली प्रक्रिया पुढे गेल्याचे दिसून येत असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, दोन अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करूनच हे प्रकरण संपणार का, हा खरा सवाल आहे. २०० कोटींच्या बाजारमूल्याच्या जमिनीशी संबंधित प्रकरणात एखादा कनिष्ठ अधिकारी स्वतःच्या पातळीवर एवढी मोठी प्रक्रिया राबवू शकतो का? संबंधित फाईल कोणकोणत्या अधिका-यांच्या टेबलवरून गेली? कागदपत्रांची तपासणी कोणी केली? तलाठ्याचा अहवाल वरिष्ठांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यावर काय निर्णय झाला? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

### तलाठ्याने वस्तुस्थिती सांगितली; तरीही प्रक्रिया पुढे गेली!

**तलाठी स्मिता लोखंडे यांनी सुरु वातीपासून वस्तुस्थितीदर्शक अहवाल दिल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. असे असताना संबंधित जमीन प्रकरणाची महसुली प्रक्रिया पुढे कशी गेली, याचा छडा लागणे आवश्यक आहे. नायब तहसीलदार निलंबित झाले, मंडळ निरीक्षकही निलंबित झाले; मात्र या संपूर्ण प्रक्रियेतील वरिष्ठ जबाबदारी अद्याप स्पष्ट झालेली नाही.**

**तहसीलदारांच्या भूमिकेवर उठताहेत संशयाचे लोट** -संपूर्ण ➪(पान २ वर)

# ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे अर्जुन नगरवासी त्रस्त

## -डीपी रोडचे काम थंड बस्त्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** अर्जुन नगर परिसरातील डीपी रोडच्या संथ आणि निकृष्ट कामामुळे स्थानिक रहिवासी त्रस्त झाले आहेत.

संबंधित परप्रांतीय ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे रस्त्याचे काम गेल्या काही दिवसांपासून पार थंड बस्त्यात पडले असून, याचा नाहक त्रास परिसरातील नागरिकांना आणि वाहनधारकांना सहन करावा लागत आहे.

रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्याने परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच ठिकठिकाणी खोदून ठेवलेला रस्ता आणि खड्ड्यांमुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि वाहनधारकांना या रस्त्यावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. ठेकेदाराच्या या बेफिकीर वृत्तीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

काम सुरू असताना संबंधित विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परप्रांतीय ठेकेदार नियम व अटी धाब्यावर बसवून काम करत असतानाही पालिका प्रशासन गप्प का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या गंभीर समस्येकडे अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी तत्काळ लक्ष देऊन संबंधित कंत्राटदारावर कडक कारवाई करावी आणि बंद पडलेले काम युद्धपातळीवर पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी अर्जुन नगरवासीय करत आहेत.

### पावसामुळे साचले डबके;

डीपी रोडचे काम अर्ध्यावरच खोदून ठेवल्यामुळे आणि पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी कोणतीही निचरा यंत्रणा नसल्याने अर्जुन नगर परिसरात ठिकठिकाणी पाण्याचे मोठे डबके साचले आहेत. पावसामुळे रस्ता चिखलमय झाला असून खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे वाहनधारकांना रस्त्याचा अंदाज येत नाहीये.

# आरोग्य उपसंचालक कार्यालय अकोल्यावरून अमरावतीत आणा

## प्रहार संघटनेची आयुक्त डॉ. संजय काटकर यांच्याकडे मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोग्य आयुक्त डॉ. संजय काटकर यांच्या अमरावती दौऱ्यादरम्यान त्यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. आरोग्य उपसंचालक कार्यालय अकोल्यावरून कायमस्वरूपी अमरावती येथे स्थानांतरित करण्यात यावे, अशी आग्रही मागणी प्रहारच्या वतीने करण्यात आली. यावेळी प्रहारचे जिल्हा प्रमुख छोटू महाराज वसू, प्रदेश प्रवक्ते जितू दुधाने, महानगर प्रमुख बंटी रामटेके आणि हॉकर्स संघटनेचे गणेश मारोडकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात प्रहार संघटनेने नमूद केले आहे की, आरोग्य उपसंचालक कार्यालय अमरावती येथे आणल्यास या भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्यास मदत होईल. येथे आरोग्य सुविधा मजबूत असणे अत्यंत गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अकोला येथे असलेले हे विभागीय कार्यालय अमरावती येथे आणण्याची मागणी केली जात आहे.

डफरिन (जिल्हा महिला) रुग्णालयात सोमवारी पहाटे घडलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेची अधिकृत चौकशी करण्यासाठी आरोग्य आयुक्त डॉ. संजय काटकर अमरावतीत आले असता प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन हे निवेदन सुपूर्द केले.

# 'ऑपरेशन कवच' अंतर्गत २५३ पान टपऱ्यांवर पोलिसांची कारवाई

## -शाळा-कॉलेज परिसर नशामुक्त करण्याचे अभियान

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यात शाळा आणि महाविद्यालयांचे परिसर नशामुक्त व तंबाखूमुक्त करण्यासाठी 'ऑपरेशन कवच' हे विशेष अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटरच्या परिघात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या २५३ पान टपऱ्यांवर पोलिसांनी दंडात्मक व प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

जिल्ह्यातील सर्व ३१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत येणाऱ्या शाळा व कॉलेज परिसरातील पान टपऱ्यांची तपासणी करून ही कारवाई करण्यात आली. याशिवाय शाळा परिसरातील किराणा दुकानदारांनाही गुटखा, सिगारेट, तंबाखू व इतर अंमली पदार्थांची विक्री न करण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

**पोलीस प्रशासनाची सातत्याने देखरेख-** अमरावती ग्रामीण पोलीस दलाकडून ३१ ही पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून शाळा आणि महाविद्यालयीन परिसरावर सतत पाळत ठेवली जात आहे. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी या भागांना वारंवार भेटी देऊन तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीवर लक्ष ठेवून आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जात आहे.

**सहकार्य करण्याचे आवाहन-** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील नागरिक, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या अभियानात सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. शाळा किंवा कॉलेजच्या आसपास कोणीही तंबाखू, गुटखा, सिगारेट अथवा इतर नशा आणणाऱ्या पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

## १ व १० वरिल उर्वरित

### नेपाळमध्ये जलप्रलयाचा

यामध्ये ६ लष्करी आणि ८ खासगी हेलिकाप्टर असल्याचे रेडिओ नेपाळने म्हटले आहे. बचाव पथकांनी रसुवा आणि नुवाकोटमधील पूरग्रस्त भागातून आतापर्यंत किमान २५ जणांना सुरक्षित बाहेर काढले आहे. काही ठिकाणी हेलिक?प्टर उतरणे शक्य नसल्याने विशेष बचाव पद्धतींचा वापर करण्यात येत आहे.

**लष्करी वैद्यकीय पथकही तैनात-**पूरग्रस्त भागातील जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी नेपाळ लष्कराने वैद्यकीय पथके तैनात केली आहेत. २० तज्ज्ञ ड?क्टर, त्यात दोन सर्जनचा समावेश असून, त्यांना त्रिशूली परिसरात तैनात करण्यात आले आहे. रस्ते वाहतुकीवर परिणाम झाल्याने काही वैद्यकीय सुविधा पर्यायी ठिकाणी उभारण्यात आल्या आहेत. लष्कराचे एमआय-१७ हेलिक?प्टर वैद्यकीय पथकासह पूरग्रस्त भागाकडे रवाना करण्यात आले असून जखमींना आवश्यकतेनुसार हवाई मार्गाने उपचारासाठी हलवले जात आहे.

**पोलिस कर्मचारीही बेपत्ता-**पूराचा फटका सुरक्षा यंत्रणेलाही बसला आहे. रसुवा जिल्ह्यातील काही पोलिस ठाणी आणि सीमा भागातील सुरक्षा चौक्यांचे नुकसान झाले आहे. उपलब्ध माहितीनुसार २६ नेपाळ पोलीस कर्मचारी आणि ७ सशस्त्र पोलीस दलाचे जवान संपर्काबाहेर असल्याचे वृत्त आहे. टिमुरे, स्याफ्रुबेसी आणि रसुवागढी परिसरातील काही पोलिस सुविधा पुरामुळे बाधित झाल्या आहेत.

**जलविद्युत प्रकल्पांचे मोठे नुकसान-**पुरामुळे केवळ मानवी जीवितहानीच झाली नाही, तर नेपाळच्या पायाभूत सुविधांनाही मोठा फटका बसला आहे. जलविद्युत प्रकल्प, वीजवाहिन्या, पूल आणि रस्त्यांचे नुकसान झाले आहे. र?यटर्सच्या वृत्तानुसार, पुरामुळे नेपाळच्या सुमारे ४३० मेगावॅट जलविद्युत क्षमतेवर परिणाम झाला असून हे देशाच्या एकूण जलविद्युत क्षमतेच्या १२ टक्क्यांहून अधिक आहे.

**अनेक जिल्ह्यांना हाय अलर्ट-**पूराचा प्रवाह पुढे गेल्याने रसुवा, नुवाकोट, धादिंग, गोरखा आणि चितवन या भागातील नदीकाठच्या वस्त्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीकाठच्या आणि सखल भागातील नागरिकांना तातडीने सुरक्षित व उंच ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**पंतप्रधानांकडून आपत्कालीन बैठक-**नेपाळचे पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. नेपाळ लष्कर, सशस्त्र पोलीस दल आणि नेपाळ पोलिसांना बचाव व मदतकार्यात सहभागी करण्यात आले आहे. सरकारने वैद्यकीय पथके, रेड क्र?स आणि इतर आपत्कालीन यंत्रणांच्या समन्वयातून मदतकार्य वाढवण्यास सुरुवात केली आहे.

**भारतीय पर्यटकांच्या सुरक्षिततेकडे लक्ष-**१०५ भारतीय पर्यटक बेपत्ता असल्याच्या वृत्तामुळे भारतातही चिंता वाढली आहे. मात्र, हे सर्व पर्यटक मृत किंवा गंभीर संकटात असल्याचे मानण्याचे कारण नाही. सध्या अनेक भागांमध्ये मोबाईल नेटवर्क, रस्ते आणि इतर दळणवळण व्यवस्था विस्कळीत झाल्यामुळे अनेक जण संपर्काबाहेर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांच्या शोधासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सुरू असलेल्या बचावकार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**मृतांचा आणि बेपत्ता व्यक्तींचा आकडा वाढण्याची शक्यता-**पूरग्रस्त भागातील अनेक वस्त्यांशी संपर्क तुटलेला असल्याने नुकसानीचे संपूर्ण चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. बचाव पथके दुर्गम भागात पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे मृतांचा तसेच बेपत्ता व्यक्तींचा आकडा पुढील काही तासांत बदलण्याची शक्यता आहे. नेपाळमध्ये जून ते सप्टेंबरदरम्यान मान्सूनमुळे पूर आणि भूस्खलनाचा धोका असतो. मात्र, यावेळी भोटेकोशी नदीत अचानक आलेल्या प्रचंड पुरामुळे सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला आहे.

### नेपाळमध्ये अडकलेल्या वाशिम

तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण किंवा हॉटेल, प्रवासाचा तपशील तसेच कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

मोबाईल : ९०४९५८९६९३

वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती संकलित करून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत

### २०० कोटींच्या जमीन घोटाळ्यात

प्रकरण अमरावती तहसीलदार विजय लोखंडे यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली घडले असल्याने आता त्यांची भूमिका तपासण्याची मागणी जोर धरत आहे. त्यांच्या अधिनस्त असलेल्या नायब तहसीलदार टीना चव्हाण यांचे निलंबन झाले आहे. त्यानंतर मंडळ निरीक्षक चतुर यांच्यावरही निलंबनाची कारवाई झाली आहे.यामुळे विभागप्रमुख म्हणून तहसीलदारांची पर्यवेक्षणाची जबाबदारी नेमकी कुठे येते, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. अर्थात, तहसीलदार विजय लोखंडे यांना या प्रकरणात दोषी ठरविणे हा चौकशीचा विषय आहे. मात्र, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील दोन अधिका-यांवर कारवाई झाल्यानंतर तहसीलदार विजय लोखंडे यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचे टाळण्यास कोणाचा दबाव आहे, महसूल खात्यातील कोण त्यांचा 'गॉड फादर' आहे, हे शोधणे आवश्यक आहे.

**२०० कोटींचा प्रश्न; चौकशी मात्र कनिष्ठांपुरती?-**नायब तहसीलदार निलंबित, मंडळ निरीक्षक निलंबित. तलाठ्याने आधीच वस्तुस्थिती मांडल्याचे चौकशीत स्पष्ट. मग या कथित महसुली घोटाळ्याची जबाबदारी फक्त कनिष्ठ अधिका-यांपुरतीच मर्यादित आहे का? या प्रश्नाचे उत्तर देण्यास ना जिल्हाधिकारी तयार आहेत ना त्यांचे सहकारी.

**खरे लाभार्थी कोण?-**या संपूर्ण प्रकरणाचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे संबंधित जमीन व्यवहारातून नेमका फायदा कोणाला होणार होता, हा प्रश्न. महसूल विभागातील अधिका-यांवर कारवाई होणे हा एक भाग आहे; मात्र कथित गैरप्रकारामागे कोणाचा आर्थिक किंवा अन्य हितसंबंध होता का, हे समोर येणे अधिक महत्त्वाचे आहे. जमिनीचे बाजारमूल्य तब्बल २०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात असल्याने संबंधित जमीन, तिच्या मालकी हक्काच्या नोंदी, फेरफार, महसुली आदेश, नोंदणीपूर्व प्रक्रिया आणि त्यानंतर झालेल्या हालचालींची साखळी तपासली गेली पाहिजे. जर या प्रक्रियेत जाणीवपूर्वक नियमबाह्य पद्धतीचा वापर झाला असेल, तर केवळ विभागीय चौकशी करून प्रकरण मिटविण्याऐवजी संबंधित व्यक्ती आणि कथित लाभार्थ्यांपर्यंत तपास पोहोचणे आवश्यक आहे.

**फौजदारी कारवाई दाबण्याचा प्रयत्न-**या प्रकरणात महसुली नोंदींमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचे चौकशीतून पुढे येत असले तरी संपूर्ण प्रकरणाचा स्वतंत्र फौजदारी तपास करण्याचीही गरज आहे. कारण कथित गैरव्यवहारामागील आर्थिक व्यवहार, लाभार्थी आणि संभाव्य संगनमताचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र तपास आवश्यक ठरतो.त्यासाठी रिलायन्स कंपनीने पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवली.पण त्यावर संबंधिताविरुद्ध बडनेरा पोलिसात गुन्हा नोंदवून चौकशी करण्याऐवजी हे प्रकरण आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आले.या विभागात चौकशी केली असता संबंधित पोलीस अधिकारी रजेवर असल्याने ते आल्यावर माहिती मिळेल, असे सांगण्यात आले. याचा अर्थ, थंडया बस्त्यात टाकून हे प्रकरण दडपण्याचा व संशयित लाभधारकाना वाचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसते.पोलीस कारवाई कोणाच्या दबावाने थांबली आहे?

### अबब... श्वानांसाठी ९४ लाखांची

तपास, बॉम्ब शोध व नाशक कारवाई तसेच अमली पदार्थांच्या शोधात श्वान पथकाची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या देखभालीसाठी स्वतंत्र सुविधा असणे आवश्यक असल्याचा पोलिस दलाचा दावा आहे.

मात्र पाच श्वानांसाठी ९४ लाख रुपयांचा खर्च हा आकडा समोर आल्यानंतर या निधीच्या प्राधान्यक्रमावरही प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. पोलिस दलाला मनुष्यबळ, वाहने, अत्याधुनिक तपास यंत्रणा, पोलिसांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक साधनांची गरज असताना एवढ्या मोठ्या निधीतून श्वान पथकाची इमारत उभारण्याची आवश्यकता कितपत आहे, यावर चर्चा सुरू झाली आहे.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. पोलिस दलाचे आधुनिकीकरण आणि तपास यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

त्यामुळे आता या इमारतीची प्रत्यक्ष उभारणी झाल्यानंतर तिच्यावर होणारा खर्च आणि सुविधांची गुणवत्ता याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### दर्यापूर बाजार समितीतील कथित

कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनातून केली जाणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत बाजार समितीचे संचालक आशिफ खान यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे २७ ऑगस्टच्या आंदोलनाकडे दर्यापूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### दीक्षाभूमीच्या धर्तीवर सार्शीत

काढता पाय घेतल्याने ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले. यावेळी रात्री उशीरापर्यंत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयात ठिय्या मांडला होता.

ग्रामस्थांनी २६ जानेवारी रोजी अनुसूचित जाती वस्तीमध्ये दीक्षाभूमीच्या धर्तीवर प्रवेशद्वार उभारणीस मान्यता मिळण्यासाठी शेकडो सह्यांचा रीतसर अर्ज केला होता. परंतु तहकूब सभेचे कारण पुढे करत सदर अर्ज ऑगस्ट महिन्यापर्यंत प्रलंबित ठेवण्यात आला होता. अखेर २५ ऑगस्ट रोजीच्या विशेष सभेत प्रवेशद्वाराचा मुद्दा लावून धरल्याने ग्रामपंचायत प्रशासक व प्रशासकीय समितीने सभेतून काढता पाय घेतला. मात्र, एक प्रशासकीय सदस्य आंदोलकांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या. प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने वातावरण तापले आणि तात्काळ पोलीस बंदोबस्त पाचारण करण्यात आला.यावेळी चार वाजता वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी आंदोलनस्थळी धडक देत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले व मागण्या लावून धरल्या. अखेर तिवसा तहसीलदारांनी रात्री १० वाजता मध्यस्थी करत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

प्रशासनाच्या या आश्वासनानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले असले, तरी ३१ ऑगस्टच्या बैठकीत मार्ग न निघाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

सार्शी येथे बौद्ध वस्तीच्या प्रारंभी दीक्षाभूमीच्या धर्तीवर प्रवेशद्वार निर्माण करण्यासाठी ग्रामपंचायत कडे २६ जानेवारी रोजी अर्ज दिला असताना आजपर्यंत सुद्धा प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. प्रवेशद्वाराला अधिकृत मान्यता मिळेपर्यंत आम्ही आंदोलन करत राहू, प्रशासनाने आमचा अंत पाहू नये. **-उज्वला तेलमोरे,सार्शी.**

### इर्विन रुग्णालयाच्या नाल्याची सफाई

डॉ. मंगेश गोंदावले यांना फोनवरून चांगलेच खडेबोल सुनावले आणि तत्काळ कारवाईचे निर्देश दिले.

भाजपच्या या शिष्टमंडळात राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार प्रवीण तायडे, माजी महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शिष्टमंडळाने डफरिन रुग्णालयात पोहोचून दुर्घटनेची माहिती घेतली. यावेळी प्रभारी सिव्हिल सर्जन डॉ. विनोद पवार यांनी रुग्णालय परिसरातील समस्या मांडली. रेल्वे स्टेशनच्या मागे सुरू असलेल्या एका बांधकाम कार्यामुळे इर्विन रुग्णालयामागचा मुख्य नाला तुंबला असून, थोड्याशा पावसानेही मालवीय चौक, वालकट कंपाऊंड आणि डफरिन रुग्णालय परिसरात पाणी साचत असल्याचे त्यांनी सांगितले. मनपा प्रशासनाला वारंवार लेखी पत्र देऊनही यावर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हे ऐकताच खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांना फोन लावून तो स्पीकरवर ठेवला. फोनवर बोलताना मनपा आयुक्तांकडून स्पष्ट व समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आमदार प्रवीण पोटे यांचा संयम सुटला. त्यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत आयुक्तांना सुनावले की, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडून वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही कारवाई का झाली नाही? तुम्ही सर्वजण बसून गोट्या खेळत आहात का? रुग्णालय प्रशासन तक्रार करत आहे, तरीही दुर्लक्ष केले जात आहे, जनतेच्या या समस्येची जबाबदारी कोण घेणार?

रेल्वे स्टेशन परिसरात कोणत्याही खासगी संस्थेचे काम सुरू असले तरी त्याचा त्रास सामान्य नागरिकांना किंवा रुग्णालयांना होता कामा नये. मनपाचे अधिकारी हे शासकीय कर्मचारी आहेत आणि जनतेची सुविधा व सुरक्षा ही त्यांची पहिली जबाबदारी आहे. कोणत्याही खासगी बांधकामाला पाठीशी घालण्याऐवजी किंवा दबावात येण्याऐवजी नागरिक हिताला प्राधान्य द्यावे. नाला तुंबल्याने रुग्णालयात पाणी साचण्याचा धोका असल्यास पोकलँड आणून तत्काळ कारवाई करा, असे निर्देश आमदार पोटे यांनी दिले.

### रोख रकमेसह ४ लाख ५० हजारांची

सिमेंट रोडवर पडलेली होती. मात्र ती महिला तेथून निघून गेल्यावर अमरावती ते मोर्शीला येणाऱ्या एसटी वाहनाचे चालक देवेंद्र दुर्योधन देवळेघर रा. चैतन्य कॉलनी अमरावती, सुधीर कांतीलाल रोडे वाहतूक नियंत्रक परिवहन महामंडळ अमरावती, रूपाली प्रफुल्ल घाटोळ वाहतूक निरीक्षक राज्य परिवहन महामंडळ अमरावती,राजकुमार गंगाधर वाघमारे वाहतूक निरीक्षक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अमरावती यांना ती पर्स दिसली.त्यांनी क्षणाचाही विलंब न करता ती पर्स ताब्यात घेऊन मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांना दूरध्वनीवरून संपर्क करून राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना आम्हाला एक लेडीज पर्स मिळाली असून ती जमा करण्याकरिता पोलीस स्टेशनला येत असल्याची माहिती दिली.

ठाणेदार राहुल आठवले हे ईद-ए-मिलादच्या शोभायात्रा रॅलीत व्यस्त असतांना सुद्धा त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली व पंचासमक्ष ती पर्स उघडून बघितले असता त्यामध्ये नगदीसह सोन्याचे दागिने मिळून जवळपास चार लाख पन्नास हजाराचा मुद्देमाल दिसला.पर्समध्ये असलेल्या मोबाईल वरून महिलेचा फोननंबर मिळवून तिला पोलीस स्टेशनमध्ये बोलविण्यात आले. त्या ठिकाणी पोलीस उपविभागीय अधिकारी उमेश पाटील, ठाणेदार राहुल आठवले, महिला वैशाली तिडके यांच्या हस्ते वाहन चालकाचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सापडलेली पर्स सदर महिलेच्या स्वाधीन करण्यात आली.मोर्शी पोलिसांची सतर्कता व वाहन चालकाची सक्रियता यामुळेच सदर महिलेला चार लाख पन्नास हजाराच्या मुद्देमालाचे पर्स परत मिळाला. त्यामुळे पोलीस निरीक्षक राहुल आठवले व वाहन चालक देवेंद्र देवळेघर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सीएस व सार्वजनिक बांधकाम

का करण्यात आली नाही, असा सवाल आता उपस्थित होत आहे. काही दिवसांपूर्वीच जिल्हा सामान्य रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीनमध्ये पाणी भरल्याने ते १ महिना बंद पडले होते, तेव्हा PDMC कडून पर्यायी सेवा घेण्यात आली होती; मग महिला रुग्णालयात अशी तत्परता का दाखवली गेली नाही? तसेच पत्रव्यवहार होऊनही ऑडिट न करणे आणि बालकांना धोकादायक परिस्थितीत ठेवणे, यावरून निष्काळजीपणा स्पष्ट दिसत आहे. सीएस वर थेट कारवाईचा अधिकार आरोग्य मंत्रालयाकडे असून चौकशी अहवालानंतर यावर अंतिम निर्णय होईल.

### डफरिन आगीतील पीडित कुटुंबीय

जखमी बालके आणि स्वतःचा जीव धोक्यात घालून मदतकार्य करणाऱ्या डॉक्टर, नर्स व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची मदत धनादेशाद्वारे देण्यात आली.

या प्रसंगी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रवीण तायडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, मनपा गटनेते चेतन गावंडे, माजी नगरसेवक तुषार भारतीय, भाजप प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष नितीन गुडधे पाटील, शहर अध्यक्ष चेतन पवार, शिवसेना जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

भाजप प्रतिनिधीमंडळाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांची भेट घेऊन घटनेची सविस्तर माहिती घेतली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी रुग्णालयांचे फायर सेफ्टी आणि इलेक्ट्रिकल ऑडिट वेळेवर व्हावे, तसेच चौकशी अहवालानुसार दोषींवर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणीही नेत्यांनी केली.

### दर्यापूर तालुक्यातील जिल्हा

सांगितले जाते. मात्र शिक्षणाच्या मूलभूत गरजांपैकी एक असलेले शुद्ध पिण्याचे पाणी आणि पुरेसे शिक्षक उपलब्ध करून देण्यात प्रशासनाला कितपत यश आले आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

शाळेत दिवसभर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि शुद्ध पाणी मिळणे ही कोणतीही ऐच्छिक सुविधा नसून त्यांच्या आरोग्याशी संबंधित मूलभूत गरज आहे. त्यामुळे केवळ नळाला पाणी येते एवढ्यावर प्रशासनाने समाधान न मानता ते पाणी पिण्यायोग्य आहे की नाही, त्याची शुद्धता तपासली जाते का आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फिल्टर किंवा वॉटर कुलरची व्यवस्था आहे का, याची तपासणी करणे गरजेचे आहे.

'ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे' अशी घोषणा प्रत्येक स्तरावर केली जाते. मात्र घोषणा आणि प्रत्यक्ष सुविधा यामध्ये एवढी मोठी दरी असेल तर ग्रामीण विद्यार्थ्यांना समान संधी कशी मिळणार, हा प्रश्न पालकांकडून उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

कागदोपत्री पूर्तता न करता कृती करावी-

दर्यापूर तालुक्यातील सर्व १२६ जिल्हा परिषद शाळांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रत्येक शाळेतील पाणीपुरवठा, पाण्याची गुणवत्ता, वॉटर कुलर, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधांचा आढावा घेणे गरजेचे आहे. तसेच ४६ रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक देण्यापूर्वी त्यांच्या हातात सुरक्षित पाण्याचा ग्लास देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या घोषणा करण्यापेक्षा विद्यार्थ्यांना आवश्यक मूलभूत सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील पाणी आणि शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न प्रशासन गांभीर्याने कधी सोडवणार, याकडे आता पालकांसह संपूर्ण ग्रामिण भागाचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे याकरिता डी पी टी सी च्या आराखड्यानुसार स्थानिक पातळीवर ग्रामपंचायत कार्यालय सचिवाकडे स्थानिक मुख्याध्यापकांनी वॉटर कुलरची मागणी अर्जाद्वारे केली आहे. लवकरच विद्यार्थ्यांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार.

**-नंदकुमार जाधव,** गटशिक्षणाधिकारी -पंचायत समिती,दर्यापूर

### डफरिन आगीप्रकरणी आरोग्य

अनेक पदाधिकारी तीन तास तेथे ठाण मांडून होते. मात्र, आयुक्त न पोहोचल्याने संतप्त शिवसैनिकांनी सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

शिवसेना नेत्यांनी घोषणांच्या पाट्या हातात धरून निदर्शने केली. माध्यमांशी बोलताना सुषमा अंधारे यांनी आरोप केला की, सत्ताधाऱ्यांच्या चुकीमुळेच ही भीषण दुर्घटना घडली आहे. आता अधिकारी पाहणीसाठी येत असताना विरोधी पक्षाच्या नेत्यांना त्यांना भेटू दिले जात नाही, सरकार पोलिसांचा वापर करून विरोधकांचा आवाज दाबत आहे.

यादरम्यान प्रभारी सिव्हिल सर्जन डॉ. विनोद पवार यांनी आमदारांची भेट घेऊन प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे दोन पानांचे अल्टीमेटम व निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

शिवसेनेने निवेदनात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. व्हेंटिलेटर शिलर कंपनीचे ऑडिट मुदत संपल्यानंतरही २०२२ मध्ये अशी दुर्घटना घडूनही त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट का दिले गेले? संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. रुग्णालयात कायमस्वरूपी इलेक्ट्रिकल इंजिनिअरची नियुक्ती करण्यात यावी. व्हेंटिलेटर कधी खरेदी केले, त्यांच्या मेंटेनन्सचा काय रेकॉर्ड आहे आणि NICU मधील ऑक्सिजन समृद्ध वातावरणात उपकरणांची सुरक्षा तपासणी नियमित होते का, याची माहिती स्पष्ट करावी.

सोमवारी पहाटे लागलेल्या आगीत जीव गमावलेल्या बालकांच्या पालकांना न्याय मिळावा, अशी आक्रमक मागणी शिवसेना उबाठाच्या वतीने करण्यात आली आहे

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## जय गजानन कृषी बाजाराचा परवाना रद्द; शेतमालाच्या खरेदी-विक्रीवर बंदी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम- हिंगोली महामार्गावरील पंचाळा परिसरातील जय गजानन खाजगी कृषी बाजाराचा परवाना महाराष्ट्र राज्याचे पणन संचालक शरद जरे यांनी २५ ऑगस्ट रोजी रद्द केला आहे. परवाना अटींचे उल्लंघन, बाजारातील व्यवहारांबाबतच्या तक्रारी, वजनकाट्यात आढळलेली तफावत, किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन व इतर शेतमालाची खरेदी तसेच आवश्यक वैधानिक अहवाल व शुल्काबाबतच्या त्रुटींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली असल्याचे पणन संचालकांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

वाशीम तालुक्यातील हिवरा रोहिला येथील अभिषेक प्रदीपराव देशमुख यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये या खाजगी बाजाराविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशीम यांनी चौकशी करून संबंधित कागदपत्रे, व्यवहार नोंदी व बाजार



व्यवस्थापनाचे म्हणणे तपासले. चौकशीदरम्यान ६० टन क्षमतेच्या प्लेट काट्यामध्ये कायदेशीर मर्यादेपेक्षा अधिक वजनाची तफावत आढळल्याची नोंद करण्यात आली. तसेच सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनची खरेदी शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने झाल्याचेही चौकशीत निदर्शनास आले. याशिवाय बाजाराच्या कामकाजाशी संबंधित काही वैधानिक अहवाल उपलब्ध करून न देणे, देखरेख शुल्क भरण्यास विलंब, शेतकऱ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा, बाजारभावाची माहिती, ऑनलाइन व्यवहार व इतर परवाना अटींच्या पालनाबाबतही त्रुटी आढळल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे. बाजारातील संबंधित व्यक्तींचा कृषी उत्पन्न बाजार समितीशी असलेला संबंध आणि त्यातून निर्माण होणाऱ्या स्पर्धात्मक वातावरणाबाबतही चौकशी करण्यात आली. या सर्व बाबींचा विचार करून पणन संचालकांनी जय गजानन खाजगी कृषी बाजाराचा परवाना रद्द करण्याचा निर्णय घेतला.

### चौकशीत काय आढळले?

**६० टनाच्या वजनकाट्यात तफावत :** वैधमापनशास्त्र विभागाच्या तपासणीत वजनकाट्यात कायदेशीर मर्यादेपेक्षा अधिक तफावत आढळली.

**MSP पेक्षा कमी दराने सोयाबीन :** सन २०२३-२४ मध्ये किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन खरेदी झाल्याची नोंद.

**वैधानिक अहवालात त्रुटी :** आवश्यक काही वार्षिक व मासिक अहवाल सादर न केल्याचे चौकशीत समोर आले.

**देखरेख शुल्काला विलंब :** बाजाराकडून देखरेख शुल्क भरण्यात विलंब झाल्याचे निदर्शनास आले.

**परवाना रद्द :** या सर्व बाबींचा विचार करून पणन संचालकांनी खाजगी बाजाराचा परवाना रद्द केला आहे.

## सिंचन विहिरींच्या अनुदानासाठी शेतक-यांचे अर्धनग्न आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मनरेगा अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करूनही अनुदानाची रक्कम गेल्या दोन वर्षांपासून मिळाली नसल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात अर्धनग्न आंदोलन केले.

वाशिम जिल्ह्यातील तब्बल ८ हजार ४९३ शेतकऱ्यांचे सिंचन विहिरींचे अनुदान दोन वर्षांपासून रखडले असल्याचा आरोप आंदोलक शेतकऱ्यांनी केला. मनरेगा अंतर्गत विहिरी मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शासनाच्या निकषानुसार विहिरींचे बांधकाम पूर्ण केले. मात्र बांधकाम पूर्ण होऊनही संबंधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून, शासनाने तातडीने प्रलंबित अनुदान वितरित करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात एकत्र येत अर्धनग्न आंदोलन केले. यावेळी शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत रखडलेले अनुदान तातडीने देण्याची मागणी केली. आंदोलनानंतर शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. जिल्ह्यातील प्रलंबित सिंचन विहिरींच्या अनुदानाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



### निधी मिळताच अनुदान जमा करण्याचे आश्वासन

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या व्हीबी-जी राम जी योजनेच्या गटविकास अधिकारी किरण सांगळे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम तात्काळ जमा केली जाईल, असे आश्वासन दिले.

## राजुरा येथे बोअरवेलमधून अचानक गरम पाणी; गावकऱ्यांमध्ये खळबळ



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील राजुरा येथे शिवनाथ गोरे यांच्या राहत्या घरातील तब्बल १२ वर्षे जुनी बोअरवेल गेल्या २० ते २५ दिवसांपासून अचानक गरम पाणी देत असल्याने परिसरात मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे

या बोअरवेलमधून निघणारे पाणी इतके गरम आहे की त्याचा आंघोळीसाठी वापर करता येईल अशी परिस्थिती आहे विशेष म्हणजे गेल्या बारा वर्षांपासून ही बोअरवेल नियमित सुरू असून आतापर्यंत सामान्य तापमानाचे पाणी मिळत होते गेल्या काही दिवसांपासून गरम पाणी येऊ लागल्याने गावकऱ्यांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे

या घटनेची माहिती मिळताच आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन बोअरवेलच्या पाण्याचे नमुने घेतले असून त्याची प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे प्राथमिक माहितीनुसार हे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे सांगण्यात आले पाण्यामध्ये काही रासायनिक घटकांचे प्रमाण वाढल्याची माहिती समोर आली आहे.

**जमिनीखालील हालचालींमुळे गरम पाणी?**

बारा वर्षांपासून सुरू असलेल्या बोअरवेलमधून अचानक गरम पाणी का येऊ लागले याबाबत विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत जमिनीखालील भूगर्भीय हालचाली भूजलाच्या प्रवाहातील बदल किंवा जमिनीखालील उष्ण भागाशी पाण्याचा संपर्क यापैकी नेमके कारण काय आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे.

## राज्य महोत्सव गणेशोत्सवासाठी सर्व विभागांचा सहभाग आवश्यक- सांस्कृतिक कार्य मंत्री

### राज्यभर विविध उपक्रम राबविण्यासाठी शासन निर्णय जारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

गणेशोत्सव हा राज्याचा 'राज्य महोत्सव' म्हणून अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालये, आस्थापना आणि महामंडळांच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक व जनजागृतीपर उपक्रम राबवावेत, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. गणेशोत्सवामध्ये गावापासून शहरापर्यंत व्यापक सहभाग वाढविण्यासोबतच या उत्सवाला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळवून देण्याच्या दृष्टीनेही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

राज्यातील ४८० उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर सुमारे दीड कोटी रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे आयोजित करण्यात येईल. तालुका व जिल्हास्तरीय



द्वितीय आणि तृतीय विजेत्यांसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत समारंभ आयोजित केले जातील. गणेशोत्सवानिमित्त राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांसह महाराष्ट्राबाहेरील १० राज्ये आणि भारताबाहेरील एका देशात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. नवी दिल्ली येथे पाच दिवस, तर मुंबईत आठ दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. स्थानिक संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यात येईल.

प्रमुख गणेश मंदिरे व सार्वजनिक गणेशोत्सवांचे ऑनलाइन दर्शन उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. घरगुती गणेशोत्सवाची छायाचित्रे अपलोड करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मही तयार केला जाईल. गणेशोत्सवाचा इतिहास, परंपरा, अष्टविनायक, पर्यावरणपूरक उत्सव आणि शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांतून व्यापकपणे प्रसारित केली जाणार आहे. 'राज्य महोत्सव'चा लोगो शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव यांच्या माध्यमातून गणपतीविषयक रील्स स्पर्धा महसूल विभागीय आणि राज्यस्तरावर घेण्यात येणार आहे.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवावर विशेष भर

शाडू मातीच्या मूर्ती, बीज गणपती, निर्माल्य संकलन व पुनर्वापर, प्लास्टिकमुक्त उत्सव, एलईडी सजावट आणि सौरऊर्जेवरील मंडप याबाबत राज्यभर जनजागृती करण्यात येणार आहे. ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतींच्या माध्यमातून स्वच्छता, वृक्षारोपण आणि कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्याचे उपक्रम राबविण्यात येतील. जलस्त्रोतांना बाधा होणार नाही, याची दक्षता घेत जलसंवर्धनाबाबतही जनजागृती केली जाणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या सहभागातून दुर्वा, फुले, नैवेद्य साहित्य व सेंद्रिय कृषी उत्पादनांची माहिती प्रसारित केली जाईल. महिला बचतगट व सहकारी संस्थांना मोदक, प्रसाद साहित्य व स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी प्रोत्साहन देण्यात येईल. गणेशमूर्ती, मखर, सजावट व पूजासाहित्य तयार करणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसह कारागिरांसाठीही प्रोत्साहनपर उपक्रम राबविले जातील.

## नसीसी कॅडेट्सची चमकदार कामगिरी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेद्वारा संचलित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथील एनसीसीच्या १८ कॅडेट्सनी ऐंऊण-११२ शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. शिबिरात कॅडेट्सनी विविध लष्करी प्रशिक्षण, शारीरिक कवायती व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत कॅडेट्सनी दोन सुवर्ण व तीन रौप्य अशी एकूण पाच पदके पटकावली. यामध्ये गोपाल खोरणे यांनी एक सुवर्ण व एक रौप्य पदक, रुशभ गवारगुरू यांनी एक सुवर्ण पदक, तर विष्णु जाधव व गणेश इंगळे यांनी प्रत्येकी एक रौप्य पदक मिळविले. शिबिरादरम्यान कॅडेट्सवर विविध जबाबदाऱ्याही सोपविण्यात आल्या.

## चांदईतील दोन तरुण विवाहितांचा वेगवेगळ्या घटनांत मृत्यू

### विवाहितेची आत्महत्या, अन्य घटनेत वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ प्रतिनिधी | कारंजा ■

तालुक्यातील चांदई गावातील दोन रहिवाशांचा एकाच दिवशी वेगवेगळ्या घटनांमध्ये मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. यातील एका घटनेत ३० वर्षीय विवाहितेने कारंजा शहरातील एम. बी. आश्रम शाळेजवळील परिसरात आत्महत्या केली, तर दुसऱ्या घटनेत चांदई येथील सुमारे २९ वर्षीय तरुणाचा समृद्धी महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. दोन्ही मृत व्यक्ती एकाच गावातील रहिवासी असले तरी या घटनांचा परस्पर संबंध नसल्याचे कारंजा शहर पोलिसांनी प्राथमिक तपासानंतर स्पष्ट केले आहे.

घरगुती छळाच्या आरोपातून विवाहितेची आत्महत्या

कारंजा शहर पोलिस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, चांदई येथील शीतल मंगेश पिसे (वय ३०) हिने कारंजा शहरातील एम. बी. आश्रम शाळेजवळील परिसरात आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणात तिच्या पतीसह सासू-सासऱ्यांविरुद्ध गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, शीतल पिसे हिला तिचा पती मंगेश विश्वासराव पिसे, सासू देवकाबाई विश्वासराव पिसे आणि सासरे विश्वासराव पिसे हे शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याचा आरोप आहे. माहेरहून पैशांची मागणी करून मारहाण करणे, शिवीगाळ करणे, चारित्र्यावर संशय घेणे तसेच खोलीत कोंडून ठेवणे, अशा प्रकारचा त्रास दिला जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, सासूकडून जातिवाचक व अपमानास्पद शब्दांचा वापर करून शिवीगाळ केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या कथित शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून शीतल पिसे हिने आत्महत्या केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी कारंजा शहर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इम्रान पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत आरोपींना अटक झाल्याची नोंद पोलिस कागदपत्रांत नसल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

## PIB कडून आयोजित अभ्यास दौऱ्यानंतर पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिला इति-वृत्तांत



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पत्र सूचना कार्यालय (PIB), मुंबईच्या वतीने राज्यातील ४ आकांक्षित जिल्ह्यातील १२ पत्रकारांसाठी आयोजित मुंबई-दिल्ली अभ्यास दौऱ्यासाठी वाशिम जिल्ह्यातून तीन पत्रकारांची निवड करण्यात आली होती. यामध्ये पत्रकार सुनील कांबळे, प्रमोद लक्रस आणि दत्ता महाले यांचा समावेश होता.

या दौऱ्याची तयारी करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील विविध प्रश्न, विकासाचे मुद्दे आणि विशेषतः कृषी विषयक समस्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी ङजिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहङ यांनी या तिन्ही पत्रकारांना मोलाचे सहकार्य केले. जिल्ह्याची अद्ययावत आकडेवारी आणि माहिती उपलब्ध करून दिली.

## स्मार्ट मीटरच्या वाढीव वीजबिलांविरोधात संतोष सरकटे आक्रमक

### वाढीव बिलांची चौकशी करून रीडिंगप्रमाणे बिल देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वाशिम जिल्ह्यात स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या तसेच इतर वीज ग्राहकांना जून महिन्यात दोन ते तीन पटीने वाढीव वीजबिले देण्यात आल्याचा आरोप करीत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संपर्कप्रमुख संतोषराव नारायणराव सरकटे यांनी पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. वाढीव वीजबिलांची तातडीने चौकशी करून ग्राहकांना प्रत्यक्ष मीटर रीडिंगप्रमाणे वीजबिले देण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

जून महिन्यात स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या अनेक ग्राहकांना नेहमीपेक्षा दोन ते तीन पट अधिक वीजबिले देण्यात आली आहेत. या प्रकारामुळे ग्राहकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली असून, सुमारे ४० ते ४२ हजार ग्राहकांच्या वाढीव बिलाबाबत तक्रारी असल्याचा दावा संतोष सरकटे यांनी केला आहे. बिलामध्ये दुरुस्ती सुरू असल्याचे सांगितले जात असतानाही ग्राहकांना संपूर्ण बिल भरण्याचा आग्रह केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. बिलाची रक्कम न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जात असल्याने ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्येक ग्राहकाच्या घरी जाऊन वाढीव वीजबिलांबाबत सर्वेक्षण करावे आणि महावितरणने प्रत्यक्ष मीटर रीडिंगनुसारच बिल आकारावे, अशी मागणी सरकटे यांनी केली आहे.

## नि:शुल्क पिरॅमिड ध्यान शिबिराला सुरुवात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथे नुकतेच उद्घाटन झालेल्या पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्समधील निःशुल्क ध्यान केंद्रात उद्यापासून दररोज सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत निःशुल्क पिरॅमिड ध्यान वर्ग आयोजित करण्यात येणार आहे. हे ध्यान केंद्र सर्वांसाठी खुले असून महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थी अशा सर्व वयोगटातील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेता येणार आहे.

पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटचे जनक ब्रह्मर्षी पत्रीजी यांनी अनापानसती ध्यानाला पिरॅमिड ऊर्जेशी जोडले. पत्रीजी स्वतः आध्यात्मिक विज्ञानाचे अभ्यासक होते. ते नेहमी सांगत की, 'कोणतीही गोष्ट डोळे बंद करून स्वीकारू नका; स्वतः अनुभव घ्या आणि विज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहा.' पिरॅमिड ही एक पवित्र भूमितीय रचना असून, पिरॅमिडमध्ये ध्यान केल्याने वैश्विक ऊर्जेचा अनुभव अधिक प्रभावीपणे घेता येतो, असे पिरॅमिड ध्यान पद्धतीत मानले जाते. त्यामुळे ध्यानात एकाग्रता वाढण्यास, मन शांत होण्यास आणि ध्यानाचा अनुभव अधिक सखोल होण्यास मदत होते.

शारीरिक स्तरावर : शरीरातील ताण-तणाव कमी होण्यास, झोप सुधारण्यास, ऊर्जा व ताजेपणा वाढण्यास मदत होते. मानसिक स्तरावर : मन शांत राहते, एकाग्रता व स्मरणशक्ती सुधारण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना अभ्यासातील लक्ष केंद्रीत करण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. भावनिक स्तरावर : राग, चिंता, भीती, अस्वस्थता यांसारख्या भावनांकडे अधिक शांतपणे पाहण्याची क्षमता विकसित होते. भावनिक संतुलन व सकारात्मकता वाढण्यास मदत होते.

## सोयाबीन प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीतून आधुनिक शेतीतंत्राचा प्रसार

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशीम यांच्या वतीने राष्ट्रीय खाद्यतेलबिया अभियान तसेच भारतीय कृषी तंत्रज्ञान अनुसंधान प्रसार संस्थान, पुणे यांच्या सौजन्याने राबविण्यात येत असलेल्या तेलबिया प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत सोयाबीन पिक प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन मौजे जामखेड, ता. मालेगाव, जि. वाशीम येथे मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे कृषीविद्या तज्ञ तुषार देशमुख, गृहविज्ञानशास्त्र तज्ञ शुभांगी वाटाणे, इझ्ध संचालक संदीप पोफळे तसेच ग्रामपंचायत सदस्या लक्ष्मी मगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तुषार देशमुख यांनी सोयाबीनच्या सुधारित उत्पादन तंत्रज्ञानातील प्रमुख बाबी, प्रमाणित व गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा वापर, वेळेवर बियाणे बदल, संतुलित निविष्ठा व्यवस्थापन, उत्पादन खर्चाचे शास्त्रीय पद्धतीने लेखांकन तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोयाबीन उत्पादनातील अनावश्यक खर्च कमी करून निविष्ठांचा कार्यक्षम व शिफारशीनुसार वापर केल्यास उत्पादनक्षमता आणि निव्वळ आर्थिक परतावा वाढविता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले. गृहविज्ञानशास्त्र तज्ञ शुभांगी वाटाणे यांनी सोयाबीन प्रक्रिया, मूल्यवर्धन व उपपदार्थ निर्मिती याबाबत मार्गदर्शन करून शेतकरी व महिला बचत गटांसाठी सोयाबीन आधारित प्रक्रिया उद्योगांच्या संधी स्पष्ट केल्या.

प्रमुख पाहुण्या लक्ष्मी मगडे यांनी शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन शास्त्रीय पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब, उत्पादन खर्चाचे नियोजन आणि स्थानिक पातळीवर उत्पादन व आर्थिक मूल्यवर्धन करण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले.

यानंतर प्रयोगशील शेतकरी संदीप पोफळे यांच्या सोयाबीन प्रात्यक्षिक प्रक्षेत्राची पाहणी करण्यात आली. प्रक्षेत्र भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकातील विविध तांत्रिक बाबी, कीड-रोग व्यवस्थापन, निविष्ठांचा वापर आणि उत्पादनवाढीच्या उपाययोजनांबाबत विचारलेल्या शंकांचे कृषी तज्ज्ञांनी प्रत्यक्ष प्रक्षेत्राच्या आधारे निरसन केले.

प्रयोगशील शेतकरी संदीप पोफळे यांनी प्रात्यक्षिकातून योग्य उत्पादन तंत्रज्ञान, निविष्ठांचा शास्त्रीय वापर आणि पीक व्यवस्थापनाबाबत उपयुक्त माहिती मिळाल्याचे सांगून कृषी विज्ञान केंद्र, वाशीमचे आभार मानले.

कार्यक्रमास जामखेड व परिसरातील शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीच्या माध्यमातून शास्त्रीय सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतपातळीवर प्रसार होण्यास मदत झाली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७० ■ गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


# अमरावतीनंतर वर्ध्याची आरोग्य यंत्रणा 'व्हेंटिलेटर'वर

## एसएनसीयूत एकच यंत्र; गंभीर नवजातांना 'रेफर आऊट'चा आधार

### मनुष्यबळा अभावी अत्याधुनिक उपचार व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**वर्धा जनमाध्यम :** अमरावती येथील स्त्री रुग्णालयात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण आरोग्य यंत्रणा हादरली आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयातील नवजात बालकांच्या उपचारासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विशेष नवजात शिशू उपचार कक्षाची अर्थात एसएनसीयूची स्थितीही समोर आली आहे. या विभागात गंभीर बालकांसाठी केवळ एकच व्हेंटिलेटर कार्यरत असल्याची माहिती आहे. त्यातही हे यंत्र हाताळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ अपुरे असल्याने गंभीर बालकांना सेवाग्राम आणि सावंगी (मेघे) येथील वैद्यकीय महाविद्यालयांकडे रेफर करण्याची वेळ येत आहे.

गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाची आरोग्यसेवा मोठा आधार ठरते. नवजात बालकांची प्रकृती गंभीर झाल्यास एसएनसीयू विभागात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार केले जातात. मात्र, गंभीर परिस्थितीत उपचारांची क्षमता मर्यादित असल्यास रुग्णांना पुढील उपचारांसाठी रेफर केले जाते. त्यामुळे जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयू अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

**एक व्हेंटिलेटर, तेही पुरेशा मनुष्यबळाविना-** अमरावतीच्या घटनेनंतर वर्धा जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयूची माहिती घेतली असता येथे 'विस्टा' कंपनीचे एकच व्हेंटिलेटर कार्यरत असल्याचे समोर आले. गंभीर नवजात बालकांसाठी व्हेंटिलेटरची आवश्यकता असताना उपलब्ध यंत्रणेच्या तुलनेत मनुष्यबळाचा अभाव ही मोठी अडचण असल्याचे सांगण्यात येते.




यामुळे उपलब्ध साधनसामग्रीचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यावरही मर्यादा येत असल्याचे चित्र आहे.

**जिल्ह्यात आरोग्य संस्थांचे मोठे जाळे, पण तज्ज्ञांची वानवा-** वर्धा जिल्ह्यात एक जिल्हा सामान्य रुग्णालय, दोन उपजिल्हा रुग्णालये, आठ ग्रामीण रुग्णालये आणि ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. या संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय आरोग्य सेवा पुरविली जाते. मात्र, अनेक ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने उपचार व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. गंभीर रुग्णांना पुढील उपचारांसाठी मोठ्या वैद्यकीय केंद्रांकडे पाठवावे लागत असल्याने गरीब रुग्णांच्या अडचणी वाढतात.

**रेफर आऊट ला पर्याय कधी मिळणार**

नवजात बालकांच्या उपचारात वेळ अत्यंत महत्त्वाची असते. गंभीर बालकाला तातडीने अत्याधुनिक उपचार मिळणे आवश्यक असते. अशा वेळी जिल्हा रुग्णालयातच आवश्यक सुविधा, उपकरणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असेल तर रुग्णांच्या हालचालीचा धोका कमी होऊ शकतो. त्यामुळे एसएनसीयू विभागात आवश्यक त्या प्रमाणात व्हेंटिलेटर, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. नुकतेच जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून रुजू झालेले डॉ. राजसिंग पवार हे स्वतः बालरोग तज्ज्ञ आहेत. त्यामुळे नवजात बालकांसाठी अत्यंत संवेदनशील असलेल्या एसएनसीयू विभागाकडे ते विशेष लक्ष देतील आणि हा विभाग अधिक सक्षम करण्यासाठी ठोस पावले उचलतील, अशी अपेक्षा वर्धेकर व्यक्त करीत आहेत.

**शासकीय रुग्णालयांत 'शिल्लर'चे व्हेंटिलेटर नाही-** जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सुमारे ५० व्हेंटिलेटर असल्याची माहिती आरोग्य यंत्रणेतील सूत्रांनी दिली. यापैकी काही व्हेंटिलेटर सुस्थितीत असून वापरात आहेत, तर काही अडगळीत पडल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे अमरावतीतील घटनेशी संबंधित शिल्लर कंपनीच्या व्हेंटिलेटरचा जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये समावेश नसल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले.

अमरावती येथील स्त्री रुग्णालयात २४ ऑगस्ट रोजी 'शिल्लर' कंपनीच्या व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्याने तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील व्हेंटिलेटर आणि नवजात बालकांच्या उपचार व्यवस्थेची सुरक्षितता पुन्हा ऐरणीवर आली आहे. वर्ध्यातील एसएनसीयूची क्षमता वाढविण्यासोबतच उपलब्ध उपकरणांची नियमित तपासणी, देखभाल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता याकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# मेल्यानंतरही सुटका नाही, बोरगावात मृतदेहालाही रस्त्यासाठी संघर्ष

## स्मशानभूमीच्या वाटेवर मृतदेह रोखला; शेतकऱ्याचा विरोध, पोलिसांच्या मध्यस्थीनंतर अंत्ययात्रेला मार्ग

**सेलू जनमाध्यम :** जिवंतपणी रस्त्याची प्रतीक्षा, मृत्यूनंतरही संघर्षाचीच वाट बोरगावचा हा 'वनवास' आता तरी संपणार का

स्वातंत्र्याला ७८ वर्षे उलटली, विकासाच्या गप्पा रंगल्या; मात्र सेलू तालुक्यातील बोरगाव (हेलोडी)च्या नशिबी आजही रस्त्याचा वनवास कायम आहे. जिवंतपणी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करणाऱ्या ग्रामस्थांना आता मृत्यूनंतरच्या प्रवासासाठीही संघर्ष करावा लागत असल्याचे बुधवारी संतापजनक चित्र समोर आले. स्मशानभूमीकडे जाण्यासाठी हक्काचा रस्ता नसल्याने ३५ वर्षीय विजय अशोक धुर्वे यांच्या अंत्ययात्रेलाच शेतशिवारात अडथळा निर्माण झाला. अखेर पोलिसांच्या मध्यस्थीनंतर तात्पुरता मार्ग मोकळा करण्यात आला.

बोरगाव येथे बुधवारी विजय धुर्वे यांचे निधन झाले. अंत्यसंस्कारासाठी ग्रामस्थ मृतदेह खांद्यावर घेऊन शेतालगतच्या पायवाटेने स्मशानभूमीकडे निघाले. मात्र शेतमालक वसंता दांडेकर यांनी या मार्गावरून जाण्यास मज्जाव केला. पिकांचे नुकसान होत असल्याचे कारण त्यांनी सांगितले. त्यामुळे अंत्ययात्रा मध्येच थांबवून मृतदेह खाली ठेवण्याची वेळ ग्रामस्थांवर आली.



या प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामसेवकांना माहिती देऊनही ते घटनास्थळी आले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. परिस्थिती गंभीर होत असताना पोलीस पाटील संजय धुर्वे यांनी सिंदी पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच सिंदी पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही बाजूंची समजूत काढून तात्पुरता मार्ग उपलब्ध करून दिला. त्यानंतर अंत्ययात्रा पुढे नेण्यात आली. मात्र पोलिसांच्या मध्यस्थीने सुटलेला हा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे का, हा खरा प्रश्न आहे.

### निवेदने दिली, तरी प्रशासन झोपेतच

बोरगाव ग्रामस्थांनी स्मशानभूमीकडे जाणाऱ्या कायमस्वरूपी रस्त्यासाठी यापूर्वी तहसीलदार कार्यालयाकडे लेखी निवेदने दिल्याचे सांगण्यात येते. वारंवार मागणी करूनही प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले गेले नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यामुळे एका तरुणाच्या अंत्यसंस्कारावेळी निर्माण झालेल्या या प्रसंगाने प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

रस्ता हा केवळ विकासाचा मुद्दा नसून तो नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. ज्या गावात मृतदेहाला स्मशानभूमीपर्यंत नेण्यासाठीही वाट मिळत नाही, त्या गावाच्या विकासाचा नेमका अर्थ काय, असा प्रश्न आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. जिल्हाधिकारी आणि सेलू तहसील प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन स्मशानभूमीचा कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# प्रेम, शांतता अन बंधुभावाचा संदेश देत वर्ध्यात ईद-ए-मिलादुन्नबीचा जल्लोष

### बडे चौकात मान्यवरांकडून जुलूसाचे स्वागत; चौकाचौकात पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**वर्धा जनमाध्यम :** पैगंबर हजरत मोहम्मद साहेब यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलादुन्नबीचा पवित्र सण वर्धा शहरात उत्साह आणि शांततामय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध परिसरातून भव्य जुलूस काढण्यात आला. जुलूसात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

जुलूस शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत असताना ठिकठिकाणी नागरिक व व्यापाऱ्यांनी सहभागी बांधवांचे स्वागत केले. बडे चौकात राजेंद्र शर्मा, शेखर शेंडे, इकराम हुसेन, इद्रिस मेमन, अब्दुल रशीद सगीर, सतीश पलेरिया, श्याम शंभरकर, प्रमोद पोतदार, अब्दुल मुबीन, डॉ. अनिस बेग, एजाज मोहम्मद, अख्तर खान, मेहबूब बनानी आणि जाफर जावेद यांनी जुलूसाचे स्वागत केले. यावेळी मिठाईचे वाटप करण्यात आले.

ईद-ए-मिलादुन्नबीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली. शहरातील प्रमुख चौकांमध्ये तसेच जुलूसाच्या मार्गावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

प्रेम, दया, शांतता, समानता आणि मानवतेचा संदेश देणारा हा उत्सव सामाजिक सलोखा व बंधुभावाची भावना दृढ करणारा ठरला.

**हिंगणघाटमध्ये अतुल वांदिले रॅलीत सहभागी**

हिंगणघाट : ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त शहरात उत्साहात रॅली काढण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी रॅलीत सहभागी होत मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. पक्षाच्या वतीने रॅलीतील नागरिकांसाठी पाणी व लहान मुलांसाठी खाऊ वाटप करण्यात आला.



फोटो- राहुल तेलरांधे

ईद-ए-मिलादुन्नबी हा प्रेम, शांतता, बंधुभाव व मानवतेचा संदेश देणारा सण असून हिंगणघाटची सामाजिक एकतेची परंपरा अधिक दृढ व्हावी, अशी भावना वांदिले यांनी व्यक्त केली. यावेळी जिल्हा सरचिटणीस दशरथ ठाकरे, शहराध्यक्ष बालू वानखेडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, मुस्लिम बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवसेनेतर्फे फळ व पाणी वाटप**

हिंगणघाट : जश्न-ए-ईद मिलादुन्नबी निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने कारंजा चौक येथे मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देत फळ व पाणी वाटप करण्यात आले. माजी आमदार तथा माजी राज्यमंत्री आणि जिल्हा संपर्कप्रमुख अशोकभाऊ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम पार पडला. यावेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र खूपसरे, उपजिल्हाप्रमुख सतीश धोबे, तालुकाप्रमुख मनीष देवडे, शहरप्रमुख सचिन पोटदुखे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. शांतता, प्रेम, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या ईद मिलादुन्नबीच्या निमित्ताने सामाजिक सलोखा व सद्भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# अबब... श्वानांसाठी ९४ लाखांची इमारत

## पाच श्वानांसाठी दोन मजली इमारत; जिल्हा नियोजनातून निधी मंजूर

**वर्धा जनमाध्यम :** पोलिस तपासात श्वान पथकाचे महत्त्व निर्विवाद असले, तरी वर्धा जिल्हा पोलिस दलातील श्वानांसाठी तब्बल ९४ लाख रुपये खर्चून दोन मजली स्वतंत्र इमारत उभारण्याचा निर्णय चर्चेचा विषय ठरला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या इमारतीसाठी ९४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे सध्या जिल्हा पोलिस दलाकडे पाच श्वान कार्यरत आहेत.

नव्या इमारतीत प्रत्येक श्वानासाठी स्वतंत्र खोली आणि पिंजरा, भोजन तयार करण्यासाठी स्वयंपाकघर, भोजन ठेवण्याची व्यवस्था, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था तसेच फर्निचरची सुविधा असणार आहे. भविष्यात श्वानांची संख्या आठपर्यंत वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन इमारतीची क्षमता निश्चित करण्यात आली आहे. व्हीव्हीआयपी बंदोबस्तासाठी इतर जिल्ह्यांतून येणाऱ्या श्वानांसह त्यांच्या हस्तक आणि अधिकाऱ्यांच्या निवासाची व्यवस्थाही करण्यात येणार आहे.



पोलिस तपास, बॉम्ब शोध व नाशक कारवाई तसेच अमली पदार्थांच्या शोधात श्वान पथकाची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या देखभालीसाठी स्वतंत्र सुविधा असणे आवश्यक असल्याचा पोलिस दलाचा दावा आहे.

मात्र पाच श्वानांसाठी ९४ लाख रुपयांचा खर्च हा आकडा समोर आल्यानंतर या निधीच्या प्राधान्यक्रमावरही प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. पोलिस दलाला मनुष्यबळ, वाहने, अत्याधुनिक तपास यंत्रणा, पोलिसांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक साधनांची गरज असताना एवढ्या मोठ्या निधीतून श्वान पथकाची इमारत उभारण्याची आवश्यकता कितपत आहे, यावर चर्चा सुरू झाली आहे.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. पोलिस दलाचे आधुनिकीकरण आणि तपास यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

९४ लाखांचा खच. 'पाच श्वान. आणि दोन मजली इमारत त्यामुळे आता या इमारतीची प्रत्यक्ष उभारणी झाल्यानंतर तिच्यावर होणारा खर्च आणि सुविधांची गुणवत्ता याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पाणी नाही, भाव नाही, रस्ताही नाही; तरी सरकार म्हणते शेतकरी सुखी

**साहूर जनमाध्यम :** अस्मानी आणि सुलतानी संकटांच्या कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारकडून घोषणांचा पाऊस सुरू असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीचा दुष्काळ कायम आहे. निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्तेची खुर्ची मिळवायची आणि सत्ता मिळाल्यानंतर त्याच आश्वासनांवर चालढकल करायची, असा संतापजनक अनुभव शेतकऱ्यांना येत असल्याचा आरोप साहूर व परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले. मात्र अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन लाखांचे कर्ज असतानाही ५० हजार, एक लाख किंवा दीड लाख रुपयांचीच मदत जमा झाल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे आश्वासन आणि प्रत्यक्ष लाभ यातील तफावत स्पष्ट होत असल्याची भावना आहे.



# पाणी मागण्याचा बहाणा, दहा हजारांवर डल्ला; आठवडाभरात चोर गजाआड

### कारंजा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** पिण्यासाठी पाणी मागण्याचा बहाणा करून घराबाहेर ठेवलेली दहा हजार रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या चोरट्याला कारंजा पोलिसांनी अवघ्या आठवडाभरात बेड्या ठोकल्या. गोपनीय माहितीच्या आधारे अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथे सापळा रचत आरोपीला अटक करण्यात आली असून चोरीची संपूर्ण रक्कमही जप्त करण्यात आली आहे.

खरसखांडा येथील वामणराव महादेव वंजारी यांच्या घरी १३ ऑगस्ट रोजी ही घटना घडली होती. दुपारच्या सुमारास एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आली आणि पिण्यासाठी पाणी मागितले. वामणराव पाणी आणण्यासाठी घरात गेल्याची संधी साधत त्या व्यक्तीने घराबाहेर दिवाणावरील उशीखाली ठेवलेली दहा हजार रुपयांची रोकड चोरून पळ काढला. रोकड चोरीला गेल्याचे लक्षात येताच वामणराव वंजारी यांनी कारंजा पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ठाणेदार प्रल्हाद मदन यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तिवसा येथे कारवाई करून रामराव भिमराव ढोबळे (वय ५५, रा. तिवसा, जि. अमरावती) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपीने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेली रोकड हस्तगत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सरिता चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक निखिल ठोंबरे, मंगेश मिलके, दिनेश घसाड आणि सहकाऱ्यांनी केली.

# कुमारी अल्पवयीन मातेच्या नवजात बाळाचा मृत्यू

## शहर पोलिसांकडून आकस्मिक मृत्यूची नोंद; चौकशीत उलगडणार प्रकरणाचे वास्तव

**वर्धा जनमाध्यम ;** यवतमाळ जिल्ह्यातील मूळ रहिवासी आणि सध्या सेलू तालुक्यातील एका गावात वास्तव्यास असलेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीने वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात एका मुलीला जन्म दिला. मात्र जन्मानंतर नवजात बाळाची प्रकृती गंभीर झाल्याने बाळासह कुमारी मातेला पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले. उपचारादरम्यान २२ ऑगस्ट रोजी नवजात मुलीचा मृत्यू झाला. या घटनेची वर्धा शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद घेतली असून, प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

पोलिस सूत्रांनुसार, संबंधित कुमारी माता अवघी १६ वर्षांची असून ती मुकी व बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग असल्याचे सांगण्यात येत आहे. काही महिन्यांपासून ती सेलू तालुक्यातील एका गावात वास्तव्यास होती. ती चंद्रपूर जिल्ह्यात गेली असताना तिच्यावर अत्याचार झाल्याचा संशय असून, त्यानंतर ती गर्भवती राहिल्याची माहिती समोर आली



आहे. प्रसूतीसाठी तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे तिने मुलीला जन्म दिला. मात्र नवजात बाळाची प्रकृती नाजूक असल्याने डॉक्टरांनी तातडीने नागपूरला रेफर केले. तेथे उपचार सुरू असतानाच बाळाचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून, अल्पवयीन मुलीच्या गर्भधारणेमागील नेमके कारण काय, तिच्यावर अत्याचार झाला होता का आणि या प्रकरणात कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. सध्या कुमारी मातेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांच्या सखोल चौकशीनंतरच या प्रकरणामागील वास्तव समोर येणार आहे.

### सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वीचा अजब कारभार

# पूल दोन वर्षांपूर्वीच बांधला; माहितीचा फलक मात्र आता

### काम पूर्ण झाल्यानंतर फलक लावण्याची घाई कशासाठी?

**आष्टी शहीद जनमाध्यम :** साहूर ते वडाळा मार्गावरील पुलांचे बांधकाम पूर्ण होऊन दोन ते तीन वर्षांचा कालावधी लोटला असताना सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वीच्या वतीने आता पुलाच्या कामाची माहिती देणारा फलक लावण्यात आला आहे. काम सुरू असताना किंवा काम पूर्ण होताना लावण्यात येणारा माहिती फलक तब्बल दोन वर्षांनंतर लावण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पुलाच्या बांधकामासाठी किती निधी मंजूर झाला, कामाची अंदाजित किंमत किती होती, कामाची मुदत काय होती, कंत्राटदार कोण होता, तसेच कामाची गुणवत्ता तपासणी कोणी केली, याची माहिती नागरिकांना कामाच्या ठिकाणी उपलब्ध होणे अपेक्षित असते. मात्र येथे पूल पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षांनी फलक लावण्यात आल्याने या फलकाचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.



**काम आधी की माहितीचा फलक आधी-** शासकीय बांधकामांमध्ये पारदर्शकता राहावी, यासाठी कामाच्या ठिकाणी निधी, कंत्राटदार, कामाची किंमत आणि मुदतीची माहिती असलेला फलक लावला जातो. मात्र साहूर ते वडाळा मार्गावरील पुलांच्या बाबतीत काम पूर्ण झाल्यानंतर फलक लावण्यात आल्याने विभागाचा हा अजब कारभार चर्चेचा विषय ठरला आहे. वडाळा गावाच्या सीमेवर, वर्धापूर गावाच्या सीमेवर तसेच बोरगाव गावालगत असलेल्या पुलांचे बांधकाम यापूर्वीच पूर्ण झाले आहे. मग या पुलांच्या कामाची माहिती देणारा फलक लावण्याची आठवण विभागाला आता का झाली दोन वर्षे फलक लावण्यात विलंब का झाला? या कालावधीत नागरिकांनी कामाचा खर्च, कंत्राटदार आणि गुणवत्तेबाबत माहिती कुठून घ्यायची, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

# राहुल गांधी सनातन विरोधी, तीन वर्षांच्या मुली जेव्हा बुरखा घालतात तेव्हा आवाज का उठवत नाहीत?- कंगनाचा सवाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राहुल गांधींचे विचार हे सनातन विरोधी आहेत आणि त्यांचा तेवढाच अजेंडा आहे असं अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौतने म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी क्रिती सेनानची बाजू घेत जी पोस्ट केली होती त्याबाबत एक प्रश्न कंगना रणौतला विचा?ण्यात आला त्यावर तिने हे उत्तर दिलं आहे. क्रितीने जाहिरात केली त्यातून हिंदू संस्कृती नाहिशी करण्याचाही एक प्रकारे प्रयत्न झाला. मी त्यासाठीच पोस्ट केली होती. मात्र राहुल गांधी यांचा अजेंडा सनातन विरोधी आहे असं म्हणत कंगनाने टीका केली आहे.

**अभिनेत्री कंगनाने नेमकं काय म्हटलं आहे?**

क्रिती सेनान यांच्याबाबत जर बोलायचं असेल तर मला सांगा त्यांनी ज्या प्रकारचे चित्रपट केले आहेत, जसे कपडे परिधान केले आहेत त्याबद्दल त्यांना कुणी काय म्हटलंय? कुणालाही त्याची काही पडलेली नाही. मी जी पोस्ट केली ती रक्षाबंधन बाबत होती. मला सांगा राहुल गांधी यांच्या पोस्टमध्ये रक्षाबंधन हा शब्द का नाही? त्यांनी असं कुठे म्हटलं आहे की एक महिला रक्षाबंधनच्या दिवशी तिला हवे तसे कपडे घालू शकते. रक्षाबंधन हा धार्मिक विषय आहे. त्याचे काही नियम असतात. राहुल गांधी त्यांच्या विचारांमध्येच किती गोंधळलेले आहेत. तीन वर्षांच्या मुली जेव्हा बुरखा घालतात तेव्हा त्यांना वाटत नाही की पितृसत्ताक पद्धती संपवली पाहिजे. कारण त्यांना हे माहीतही नाही की बुरखा काय असतो. राहुल गांधींची विचारसरणी मर्यादित आहे. सनातनवर हल्ला करणं एवढाच त्यांचा अजेंडा आहे. मी तर त्यांना हाफ ख्रिश्चनही म्हणणार नाही. असं कंगनाने म्हटलं आहे. कंगनाने डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत हे विधान केलं आहे.



**जाहिरात मागे घेतली ते योग्यच झालं-कंगना**

जाहिरात मागे घेतली गेली त्याबाबत काय सांगाल असं विचारलं असता कंगनाने म्हटलंय, क्रिती सेनानन यांनी जी जाहिरात केली त्यातला पोशाख हा एक छोटासा मुद्दा होता. ब्रालेट घातलं ते सोडून द्या. पण संपूर्ण जाहिरातीत आई वडील दिसले का? पूजेची तयारी, गंध, अक्षता, फुलं काही दिसलं का? हलवा-पुरी, दिवा सगळं का दाखवलं नाही? टिळ्याशिवाय राखी कशी चालेल? त्या जाहिरातीमुळे मीच नाही तर संपूर्ण हिंदू समाज दुखावला होता. एक प्रकारे हिंदू संस्कृती पुसण्याचाच प्रयत्न झाला. त्यामुळे कंपनीने जाहिरात मागे घेतली ते बरंच झालं. असंही कंगनाने म्हटलं आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऊद्योग योजनेत महाराष्ट्राची उत्तुंग कामगिरी

## ‘ऊमेद’ अभियानाला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली, २६ :** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया ऊद्योग योजनेतील (पीएमएफएमइई) 'बीज भांडवल' घटकाच्या अत्यंत प्रभावी अंमलबजावणीबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला (ऊमेद) राष्ट्रीय स्तरावरील ‘Best Performance State’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील 'इंडिया हॅबिटॅट सेंटर' (India Habitat Centre) येथे आयोजित विशेष पुरस्कार सोहळ्यात केंद्रीय अन्नप्रक्रिया ऊद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते हा गौरवपूर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख ऊपस्थिती होती. हा राष्ट्रीय पुरस्कार 'ऊमेद' अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर दुबे पाटील यांनी स्वीकारला. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी ऊमेद अभियानाच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे कौतुक केले. ३८ हजार महिलांना आर्थिक आधार: ऊमेद अभियानाने गेल्या पाच वर्षांत घक्कक योजनेच्या अंतर्गत राज्यातील ३८,००० स्वयं सहाय्यता समूहातील सदस्यांना सुमारे १३६ कोटी रु पयांचे बीज भांडवल यशस्वीरीत्या वितरित केले आहे. ग्रामीण महिला ऊद्योजकतेला चालना: या मिळालेल्या बीज भांडवलाच्या मदतीने ग्रामीण भागातील हजारो महिलांनी स्वतःचे अन्नप्रक्रिया ऊद्योग सुरू केले आहेत. यामुळे महिलांना नियमित ऊत्पन्न, रोजगार आणि स्वावलंबनाची शाश्वत संधी ऊपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रात 'ऊमेद' अभियानाच्या माध्यमातून महिला बचत गटांना केवळ आर्थिक मदत न देता त्यांना शाश्वत ऊपजीविकेकडे नेण्यासाठी केलेल्या ऊत्कृष्ट नियोजनाची राष्ट्रीय स्तरावर प्रशंसा करण्यात आली.



# पत्नी ही पतीची मालमत्ता नाही

## कर्नाटक ऊच्च न्यायालयाने फेटाळली पतीची याचिका

**बंगळुरू / वृत्तसंस्था-**पत्नी ही घरकामासाठी किंवा सासू-सास-यांची सेवा करण्यासाठी ठेवलेली कर्मचारी अथवा पतीची खासगी मालमत्ता नाही, असे कठोर निरीक्षण नोंदवत कर्नाटक ऊच्च न्यायालयाने पतीची याचिका फेटाळली. लग्न म्हणजे पत्नीच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण मिळवण्याचे लायसन्स नाही, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले.

पुरु षांनीही घरात कामे करावी. न्यायमूर्ती डॉ. चिलकूर सुमालता यांच्या खंडपीठाने म्हटले की, केवळ लिंगाच्या आधारावर एखाद्या महिलेचे स्वातंत्र्य मर्यादित करणे हे समानतेच्या घटनात्मक तत्त्वांच्या आणि मानवी प्रतिष्ठेच्या विरोधात आहे. पत्नी ही घरकामासाठी किंवा सासू-सास-यांची सेवा करण्यासाठी ठेवलेली कर्मचारी किंवा पतीची खासगी मालमत्ता नाही. लग्न म्हणजे पत्नीची वैयक्तिक्र ओळख, स्वातंत्र्य किंवा तिच्या आवडीनिवडींवर नियंत्रण मिळवण्याचे लायसन्स नाही, अशा कडक शब्दांत कर्नाटक हायकोर्टाने एका पतीची याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने स्पष्ट केले की, घरातील कामे करणे किंवा सासू-सास-यांची सेवा करणे हे पत्नीचे ऐच्छिक काम आहे. आपल्या वृद्ध आई-वडिलांची काळजी घेण्याची प्राथमिक जबाबदारी ही त्यांच्या स्वतःच्या मुलांची आहे, सुनांची नाही. पत्नीवर तिच्या मनाविरु द्ध ताबा मिळवणे किंवा माहेरी जाण्यासाठी परवानगी सक्तीची करणे हे मानवी सन्मान आणि सामाजिक न्याय या संवैधानिक मूल्यांच्या विरोधात आहे, असे निरीक्षण यावेळी कोटाने नोंदविले. न्यायमूर्ती डा. चिलकूर सुमालता यांच्या खंडपीठाने म्हटले की, केवळ लिंगाच्या आधारावर एखाद्या महिलेचे स्वातंत्र्य मर्यादित करणे हे समानतेच्या घटनात्मक तत्त्वांच्या आणि मानवी प्रतिष्ठेच्या विरोधात आहे. घरातील कामे पुरु ष आणि महिला दोघांनीही समानतेने वाटून घेतली पाहिजेत. सध्याची महागाई आणि जीवनमानाचा खर्च पाहता दरडोई १५० रु पये प्रतिदिन ही रक्कम अगदी तुटपुंजी आहे, असे स्पष्ट करत हायकोर्टाने पतीची याचिका फेटाळून लावत कौटुंबिक न्यायालयाची ९,००० ची मासिक पोटगी कायम ठेवली.



**पत्नीला काळी म्हणणे हा गुन्हा नाही-** पत्नीच्या काळ्या रंगावर, कमी बुद्धिमत्तेवर किंवा लाजाळू स्वभावावर टोमणे मारणे हे गुन्ह्याच्या कक्षेत येत नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी करत झारखंड हायकोर्टाने पतीविरोधात सुरू असलेला गुन्हेगारी खटला रद्द केला. जस्टिस अनिल कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, रंग-रूपावर टोमणे मारणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचे असू शकते, परंतु हा गुन्हेगारी खटला चालवण्याचा आधार ठरू शकत नाही. ऑनलाईन मॅट्रिमोनियल साईटवरू न झालेल्या या लग्नानंतर वाद निर्माण झाला होता, ज्यामध्ये पत्नीने असा आरोप केला होता की, पती तिच्या रंगावर आणि बोलण्याच्या पद्धतीवरू न तिला सतत टोमणे मारत असे.

# हा देश म्हणजे धर्मशाळा नाही; गृहमंत्री शहांचा घुसखोरांना इशारा

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय मजबूत देशांतर्गत सुरक्षेच्या पायावरच अवलंबून आहे, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. दिल्लीत इंटेलिजन्स ब्युरोच्या राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेच्या निरोप सत्रात बोलताना शहांनी घुसखोरी, दहशतवाद, मादक पदार्थांची तस्करी आणि सुरक्षा आव्हानांविरु द्ध आवश्यक पावले ऊचलण्याचे आवाहन केले. देशांतर्गत सुरक्षा अधिक मजबूत केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होउ शकत नाही. पूर्वीच्या सरकारांनी अमली पदार्थांची तस्करी, नक्षलवाद आणि ईशान्येकडील असंतोष यासारख्या आव्हानांचा ते विकोपाला जाण्यापूर्वीच अंदाज लावला असता, तर आज देशाला अनेक दशकांच्या सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांचा सामना करावा लागला नसता, असे शहा म्हणाले. तीन मोठ्या अंतर्गत सुरक्षा हाटस्पाट्समुळे निर्माण झालेल्या धोक्यांवर भारताने यशस्वीरीत्या मात केली असल्याचे शहा म्हणाले. त्यांनी या यशाचे श्रेय राज्य पोलिस दल, केंद्रीय यंत्रणा आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांना दिले. गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणांना पुढील १५ ते २० वर्षांत देशाच्या सुरक्षा वातावरणाला आकार देउ शकणा-या ट्रेंड्सवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन शहांनी केले. भविष्यातील आव्हाने ओळखून त्यांचे मोठ्या संकटात रू पांतर होण्यापूर्वीच ती मोडून काढण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेने खबरदारी घ्यावी असेही शहा म्हणाले. पुढील एका वर्षाच्या आत तीन नवीन गुन्हेगारी कायदे पूर्णपणे लागू करण्याचे सरकारचे ऊद्दिष्ट आहे. या सुधारणांमुळे गुन्हेगारी खटले सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरापर्यंत तीन वर्षांच्या आत निकाली निघू शकतील आणि शिक्षेचा दर २५ टक्क्यांनी वाढेल, अशा प्रकारे रचना करण्यात आली आहे, असेही शहा यांनी स्पष्ट केले.



# रूग्णालयात अग्नितांडव; 15 नवजात बाळांचा मृत्यू

**इस्लामाबाद/ वृत्तसंस्था-**पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे बुधवारी सकाळी रु ग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत तब्बल १५ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रु ग्णालयात घडली. स्थानिक माध्यमांच्या माहितीनुसार, आग लागली तेव्हा रु ग्णालयातील नवजात बालकांच्या कक्षात एकूण १६ बाळे होती. आग आणि धुरामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली. बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, या दुर्घटनेत केवळ एका नवजात बालकाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले, तर १५ बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, नवजात बालकांच्या कक्षातील एअर कंडिशनरच्या काम्प्रेसरचा स्फोट झाल्यानंतर आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्फोटानंतर काही क्षणांतच आगीने परिसराला वेढल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे रु ग्णालयातील कर्मचा-यांमध्ये आणि रु ग्णांच्या नातेवाईकांमध्ये मोठी धावपळ ऊडाली. सकाळी साधारण ७ वाजण्याच्या सुमारास स्त्रीरोग विभागात आग लागली. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके आणि अग्निशमन दलाचे जवान रु ग्णालयात दाखल झाले. आग नियंत्रणात आणण्यासोबतच विभागातील रु ग्ण आणि कर्मचा-यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे काम करण्यात आले. आग विझविल्यानंतर परिसरात कुलिंग ऑपरेशनही करण्यात आले. या दुर्घटनेनंतर रु ग्णालयातील नवजात बालकांच्या आणि प्रसूती विभागातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न ऊपस्थित झाले आहेत. रु ग्णालयातील एअर कंडिशनिंग यंत्रणा, विद्युत व्यवस्था आणि अग्निसुरक्षा ऊपाययोजनांची योग्य देखभाल होत होती का, याबाबत आता चौकशीची मागणी होत आहे. या भीषण दुर्घटनेमुळे मृत नवजात बालकांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# लव्ह स्टोरीमुळे फुटला ‘एमपीएससी’चा पेपर ; तपासातून धक्कादायक माहिती समोर

**मुंबई / प्रतिनिधी-**एमपीएससी पेपर लीक प्रकरणाच्या तपासात एक चक्रावून टाकणारी माहिती समोर आली आहे. पेपर फुटीच्या आरोपांमुळे मंगळवारी रात्री एमपीएससीने औषध निरीक्षक, गट-ब पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. गेल्या काही दिवसांपासून या परीक्षेचा पेपर फुटल्याचे आरोप सुरू होते. आता असे समोर आले आहे की, या पेपरफुटीला एक लव्ह स्टोरी जबाबदार आहे.

एमपीएससीच्या औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकाराला एक लव्ह स्टोरी कारणीभूत असल्याची माहिती पोलिस तपासात ऊघड झाली आहे. खात्रीलायक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका प्रियकराने एमपीएससीमध्ये अगदी एका खालच्या कर्मचा-याशी संधान साधून हा प्रकार केल्याचे बोलले जाते आहे.

एमपीएससी परीक्षेची प्रक्रिया अनेक महिने चालू असते. त्यामुळे या परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया विद्यमान अध्यक्ष रु जू होण्यापूर्वीच पूर्ण झाली होती. केवळ एकाच विद्यार्थ्याकडे पेपर मिळाला असल्याचा पोलिसांचा प्राथमिक निष्कर्ष असला तरी आयोगाने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ एकाकडेच पेपर गेला असतानाही इतर सर्व विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसला आहे. एका प्रेमकहाणीचा हा फटका इतरही विद्यार्थ्यांना बसला आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करतात. त्यासाठी प्रचंड कष्ट घेत असतात. राहण्याचे, दोनवेळच्या जेवणाचे हाल सोसून हे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतात. दोन लोकांच्या प्रेमसंबंधांमुळे या विद्यार्थ्यांना हा मनःस्ताप सहन करावा लागणे हे खूप दुर्दैवी आहे.



मध्यंतरी रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेतून प्रेझेंटेशन करू न एमपीएससीचा पेपर फुटल्याचा दावा केला होता. पण एमपीएससीने मात्र त्यावेळी हे आरोप मान्य करण्यास नकार दिला होता. पण आता भरती प्रक्रिया रद्द करणे म्हणजे पेपरफुटी झाली हे वास्तव आहे. नंदुरबारच्या कौटिल्य अकादमीतील एका विद्यार्थ्याला ९० टक्के प्रश्न आधीच मिळाले होते. २२ मार्च २०२६ ला परीक्षा होती. पण २० मार्चलाच परीक्षेचे प्रश्न मिळालेले. त्यामुळे या मुलांना अभ्यास करता आला. पैसे मिळाल्यावर तो माणूस व्हाट्स ॲपवर प्रश्न पाठवायचा. दोन ते तीन मिनिटांनी डिलिट फार ऑल करायचा. ते डाउनलोड केलेले प्रश्न एकाने आपल्या मित्राला पाठवले. त्यामुळे त्याचे पुरावे आपल्याकडे आहेत असा दावा रोहित पवार यांनी केला आहे.

# औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द

## परीक्षेत गैरप्रकार, एमपीएससीने घेतला मोठा निर्णय

**मुंबई :**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द केली. या परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच सोशल मीडिया व इलेक्ट्र?निक माध्यमांवर लीक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे आयोगाने आज हा निर्णय घेतला. झालेली परीक्षाच रद्द झाल्याने यासाठी पुन्हा फेरपरीक्षा घेतली जाउ शकते.परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न झाल्याने आणि एकाच ऊमेदवाराला या परीक्षेचा प्रश्न संच मिळाला आणि त्याचा लाभ घेतल्याचे ऊघड झाले. या मुद्यावरू न विद्यार्थ्यांनी लढा दिला. त्याला मोठे यश मिळाले. या प्रकरणी सर्वप्रथम आमदार रोहित पवार यांनी पेपरफुटीचा आरोप केला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अन्न व औषध प्रशासन-औषध निरीक्षक, गट ब भरती प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने फेरपरीक्षा आयोजित करणार आहे. आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गासाठी २९ जुलै २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ई-मेलद्वारे काही ऊमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच दि. २० मार्च २०२६ रोजी काही ऊमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रानिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती, असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते. यासंबंधीच्या निष्कर्षाआधारे आयोगाने औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठीची भरती प्रक्रिया रद्द केली.

# अनाथ, दिव्यांग मुलींकडून राज्यपालांचे रक्षाबंधन

**मुंबई :** अनाथ तसेच दिव्यांग मुली व महिला स्वच्छता कर्मचारी यांसह अनेक विविध क्षेत्रातील महिला भगिनींनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन मुंबई येथे भेट घेउन रक्षाबंधनानिमित्त त्यांना राखी बांधली.



यावेळी राज्यपालांनी सर्वांना रक्षाबंधनानिमित्त शुभेच्छा व भेटवस्तू दिल्या. रक्षाबंधन हा समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारा पवित्र सण आहे. समाजाच्या विविध स्तरावर ऊल्लेखनीय योगदान देत असलेल्या महिला व मुलींसह यंदाचे रक्षाबंधन केल्याचा अतिशय आनंद झाला आहे, अशी भावना राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली. दिवंगत सिंधुताई सपकाळ यांनी अनाथ व गोरगरीब मुलींसाठी पुरंदर जिल्हा पुणे येथे सुरु केलेल्या ममता बाल सदन या संस्थेच्या वतीने अनाथ मुलींनी राज्यपालांना राखी बांधली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दीपक गायकवाड व संपर्क अधिकारी मुकेश चौधरी देखील ऊपस्थित होते. बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात काम करणा-या महिला कर्मचा-यांनी तसेच आशा सेविका व आरोग्य स्वयंसेविकांनी देखील राज्यपालांना राखी बांधली. पालघर जिल्ह्यातील 'सेवा विवेक' ग्राम विकास केंद्राच्या वतीने बांबू ऊत्पादनांच्या माध्यमातून स्वयंरोजगार करीत असलेल्या आदिवासी महिलांनी यावेळी राज्यपालांना पर्यावरण पूरक राखी बांधली. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लुकेश बंड यावेळी ऊपस्थित होते.

# एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई; तीन अधिका-यांसह सहा जणांना अटक

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक (गट-ब) परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात गुन्हे शाखेने मोठी धडक कारवाई केली. या प्रकरणी एमपीएससीच्या अप्पर सचिवांसह तीन अधिकारी, क्लास संचालक आणि विद्यार्थ्याच्या नातेवाइकांना अशा एकूण ६ जणांना अटक करण्यात आली. या गैरप्रकारामुळे एमपीएससीने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, सर्व आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, तपासादरम्यान आरोपी विश्वेश्वर दत्तात्रय नकाते (सहाय्यक कक्ष अधिकारी, एम.पी.एस.सी.), अभिजीत गणपतराव लेंडवे (अवर सचिव, एम.पी.एस.सी.), गोपाळ भट्टु मराठे (सहाय्यक कक्ष अधिकारी, एम.पी.एस.सी.), यांच्यासह प्रविण दिलीप पाटील (संचालक कौटील्य अकादमी, नंदुरबार), अमृत नामदेव पाटील आणि लोकेश ऊर्फ गौरव राजेंद्र पाटील यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना आज अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना २ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावल्यामुळे, आता पोलीस चौकशीत या रॅकेटचे आणखी कोणते धागेदोरे आणि मोठे चेहरे समोर येतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.पेपरफुटीचा हा गंभीर प्रकार ऊघडकीस आल्यानंतर एमपीएससीने तातडीने कठोर निर्णय घेत औषध निरीक्षक (गट-ब) परीक्षा रद्द केली. या निर्णयामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणा-या परीक्षार्थींना अंशत? दिलासा मिळाला आहे. सरकारने परीक्षा रद्द केली असली तरी, या संपूर्ण घोटाळ्यामागचा मुख्य आरोपी कोण आहे? याची पाळेमुळे शोधून काढण्याची मागणी स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांनी केली आहे. एमपीएससीच्या अधिका-यांचा यात थेट सहभाग आढळल्याने या प्रकरणाचा सूत्रधार शोधून त्याच्याकडून सत्य समोर आणले पाहिजे, अशीही विद्यार्थ्यांकडून मागणी केली जात आहे.

## नेपाळमध्ये पुरामुळे विध्वंस





भोटेकोशी नदीला आलेल्या पुरामुळे वाटेतील घरे ऊद्ध्वस्त झाली. रसुवा जिल्ह्यात पाण्याच्या प्रचंड प्रवाहाने नेपाळ आणि चीनला जोडणारा मित्री पूल तोडला.



तिबेट-चीन सीमेवरील ग्यिरोंग बंदराच्या इमिग्रेशन संकुलात लोक पळून जाताना दिसत आहेत.




नेपाळमध्ये पुरामुळे विध्वंस, १०० मृत्यू, १००० बेपत्ता:उर्जा प्रकल्प-पूल वाहून गेले; १३३ भारतीय बेपत्ता, कैलास मानसरोवर यात्रेला जात होते

# ‘डिजिटल अरेस्ट’ सारखा प्रकार नाहीच; सायबर फसवणूक झाल्यास तातडीने 1930 वर तत्काळ संपर्क साधा- मुख्यमंत्री

**मुंबई :** सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डिजिटल अरेस्ट या सायबर जनजागृती लघुपटाचे आणि १९३० महाराष्ट्र सायबर अँथमचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी राज्यमंत्री डा. पंकज भोयर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डा. श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर) संजय शिंत्रे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव ऊपस्थित होते. यावेळी लघुपट व १९३० महाराष्ट्र सायबर अँथम मध्ये योगदान देणारे कलाकार आशिष विध्यार्थी, पंकज त्रिपाठी, शरद केळकर, सोनाली बेंद्रे, जावेद जाफरी, गायिका सुनिधी चौहान, अभिषेक बॅनर्जी, मंगेश देसाई, समय रैना आदी कलाकार ऊपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीनंतरचा गोल्डन अवर अत्यंत महत्त्वाचा असून, या काळात तक्रार नोंदविल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याची किंवा परत मिळविण्याची शक्यता अधिक असते. मात्र नागरिकांकडून तक्रार नोंदविण्यास तीन ते पंधरा दिवसांचा विलंब झाल्यास पैसे अनेक खात्यांमधून वळविले जातात आणि त्यांची रिकव्हरी अत्यंत कठीण होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निकामी सुरक्षा प्रणाली

जिल्हा स्त्री रुग्णालयातील विशेष नवजात शिशू उपचार कक्षातील अग्नीकांडाने पुन्हा एकदा लोकांच्या जीवाशी निगडित सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रामधील ढिसाळपणा, बेजाबदारपणा आणि गांभीर्यरहित व्यवस्थापनाचे दर्शन घडले. ज्या रुग्णालयात अत्यवस्थ, अकाली जन्मलेली आणि कमी वजनाची बाळे जगण्यासाठी वैद्यकीय यंत्रणेच्या साहाय्याने दाराशी येऊन ठेपलेल्या मरणाशी झुंज देत असतात, तिथेच त्यांच्या जीविताला आग,धूर आणि सदोष यंत्रणांचा धोका निर्माण व्हावा, यासारखा मोठा विरोधाभास दुसरा कोणता? या आगीत तीन चिमुकले जीव जग पाहण्याआधीच होरपळून गेले.अशा दुर्घटनेनंतर चौकशी, जबाबदारी निश्चित करण्याच्या घोषणा आणि अग्नीसुरक्षा तपासणी आदेशाचे सोपस्कार याहीवेळी पार पडले; पण काही काळाने ते विस्मरणात जाते आणि पुढील दुर्घटना घडल्यानंतरच त्यांची उजळणी होते, हा व्यवस्थेचा अलिखित स्वभाव बनला आहे. या दुष्टचक्रातून आरोग्य व्यवस्था बाहेर कधी पडणार, हा या दुर्घटनेने उपस्थित केलेला खरा प्रश्न आहे. सरकारने तज्ज्ञांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे म्हटले आहे. हा विशेष नवजात शिशू उपचार कक्ष जुनाट किंवा मोडकळीस आलेल्या इमारतीत नव्हता.नव्या इमारतीत वर्षभरापूर्वी सुरू केला होता. त्यामुळे जुन्या विद्युतवाहिन्या, कालबाह्य बांधकाम किंवा वर्षानुवर्षे न बदललेली सुरक्षा व्यवस्था अशी नेहमीची कारणे पुढे करून प्रशासनाला जबाबदारी झटकता येणार नाही. नव्या इमारतीत आधुनिक वैद्यकीय सुविधा असताना अग्नीशमन यंत्रणा कितपत सक्षम होती, तिची नियमित चाचणी झाली होती का, आग लागल्यानंतर ती तत्काळ कार्यान्वित का झाली नाही, व्हेंटिलेटरमध्ये स्फोट नेमका कशामुळे झाला, विद्युतभाराचे परीक्षण झाले होते का आणि उपकरणांची देखभाल वेळेवर केली होती का, या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधले गेले पाहिजे आणि ही माहिती कसलाही आडपडदा न ठेवता जनतेसमोर आली पाहिजे. रुग्णालयाच्या फायर ऑडिटची मुदत २१ ऑगस्टला संपल्यावर ते तत्काळ करून घेण्याच्या सूचना प्रभारी वैद्यकीय अधीक्षकांनी गेल्या महिन्यातच दिल्या होत्या. हे खरे असल्यास चौकशी समितीचा फार्स करण्याआधी संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारला गेला पाहिजे. रुग्णालय ही मानवी असुरक्षिततेला सुरक्षिततेचे कवच देणारी संस्था असते. तेथे रुग्ण स्वतःच्या जीवाची जबाबदारी वैद्यकीय व्यवस्थेकडे सोपवत असतात. नवजात बालकांबाबत तर हा विश्वास अधिकच निरपेक्ष असतो. त्यामुळे उपचारांतील चूक आणि उपचारांच्या जागी असणारी असुरक्षितता यात मूलभूत फरक आहे. वैद्यकशास्त्राला प्रत्येक जीव वाचविता येईलच, असे नाही. परंतु, आग, सदोष वीज यंत्रणा, निकामी सुरक्षा प्रणाली किंवा प्रशासकीय बेफिकिरीमुळे जीव जाणार नाही,एवढी हमी आधुनिक आरोग्य व्यवस्थेने दिलीच पाहिजे. किंबहुना, ती घटनात्मक जबाबदारी आहे. रुग्णालये, डॉक्टर यांच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीशिवाय अपेक्षित परिणाम साध्य होणे कदापि शक्य नाही.त्यासाठी प्रत्येक सुविधेमागे उत्तरदायित्व, नियमित देखभाल आणि संभाव्य संकटाचा आधीच विचार करणारी सुरक्षा संस्कृती गरजेची आहे. कारण, दुर्घटना अचानक घडत असली तरी तिच्यामागील निष्काळजीपणा दीर्घकाळ साचत गेलेला असतो. नवजात अतिदक्षता कक्षात व्हेंटिलेटर, वॉर्मर, इन्क्युबेटर, मॉनिटर, इन्फ्युजन पंप आणि इतर विद्युत उपकरणे असतात आणि ऑक्सिजनचा वापरही मोठा होतो. येथे किरकोळ ठिणगीदेखील गंभीर संकटाचे रूप धारण करू शकते.अशा विभागात अग्नीसुरक्षा ही भिंतीवरचा अग्नीशमन सिलिंडर व्यवस्थित आहे ना, एवढ्यावर विसंबून ठेवून चालत नाही. विद्युतभाराचे नियोजन, स्वतंत्र विद्युत सुरक्षा तपासणी, धूर शोधणारी यंत्रणा, स्वयंचलित इशारा प्रणाली, आपत्कालीन विद्युतपुरवठा बंद करण्याची व्यवस्था, सुरक्षित बाहेर पडण्याचे मार्ग आणि कर्मचाऱ्यांचे नियमित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण या सर्व गोष्टी आवश्यक आहेत. परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी तातडीने बाळांना बाहेर काढल्यामुळे दुर्घटनेची व्याप्ती वाढली नाही. जीव धोक्यात घालून दाखवलेल्या या शौर्याला सलाम; पण रुग्णालयाची सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या धाडसावर अवलंबून असून चालणार नाही. आग लागल्यानंतर माणसांनी जीव धोक्यात घालून रुग्ण वाचविणे ही शेवटची व्यवस्था असते; पहिली व्यवस्था आग लागू न देणे आणि लागल्यास ती काही क्षणात शोधून नियंत्रित करणारी यंत्रणा, हीच असली पाहिजे.

# ऊस कडू झाला, साखर गोड झाली !



**साखरेचा प्रत्येक गोड कण शेतकऱ्याच्या घामातून तयार होतो. त्यामुळे साखरेचा गोडवा टिकवताना ऊस उत्पादकाचे जीवन कडू होणार नाही, याची जबाबदारी संपूर्ण समाजाने स्वीकारली पाहिजे.**

शेतकऱ्यांनी ऊस कारखान्याला दिल्यानंतर त्याला वेळेत पैसे मिळणे हा त्याचा कायदेशीर आणि नैतिक अधिकार आहे. प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना उसाची रक्कम मिळण्यासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते, या काळात त्याला पुढील पिकासाठी खते, बियाणे आणि कीडनाशके खरेदी करावी लागतात. यासह घरखर्च, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे आरोग्य आणि जुन्या कर्जाचे हप्ते भरावे लागतात. त्यामुळे त्याला पुन्हा सावकार किंवा बँकेकडून कर्ज घ्यावे लागते. उद्योगाला लागणारे खेळते भांडवल शेतकऱ्याची देणी थकवून उभे करणे म्हणजे शेतकऱ्याकडून बिनव्याजी कर्ज घेण्यासारखे आहे. कारखान्याची आर्थिक अडचण खरी असली तरी, त्याची संपूर्ण किंमत ऊस उत्पादकाने चुकवणे न्याय्य नाही. निश्चित मुदतीत संपूर्ण देयक न मिळाल्यास व्याज आपोआप शेतकऱ्याच्या खात्यात जमा झाले पाहिजे. साखर आणि इथेनॉलच्या विक्रीतून येणाऱ्या रकमेत कस उत्पादकांच्या देयकाला प्रथम प्राधान्य देणारी सुरक्षित व्यवस्था असायला हवी.

**सरकारी हस्तक्षेपाचा फटका**

साखरेचा बाजार अनेक सरकारी निर्णयांवर अवलंबून असतो. कधी निर्यात खुली केली जाते, कधी निर्बंध घातले जातात, कधी साठयाबाबत नियम बदलतात, तर कधी देशांतर्गत ग्राहकांच्या नावाखाली दर नियंत्रणाचा प्रयत्न केला जातो. अशा अस्थिर घोरणांमुळे साखर उद्योगाचे नियोजन बिघडते आणि शेवटी त्याचा फटका ऊस उत्पादकाला बसतो. शरद जोशी यांनी सातत्याने सांगितले की, बाजारभाव वाढल्यावर सरकार ग्राहकांच्या हिताच्या नावाखाली हस्तक्षेप करते. पण भाव कोसळल्यावर शेतकऱ्याचे नुकसान भरून काढण्यासाठी तेवढ्या तत्परतेने पुढे येत नाही. नफा होण्याची शक्यता दिसली की निर्यातबंदी,आयात,साठा नियंत्रण किंवा इतर निर्बंध लादले जातात. मात्र उत्पादन खचपिक्षा भाव कमी झाला, तर तो बाजाराचा परिणाम असल्याचे सांगितले जाते. हा दुहेरी न्याय बंद झाला पाहिजे.

अन्नसुरक्षेच्या नावाखाली शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या असुरक्षित ठेवणे योग्य नाही. ग्राहकाला स्वस्त साखर देण्याची जबाबदारी सरकारची असेल, तर त्यासाठी शेतकऱ्याच्या खिशातून अप्रत्यक्ष कर वसूल करता कामा नये. गरजू ग्राहकांना थेट मदत द्यावी. परंतु शेतीमालाचा भाव पाडून त्याचा भार उत्पादकावर टाकू नये.

**इथेनॉलचा फायदा शेतकऱ्यापर्यंत पोहोचला पाहिजे**

इथेनॉलमुळे साखर उद्योगाला नवी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणामुळे देशाच्या कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होऊ शकते, परकीय चलनाची बचत होऊ शकते आणि ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्माण होऊ शकतात. मात्र या राष्ट्रीय लाभाचा मूळ उत्पादक असलेल्या शेतकऱ्याला प्रत्यक्ष फायदा मिळणे आवश्यक आहे.

इथेनॉलचे दर, खरेदी करार आणि कारखान्यांचे उत्पन्न यामध्ये पारदर्शकता असावी. इथेनॉलमधून अतिरिक्त महसूल मिळाल्यास त्यातील निश्चित हिस्सा ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा झाला पाहिजे. शेतकरी फक्त कच्चा माल पुरवणारा मजूर नसून संपूर्ण जैवऊर्जा उद्योगाचा भागीदार झाला पाहिजे. शरद जोशींच्या उद्योजक शेतकऱ्याच्या संकल्पनेशी हीच व्यवस्था सुसंगत ठरेल.

**ऊस उत्पादकाला आर्थिक स्वातंत्र्य द्या**

ऊस प्रश्नाचे उत्तर केवळ दरवाढीत नाही. तर संपूर्ण व्यवस्थेच्या मुक्तीकरणात आहे. शेतकऱ्याला कोणत्या कारखान्याला ऊस विकायचा, कोणत्या व्यापाऱ्याशी करार करायचा, गूळ किंवा इतर उत्पादनासाठी ऊस द्यायचा, की स्वतः प्रक्रिया उद्योग उभारायचा, याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. कारखान्यांमध्ये शेतकऱ्याचा ऊस मिळवण्यासाठी खरी स्पर्धा निर्माण झाली, तर चांगला दर, वेळेवर तोडणी, अचूक वजन आणि तत्पर देयक देणे कारखान्यांना भाग पडेल.

शेतकरी उत्पादक कंपन्या आणि शेतकरी संघटनांनी एकत्रित विक्री, करार, प्राथमिक प्रक्रिया, गूळनिर्मिती, इथेनॉलसाठी कच्चा माल आणि जैवऊर्जा प्रकल्प उभारण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे. ठिबक सिंचन, सुधारित वाण, यांत्रिक तोडणी, कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह माहिती आणि अचूक शेती तंत्रज्ञानाचा उपयोग करून उत्पादन खर्च कमी करण्याचे प्रयत्नही आवश्यक आहेत. मात्र तंत्रज्ञान स्वीकारण्याचा निर्णय शेतकऱ्याचा असला पाहिजे. सरकारी परवानग्यांच्या जंजाळात त्याला अडकवू नये.

**देशाचा गोडवा टिकवायचा असेल तर.....**

ऊस जास्त पाणी वापरणारे पीक आहे, अशी टीका नेहमी केली जाते. पाण्याचा कार्यक्षम वापर करणे निश्चितय आवश्यक आहे. परंतु सरकारने इतर पिकांसाठी लाभदायक बाजारपेठ निर्माण केली नाही, प्रक्रिया उद्योग उभे राहू दिले नाहीत आणि व्यापारधोरणात स्थिरता ठेवली नाही, तर शेतकरी तुलनेने खात्रीशीर खरेदी असलेल्या उसाकडे वळणारच. त्यामुळे पिकाच्या निवडीसाठी शेतकऱ्याला दोष देण्यापेक्षा त्यामागील आर्थिक धोरण तपासले पाहिजे.

शरद जोशींच्या विचारांनुसार शेतकरी हा दयेचा विषय नाही, तो संपत्ती निर्माण करणारा स्वतंत्र उद्योजक आहे. त्याला कर्जमाफीच्या रांगेत उभे करण्याऐवजी बाजारात सन्मानाने उभे राहण्याचे स्वातंत्र्य द्यावे. उसाला उत्पादन खर्चावर आधारित लाभदायक भाव, उपपदार्थांच्या उत्पन्नातील न्याय्य वाटा, वेळेत संपूर्ण देयक, खुला व्यापार, स्थिर निर्यात धोरण आणि तंत्रज्ञान स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

साखरेचा प्रत्येक गोड कण शेतकऱ्याच्या घामातून तयार होतो. त्यामुळे साखरेचा गोडवा टिकवताना ऊस उत्पादकाचे जीवन कडू होणार नाही, याची जबाबदारी संपूर्ण समाजाने स्वीकारली पाहिजे, शेतकऱ्याला लुटून ग्राहकाचे हित साधता येत नाही आणि शेती उद्ध्वस्त करून देशाचा विकास होऊ शकत नाही.

'शेतकऱ्याला योग्य भाव द्या, देशाचा गोडवा टिकवा' ही मागणी कोणत्याही सवलतीची नसून आर्थिक न्यायाची आहे. शरद जोशींनी दाखवून दिलेल्या स्वातंत्र्याच्या मार्गानेच ऊस उत्पादकाला सन्मान, समृद्धी आणि भवितव्य मिळू शकते. कारण शेतकरी वाचला, तरच शेती वाचेल. शेती वाचली, तरच गाव वाचेल आणि गाव वाचले, तरच देश खऱ्या अर्थाने समृद्ध होईल. (उत्तरार्ध)

**विलास ताथोड**
७०२०५८५२६१

## व्यंग




केवढी प्रचंड कल्पनाशक्ती असते व्यंग चित्रकारांची.. इथे 'व' ला कळून चुकले...'ध' अर्धवट आहे... अगतिक आहे... लाचार आहे... बेबस है..... आपला आधार नसेल तर तो संपल्यातच जमा आहे... पण त्याला तरी या 'ध' ला कुठे टिकवायचा आहे.. म्हणून त्याने हात दिलेला नाही.. पोटाला लटकणारा हा 'ध' पुरता लटकलाय याची 'व'ला कल्पना आहे...पण 'ध' ला लटकवताना 'व' देखील लटकला... कारण कर्म...दोघांना पद्धतशीर उध्वस्त करणारे चित्राच्या भगव्या रंगातून हे सगळे बघताहेत.... त्यांनी १९ ला महाराष्ट्राच्या राजकारणाला कलंक लावणाऱ्यांना कसा आपट आपट आपटला.२२-२३ मध्ये....त्यांनी आखलेल्या योजनेला तोड नाही..दाखवण्या पुरती मिजास उरलीय.... बाकी full pack up..... 'ध्व' एवढा कधीच समजला नव्हता... आज हे समजावून सांगणाऱ्या व्यंगचित्रकाराला सलाम! व्यंग चित्रकारांच्या पुढच्या पिढीला व्यंगचित्रातूनच जबर हाणले.... शाबास!!

## नारळी पौर्णिमा आणि श्री हयग्रीव जयंती

यावर्षी २७ ऑगस्ट २०२६ या दिवशी नारळी पौर्णिमा आणि श्री हयग्रीव जयंती असे दोन्ही सण एकत्र आले आहेत. नारळी पौर्णिमा हा महाराष्ट्रात सर्वत्र आणि किनारपट्टीवर विशेषत्वाने साजरा केला जाणारा महत्त्वाचा सण आहे. या दिवशी समुद्राचे मानकरी असणाऱ्या वरुणदेवतेची पूजा केली जाते. समुद्रदेवतेची आपल्यावरती वर्षभर कृपा असावी यासाठी समुद्रात नारळ अर्पण केला जातो. या दिवशी घरी नारळी भात बनवला जातो.

श्री हयग्रीव जयंती याविषयी सुद्धा जाणून घेऊया. श्री हयग्रीव हा श्रीविष्णूचा एक अवतार आहे. श्री हयग्रीव देवतेचे मुख घोड्याचे असते. श्री हयग्रीव ही ज्ञान आणि बुद्धीची देवता आहे. विद्यार्थी आणि विद्वान लोक बुद्धी स्मरणशक्ती आणि विद्याप्राप्तीसाठी श्री हयग्रीव स्वामींची पूजा करतात. असुरांनी चोरलेले वेद ब्रह्मदेवांना परत मिळवून देण्यासाठी भगवान श्रीविष्णुने श्री हयग्रीव अवतार धारण केला असे शास्त्र सांगते.

**आदिती देखणे**

# 'छात्रों की गूंज':विद्यार्थी सभांद्वारे सक्षमीकरणाचा अ-राजकीय ट्रेंड

पुण्यातील 'छात्रों की गूंज' हा कार्यक्रम केवळ राहुल गांधींचा विद्यार्थिनींशी संवाद नव्हता; तो भारतीय लोकशाहीत महिलांच्या आवाजाला केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न होता. त्याचे राजकीय महत्त्व राहुल गांधींच्या भाषणापेक्षा विद्यार्थिनींना दिलेल्या खुल्या व्यासपीठात अधिक दिसते.पुण्यात २२ ऑगस्ट रोजी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत 'छात्रों की गूंज'चा चौथा टप्पा पार पडला. या वेळी कार्यक्रम हा विशेषतः विद्यार्थिनी आणि तरुणींसाठी आयोजित करण्यात आला होता. शिक्षण, सुरक्षितता, समान संधी, स्पर्धा परीक्षा, रोजगार आणि भविष्यातील आकांक्षा यांवर मुलींनी थेट संवाद साधला. या कार्यक्रमात राहुल गांधी यांच्याशिवाय अन्य राजकीय नेत्यांना व्यासपीठावर स्थान न देण्याची रचना करण्यात आली होती. त्यामुळे पारंपरिक राजकीय सभा आणि हा संवाद यांत लक्षणीय फरक जाणवला.

भारतीय निवडणुकीच्या राजकारणात महिला मतदारांचे महत्त्व गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढले आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांची संख्या ४७.६३ कोटी होती. एकूण नोंदणीकृत मतदारांमध्ये त्यांचा वाटा ४८.६२ टक्के होता. विशेष म्हणजे महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी ६५.७८ होती, जी पुरुष मतदारांच्या ६५.५५ टक्क्यांपेक्षा किंचित अधिक होती. ही आकडेवारी केवळ निवडणूक व्यवस्थेतील बदल दर्शवत नाही; ती महिलांच्या राजकीय उपस्थितीचेही चिन्ह आहे. परिणामी, प्रत्येक राजकीय पक्ष महिलांना स्वतंत्र मतदारसमूह म्हणून पाहू लागला आहे. त्यानुसार महिलांसाठी आर्थिक मदत, प्रवास सवलती, घरगुती सुविधा किंवा थेट रोख हस्तांतराच्या योजना जाहीर केल्या जातात. मात्र महिला मतदारांची संख्या वाढली म्हणून त्यांच्या प्रश्नांची उकल झाली किंवा त्यांना योग्य ते सामाजिक स्थान प्राप्त झाले असे मानणे धोकादायक ठरेल.

मतदार म्हणून महिलांचे महत्त्व वाढणे आणि नागरिक म्हणून त्यांचे स्वातंत्र्य वाढणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये देण्याची तरतूद आहे. अशा योजनांना सरसकट 'निरुपयोगी' म्हणणे योग्य ठरणार नाही. गरीब कुटुंबातील महिलेला नियमितपणे स्वतःच्या खात्यात पैसे मिळणे, घरखर्चात तिचा वाटा वाढणे किंवा छोट्या वैयक्तिक गरजा भागवता येणे, हे तात्कालिक पातळीवर महत्त्वाचे ठरू शकते. परंतु सक्षमीकरण म्हणजे फक्त खात्यात पैसे जमा होणे नव्हे. स्वतःच्या आयुष्याविषयी निर्णय घेण्याचा अधिकार, शिक्षण पूर्ण करण्याची संधी, सुरक्षितपणे प्रवास करण्याची मुभा, रोजगाराची उपलब्धता, समान वेतन,



मालमत्तेतील हक्क, आरोग्यसेवा आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्वांचा समावेश सक्षमीकरणात होतो. रोख मदत हे या व्यापक प्रक्रियेतील फक्त एक साधन असू शकते. प्रश्न 'लाडकी बहीण' विरुद्ध 'छात्रों की गूंज' असा नसावा. प्रश्न असा असला पाहिजे की, रोख मदतीबरोबर महिलांना शिक्षण, कौशल्य, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, वसतिगृहे,बालसंगोपनाच्या सुविधा आणि रोजगाराच्या संधी देण्यासाठी सरकार काय करीत आहे?'छात्रों की गूंज'चे वैशिष्ट्य राहुल गांधी यांनी काय सांगितले यात जितके आहे, तितकेच मुलींना काय सांगता आले यात आहे. विद्यार्थिनींनी स्वतःचे अनुभव आणि प्रश्न मांडावेत, अशी कार्यक्रमाची रचना वाटली.

भारतीय राजकारणातील सभा साधारणपणे एकतर्फी असतात. नेता बोलतो, प्रेक्षक ऐकतात, टाळ्या वाजतात आणि घोषणाबाजी होते. प्रश्न विचारण्याची संधी असली तरी ती मर्यादित आणि नियंत्रित असते. त्यातुलनेत विद्यार्थिनींना मोकळेपणाने बोलण्याची संधी देणे ही लोकशाहीच्या संवादात्मक स्वरूपाची आठवण करून देणारी बाब आहे. या संवादातून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय नसून स्वातंत्र्याचा विषय आहे, हे स्पष्ट झाले. घरातून बाहेर पडताना, रात्री प्रवास करताना, महाविद्यालय निवडताना किंवा नोकरी स्वीकारताना महिलांना सुरक्षिततेचा विचार करावा लागतो. 'काळजी'च्या नावाखाली त्यांच्यावर घातले जाणारे निर्बंधही नियंत्रणाचे साधन ठरू शकतात, याकडे राहुल गांधी यांनी लक्ष वेधले. ही चिंता केवळ राजकीय भाषणाचा भाग नाही. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या २०२३च्या आकडेवारीनुसार महिलांविरुद्ध ४,४८,२११ गुन्हे नोंदवले गेले. त्यापैकी सुमारे २९.८ टक्के प्रकरणे पती किंवा नातेवाईकांकडून होणाऱ्या क्रौर्याशी संबंधित होती. याचा अर्थ महिलांची असुरक्षितता सार्वजनिक ठिकाणीच नाही, तर घराच्या चौकटीतही आहे.

शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात महिलांची उपस्थिती वाढत असली तरी समानता अद्याप दूर आहे. २०२३-२४मध्ये उच्च शिक्षणातील महिला विद्यार्थिनींची संख्या २.२४ कोटी झाली; २०१४-१५च्या तुलनेत ही ४२.२ टक्क्यांची वाढ आहे. ही प्रगती निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र शिक्षणानंतर रोजगाराच्या बाजारपेठेत महिलांचा सहभाग अजूनही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. या विरोधाभासातून कार्यक्रमाचा केंद्रबिंदू समजतो. मुलींना महाविद्यालयात आणणे पुरेसे नाही; त्यांना शिक्षण पूर्ण करून सुरक्षितपणे कामाच्या जगात प्रवेश करता आला पाहिजे. पदवी मिळणे आणि स्वावलंबी होणे यांत अंतर आहे. 'छात्रों की गूंज'ने महिलांच्या प्रश्नाला निवडणूक योजनांच्या चौकटीबाहेर नेऊन स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक मानसिकतेच्या पातळीवर आणले असे म्हणता येईल.

मनुस्मृतीत लिहिल्याप्रमाणे, महिला कधीही स्वतंत्र जीवन जगू शकत नाही यावर कार्यक्रमात राहुल गांधीं यांनी समर्पक टीका केली. ही केवळ एका ग्रंथावरील राजकीय टिप्पणी नसून ती स्त्रीला कायम कोणाच्या तरी अधीन मानणाऱ्या बारसाटलेल्या विचारपद्धतीविरुद्धची भूमिका होती. मुलगी कोणाचीतरी जबाबदारी नसून स्वतःच्या आयुष्याची निर्णयकर्ती आहे, हा विचार भारतीय लोकशाहीच्या केंद्रस्थानी यायला हवा.

'छात्रों की गूंज'हा कार्यक्रम पूर्णपणे राजकीय परिघाबाहेरचा आहे असे म्हणता येणार नाही. राहुल गांधी हे सक्रिय राजकारणी आहेत आणि कार्यक्रमाचे आयोजन काँग्रेसच्या पुढाकारातून झाले. त्यामुळे या उपक्रमात राजकीय हेतू असणारच. परंतु राजकारण म्हणजे केवळ पक्षीय आरोप-प्रत्यारोप नव्हेत. लोकांच्या वास्तविक अनुभवांना सार्वजनिक धोरणाच्या चर्चेत आणणे, हेदेखील राजकारणाचेच महत्त्वाचे कार्य आहे आणि हे कार्य त्या ठिकाणी पार पडले असे दिसते.

आज विद्यार्थी राजकारणाचा मोठा भाग पक्षीय निष्ठा, निवडणूक व्यवस्थापन आणि समाजमाध्यमांवरील प्रतिमानिर्मिती यांपुरता मर्यादित होताना दिसतो. शिक्षणाचा खर्च, स्पर्धा परीक्षांतील अनियमितता, प्रश्नपत्रिका फुटणे, बेरोजगारी, वसतिगृहांची कमतरता आणि मानसिक आरोग्य यांसारखे विषय चर्चेच्या केंद्रस्थानी येत नाहीत. 'छात्रों की गूंज'ने या मुद्द्यांना पुन्हा राजकीय व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला, ही त्याची जमेची बाजू आहे. मात्र कोणत्याही संवाद कार्यक्रमाची खरी कसोटी त्यानंतर सुरू होते. मुलींनी मांडलेल्या प्रश्नांचे काय होणार? सुरक्षित वाहतुकीसाठी ठोस आराखडा तयार होणार का? ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थिनींसाठी वसतिगृहांची संख्या वाढणार का? उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि स्वस्त कर्ज उपलब्ध होईल का? महाविद्यालयांतील लैंगिक छळविरोधी यंत्रणा सक्षम होईल का? या प्रश्नांची उत्तरे जर मिळाली नाहीत तर संवाद हा केवळ भावनिक अनुभव ठरेल.

राजकीय पक्षांनी महिलांना निवडणुकीपूर्वी लाभार्थी म्हणून नव्हे, तर धोरणनिर्मितीतील भागीदार म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. मुलींना फक्त सुरक्षित ठेवायचे नसते; त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य द्यायचे असते. त्यांच्यासाठीच्या योजना आखताना त्यांना प्रक्रियेत समाविष्ट करून त्याच्या आवाजाला प्रतिनिधित्व द्यावे असे वाटते. पुण्यातील 'छात्रों की गूंज'ने एक महत्त्वाचा संकेत दिला आहे. मुलींचा आवाज हा निवडणुकीच्या गणितातील आकडा नाही. तो समाजाच्या वर्तमानाचा आणि भविष्याचा आरसा आहे. धर्म, द्वेष आणि भीती यांच्या राजकारणापलीकडे शिक्षण, समानता आणि स्वातंत्र्य यांवर आधारित राजकारण उभे राहू शकते का, हा खरा प्रश्न आहे. पुण्यातील कार्यक्रमाने त्याचे उत्तर पूर्णपणे दिलेले नाही; पण तो प्रश्न ठामपणे सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणल हे निश्चित. लोकशाहीत बदलाची सुरुवात अनेकदा उत्तरांपासून नव्हे, तर योग्य प्रश्न विचारण्यापासून होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**ओंकार आदिनाथ काशिद**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ‘माझ्या मृत्यूला हेच जबाबदार!’ वनमजुराच्या अखेरच्या पत्राने वन विभाग हादरले

## ३३३९ कामगारांच्या अन्यायाविरोधात मृतक शुक्लांचा एल्गार, अण्णाभाऊंच्या शब्दांतून न्यायव्यवस्थेवरही सवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** हक्काचे वेतन, रोजगार आणि वनमजुरांच्या न्याय्य हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे पुसद सामाजिक वनीकरण विभागातील रोजंदारी वनमजूर तथा वनमजूर संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमाशंकर राममोहन शुक्ला यांच्या मृत्यूने वन विभागातील कथित भ्रष्टाचार, कामगारांवरील अन्याय आणि प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विष प्राशन करण्यापूर्वी शुक्ला यांनी लिहिलेल्या अखेरच्या पत्रात ३३३९ कामगारांवरील अन्याय, वन विभागातील कथित भ्रष्टाचार, रोजगाराचा प्रश्न आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत संताप व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, आपल्या मनातील व्यथा व्यक्त करताना त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शब्दांचा आधार घेत न्याय व्यवस्थेवरही तीव्र प्रश्न उपस्थित केला आहे.



शुक्ला यांच्या पत्रातील सर्वाधिक धक्कादायक भाग म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने नमूद केलेल्या या ओळी

**“ही न्यायव्यवस्था काही कांची रखेल झाली..**
**संसद विधानसभा देखील हिजड्यांची हवेली झाली..**
**मी माझी व्यथा मांडू कोणाकडे..**
**कारण इथली न्यायव्यवस्था भ्रष्टतेने रंगील झाली..”**

या ओळींच्या माध्यमातून शुक्ला यांनी सामान्य माणूस, गरीब कामगार आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तीच्या मनातील अस्वस्थता व्यक्त केली आहे. न्याय मिळण्यासाठी न्यायालयीन मार्गाचा अवलंब करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत त्यांच्या पत्रातून स्पष्टपणे दिसून येते. शुक्ला यांनी १५ जून २०१७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात संविधानाच्या कलम २२६ अंतर्गत याचिका दाखल केल्याचा उल्लेख पत्रात केला आहे. पडीक जमिनीवर सौरऊर्जा निर्मिती, पर्यावरणपूरक विकास, घनदाट वृक्षलागवड, ‘हरित महाराष्ट्र’ संकल्पना, स्थानिक कामगारांना रोजगार आणि वन विभाग भ्रष्टाचारमुक्त करण्याच्या उद्देशाने ही न्यायालयीन लढाई सुरू केल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सामान्य नागरिक आणि गरीब कामगारांना न्याय मिळावा, शासनाच्या विकासकामांना मदत व्हावी आणि कथित भ्रष्टाचाराला आळा बसावा, हा याचिकेमागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, याचिका दाखल करून जवळपास दोन महिने उलटूनही अपेक्षित उत्तर किंवा प्रतिसाद मिळाला नसल्याने आपला न्याय व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्याची व्यथा त्यांनी पत्रात व्यक्त केली आहे. वन विभागातील ३३३९ कामगारांवर झालेल्या कथित अन्यायाचा मुद्दा शुक्ला यांनी आपल्या अखेरच्या पत्रातून मांडला आहे. कामगारांचे हक्क, रोजगार आणि प्रलंबित देयके यासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविल्याचे सहकाऱ्यांचे म्हणणे आहे. पत्रात पारधी,शंकर मडावी, आरएफओ प्रमोदकुमार कुबरे आणि वनरक्षक चिकणे यांचा उल्लेख करत शुक्ला यांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ‘माझ्या मृत्यूचे कारण हेच असून, यांच्यामुळे जीवन संपवितो’, अशा आशयाचा उल्लेख पत्रात असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. मात्र, पत्रातील आरोपांची सत्यता अद्याप तपासातून सिद्ध झालेली नसून, संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका आणि संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. आपल्या मृत्यूनंतरही लढा सुरू राहावा, यासाठी शुक्ला यांनी कुटुंबीय आणि सहकारी कामगारांना पत्रातून भावनिक आवाहन केल्याचे सांगण्यात येते. जोपर्यंत या प्रकरणात ठोस निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेऊ नका, अशी सूचना त्यांनी केली होती. त्यामुळेच शुक्ला यांच्या मृत्यूनंतर संतप्त नातेवाईक आणि वनमजुरांनी मृतदेह थेट जिल्हाधिकारी कार्यालयात आणत जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठेवला. मृतदेहासह जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचलेल्या कुटुंबीयांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि न्यायाची मागणी केली.

### मुलीचा आक्रोश ‘माझ्या वडिलांना न्याय द्या!’

**जिल्हाधिकारी कार्यालयात मृतदेह आणल्यानंतर शुक्ला यांच्या पत्नी आणि मुलीचा आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता. ‘माझ्या वडिलांना न्याय द्या’अशी आर्त हाक मुलगी देत होती. तिचा आक्रोश नागरिक, कर्मचारी आणि उपस्थित वनमजुरांनी पाहिला. जिल्हाधिकारी विकास मीना व निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी कुटुंबीय आणि वनमजूर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर कुटुंबीयांनी मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेला.**

### आश्वासन पुरेसे की आता कारवाईही होणार?

**शुक्ला यांच्या मृत्यूनंतर आता केवळ आश्वासनावर हे प्रकरण थांबणार का, असा सवाल वनमजूर आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यांच्या अखेरच्या पत्रातील आरोपांची चौकशी कधी होणार? ३३३९ कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळणार का? पत्रात उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का? कुटुंबीयांना न्याय मिळणार का? आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे रमाशंकर शुक्ला यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन उपस्थित केलेले प्रश्न शासन गांभीर्याने घेणार का? शुक्ला यांच्या मृत्यूला जबाबदार कोण, त्यांच्या अखेरच्या पत्रातील आरोपांमध्ये किती तथ्य आहे आणि वन विभागातील कथित गैरप्रकारांची वस्तुस्थिती काय आहे, हे निष्पक्ष चौकशीतून समोर येणे गरजेचे आहे. आता शासनाने चौकशीच्या आश्वासनापलीकडे जाऊन ठोस कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. शुक्ला यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये आणि त्यांच्या अखेरच्या पत्रातील प्रत्येक आरोपाची सत्यता जनतेसमोर यावी, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**


---

# दिग्रसच्या हरसूलमध्ये घरातून सहा तलवारी जप्त

## अवैध शस्त्रसाठ्याने खळबळ स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २६ :** तालुक्यातील हरसूल येथे राहत्या घरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगणाऱ्या २५ वर्षीय तरुणास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेत त्याच्याकडून सहा धारदार लोखंडी तलवारी जप्त केल्या. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याचे स्पष्ट झाले आहे.



गणेश गजानन अंभोरे (वय २५, रा. हरसूल, ता. दिग्रस) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. २५ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिग्रस पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना अंभोरे याच्या घरात धारदार तलवारी असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांसह त्याच्या घराची झडती घेतली. झडतीदरम्यान घरातील खोलीत एका पोत्यात लपवून ठेवलेल्या चंद्राकार आकाराच्या, टोकदार व एका बाजूला धार असलेल्या सहा लोखंडी तलवारी आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांची अंदाजे किंमत सहा हजार रुपये आहे. या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध अप. क्र. ७१६/२०२६ अन्वये कलम ४, २५ आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दिग्रस पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे व पथकाने केली.

# डीजेचा दणदणाट टाळत उमरखेडमध्ये ईद-ए-मिलादची भव्य मिरवणूक

## धार्मिक उत्साहाला सामाजिक बांधिलकीची जोड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २६ :** पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा करण्यात येणारा ईद-ए-मिलादुन्नबी उत्सव उमरखेड शहरात उत्साह, भक्तिभाव आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ईद-ए-मिलाद उत्सव समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले.



विशेष म्हणजे यंदाची मिरवणूक डीजेमुक्त ठेवत ध्वनिप्रदूषणाला फाटा देण्यात आला. या निर्णयातून धार्मिक उत्सवाला शिस्त, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाची जोड देण्याचा आदर्श उमरखेडने घालून दिला. सकाळी ९ वाजता हजरत तातार शाह बाबा दर्गा येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. विविध मशिदींचे पदाधिकारी, मौलवी, उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच आबालवृद्ध मोठ्या संख्येने सहभागी झाले. आठवडी बाजार, शिवाजी वॉर्ड, नाग चौक, संजय गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी चौक मार्गे मिरवणूक सुवर्णपथक मार्गावरून पुढे गेली. मिरवणुकीच्या मार्गावर सामाजिक संघटना व नागरिकांनी पिण्याचे पाणी आणि फराळाची व्यवस्था केली होती. तसेच विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून धार्मिक उत्सवाला सामाजिक कार्याची जोड देण्यात आली. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. पोलिसांच्या दक्षतेमुळे मिरवणूक शांततेत पार पडली. डीजेमुक्त मिरवणुकीतून ‘धर्मासोबत सामाजिक सलोखा’ हा ठोस संदेश उमरखेडने दिला.

---

# यवतमाळमध्ये पैगंबर मोहम्मद साहेबांची १५०१ वी जयंती उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** पैगंबर हजरत मोहम्मद साहेब यांच्या १५०१ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ शहरासह जिल्ह्यात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्रद्धा, उत्साह आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात झालेल्या या कार्यक्रमांना मुस्लिम समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



जयंतीनिमित्त शहरातील विविध मशिदी व धार्मिक स्थळांची आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली होती. अनेक ठिकाणी नात-ए-पाक, धार्मिक प्रवचन, विशेष नमाज तसेच सामूहिक दुआचे आयोजन करण्यात आले. यावेळी उलेमा व धार्मिक विद्वानांनी पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या मानवतावादी शिकवणीवर मार्गदर्शन केले. पैगंबर मोहम्मद साहेब यांनी मानवजातीला शांतता, प्रेम, दया, समानता, न्याय आणि बंधुभावाचा संदेश दिला. गरजू व दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे, शेजाऱ्यांशी सलोख्याचे संबंध ठेवणे आणि समाजात परस्पर प्रेम व सौहार्द निर्माण करणे, ही त्यांच्या शिकवणीची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे वक्त्यांनी सांगितले. तरुण पिढीने या मूल्यांचा अंगीकार करून सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही करण्यात आले. जयंतीनिमित्त शहरातील विविध भागांत मिरवणुका काढण्यात आल्या. नात-ए-पाक आणि धार्मिक घोषणांनी परिसर भक्तिमय झाला होता. मिरवणुकीदरम्यान आयोजक, स्वयंसेवक आणि संबंधित यंत्रणांनी शिस्त, वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांच्या सुविधेकडे विशेष लक्ष दिले. यावेळी देशात अमन-शांती, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकता कायम राहावी, यासाठी विशेष दुआ करण्यात आली. गरीब व गरजू नागरिकांना मदत, शिक्षणाला प्रोत्साहन आणि मानवसेवेला प्राधान्य देण्याचा संदेश ही देण्यात आला. या विविध कार्यक्रमांना धार्मिक व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, उलेमा, सामाजिक कार्यकर्ते, जनप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या शिकवणीतील शांतता, प्रेम, न्याय आणि मानवतेची मूल्ये समाजजीवनात रुजविण्याचा निर्धार या जयंती सोहळ्यातून व्यक्त करण्यात आला.

# दिव्यांग मुलाने पैसे देण्यास नकार दिला..! संतापलेल्या वडिलांनी कुऱ्हाडीने संपविले जीवन

## सरूळ येथील धक्कादायक घटना, डोळा, कान व गालावर वार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २६ :** तालुक्यातील सरूळ येथे माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना घडली. पूर्णपणे दिव्यांग असलेल्या ३० वर्षीय मुलाची त्याच्याच ७१ वर्षीय वडिलांनी कुऱ्हाडीने घाव घालून हत्या केल्याची घटना बुधवार, २६ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरी घडली.




या घटनेमुळे सरूळ परिसरात खळबळ उडाली आहे.अरविंद भीमराव मेश्राम असे मृतकाचे नाव आहे. तो पूर्णपणे दिव्यांग असल्याने दैनंदिन जीवनासाठी कुटुंबीयांवर अवलंबून होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाच्या घरकुल व निराधार योजनेतून मिळालेल्या पैशांमधून आरोपी भीमराव मारोती मेश्राम याने अरविंदकडे व्यसनासाठी पैसे मागितले. मात्र अरविंदने पैसे देण्यास नकार दिल्याने वडिलांचा संताप अनावर झाला. संतापाच्या भरात भीमराव मेश्राम याने कुऱ्हाडीने अरविंदच्या उजव्या डोळ्यावर, कानावर आणि गालावर जोरदार वार केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अरविंदचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा व अन्य कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली. मृतकाची आई प्रेमिला भीमराव मेश्राम यांच्या फिर्यादीवरून आरोपी भीमराव मेश्राम याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार दीपमाला भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक आसकर करीत आहेत. दिव्यांग मुलाच्या हत्येच्या या घटनेने कुटुंबीयांसह परिसरात हळहळ व्यक्त होत असून, घटनेमागील नेमकी पार्श्वभूमी आणि इतर बाबींचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

---

# बाभूळगाव येथे मोहम्मद पैगंबर जयंती उत्साहात साजरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २६ :** येथे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली बुधवार ला सकाळी आठ वाजता शहरातील सर्व मुस्लिम बांधव जामा मशीद समोर एकत्र आले. तेथून मोहम्मद पैगंबर यांचा जयघोष करीत मिरवणुकीला सुरुवात झाली. गावातील प्रमुख मार्गाने फिरून सदर मिरवणूक बाबा हुसेन शहा यांच्या दर्गेवर पोचल्या नंतर फुलांची चादर चढविण्यात आली. यावेळी जामा मशीदचे मौलाना मोहम्मद सलाउद्दीन यांनी देशाच्या एकते अखंडते करिता प्रार्थना केली.



या नंतर मशीद मध्ये आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी घेतला. मिरवणुकीच्या रस्त्यात बाल गोपालां साठी मिठाई, दूध, बिस्किटे वाटण्यात आली.

येथील इंदिरा चौकात पी एम बी शाळेच्या विद्यार्थ्यांनी हम सब एक है चा नारा देत विशेष सादरीकरण केले. मिरवणुकी मध्ये हाजी अबूबकर, जामा मशीद ट्रस्टचे अध्यक्ष आरिफ अली, अब्दुल रहीम ठेकेदार, नगर पंचायतीचे उपाध्यक्ष बल्लू जगताप, शेख कादर, शेख अब्बास, शेख जब्बार, शेख अहेमद, शेख युसुफभाई, मोहम्मद रियाज, शहजाद शेख, शेख आसिफ, कादर घाची, शेख मन्नान, असदुला खान, जयरूल्लाभाई, समीर घाची, बब्बूभाई मर्दान खान, एजाज मिस्तरी, आरिफ घाची, शेख रफिक, शेख सोनू, शेख रोशन, हाशम पेंटर, शेख सलीम, तंजीम भाई, इरफान मेमन, शेख महंमद भाई, शेख जावेद, शेख शरीफ, शेख नइम, सय्यद समीर, शेख दानिश, जाकीर मुल्ला, अवसाफ अली, शाहनवाज अली आदी सहभागी झाले होते.

# ईदचा उत्सव रक्तदानातून मानवतेला समर्पित..! पांढरकवड्यात १४२ युनिट रक्त संकलित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २६ :** ईद मिलादुन्नबीचा उत्सव केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित न ठेवता मानवसेवेचा संदेश देत पांढरकवडा येथे २६ ऑगस्ट रोजी भव्य ऐच्छिक रक्तदान शिबिर घेण्यात आले. ‘मुस्लिम युवावर्ग पांढरकवडा’ आणि ‘एकनील ब्लड सेंटर, यवतमाळ’ यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद नागेश्वर जिड्डेवार भवन येथे आयोजित या शिबिरात तब्बल १४२ युनिट रक्त संकलित करण्यात आले.




जामा मशिदीचे अध्यक्ष मौलाना काजी गजनफर साहब यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी मौलाना अबूजर कासमी, उपनगराध्यक्ष आतिश चव्हाण, पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे, सभापती शैला मन्सूर पटेल, बांधकाम सभापती प्रफुल जिड्डेवार, नगरसेवक स्वप्निल उपलवार, माजी नगरसेवक साजिद शरीफ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे या रक्तदान उपक्रमात विविध समाजातील युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविले. ‘रक्ताला जात-धर्म नसतो. गरजूचा जीव वाचविणे हीच खरी माणुसकी’ हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. रक्तसंकलनाची प्रक्रिया एकनील ब्लड सेंटरच्या वैद्यकीय पथकाने सुरळीतपणे पार पाडली. धार्मिक उत्सवाला मानवसेवेची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

---

## थोडक्यात



### सवना केंद्राच्या केंद्रप्रमुख पुजा वानखेडे यांची वेणी (बु) शाळेला भेट

**महागाव:** सवना केंद्राच्या नवनियुक्त केंद्रप्रमुख पुजा वानखेडे यांची वेणी शाळेला सदिच्छा भेट. शाळेच्या परिपाठाला उपस्थिती राहून व परिपाठ पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासाचे महत्व समजावून सांगितले. यावेळी शाळेच्या वतीने आदरणीय पुजा वानखेडे, बोबडे , यांचा आदरणीय मंगिता पवार यांच्या हस्ते व आमचे मित्र आदर्श शिक्षक आदरणीय हिराकांत बोबडे यांचा स्वच्छतेचे पुजारी जेष्ठ शिक्षक गणेश शिंदे सर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या आदर्श जोडीच्या शुभहस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गजानन नांदेडकर,नारायण मुरमुरे सर,गजानन गावंडे सर,दिपक काराणी सर उपस्थित होते.

### फेरफार मंजुरी वरून महसूल विभाग संशयाच्या भोवऱ्यात..!

**शेतकऱ्याचा १ सप्टेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा**

पुसद : मौजा अश्विनपूर (वरुड) येथील शेतकरी तुकाराम हरी आडे यांच्या मालकीच्या गट क्रमांक २३/२/अ मधील २ हेक्टर ४० आर जमीन व ५९ आर पोटखराब क्षेत्राच्या फेरफारावरून महसूल विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित फेरफार तात्काळ रद्द करून नायब तहसीलदार पुसद, मंडळ अधिकारी वरुड व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) वरुड यांना निलंबित करावे, अशी मागणी आडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.या जमिनीबाबतचा वाद वरिष्ठ दिवाणी न्यायालय, पुसद येथे सुरू असून, न्यायालयाने २८ जुलै २०२६ रोजी नायब तहसीलदारांना आवश्यक पक्षकार मानून सीपीसी कलम ८० अन्वये नोटीस देण्याचे आदेश दिल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यानुसार ३१ जुलै रोजी नोटीस बजावण्यात आली होती. दरम्यान, २० ऑगस्ट रोजी फेरफाराबाबत हरकत नोंदविण्याची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. आडे यांनी २४ ऑगस्ट रोजी वकिलामार्फत कायद्यानुसार हरकत दाखल करण्यासाठी महसूल कार्यालय गाठले. मात्र, अर्ध्या तासाने हरकत स्वीकारण्याचे सांगून नंतर मंडळ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले. तेथे गेल्यानंतर अवघ्या काही वेळापूर्वीच फेरफार मंजूर झाल्याचे सांगण्यात आल्याचा आरोप आडे यांनी केला आहे. न्यायालयीन वाद सुरू असताना आणि हरकत दाखल करण्याची संधी असतानाच फेरफार मंजूर झाल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांचे लिलाबाई देशमुख यांच्याशी नातेसंबंध असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

फेरफार दोन दिवसांत रद्द करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास १ सप्टेंबर २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण करण्याचा इशारा तुकाराम आडे यांनी दिला आहे.

### नेपाळच्या पुरात यवतमाळचे पर्यटक अडकले? प्रशासन सतर्क..!

**आपत्कालीन केंद्राशी संपर्काचे आवाहन**

**यवतमाळ :** नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पुरामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, या भागात असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संभाव्य धोका लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने यवतमाळ जिल्ह्यातील नेपाळमध्ये गेलेल्या पर्यटकांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे. पूरस्थिती मुळे नेपाळमध्ये अडकलेले यवतमाळ जिल्ह्यातील पर्यटक किंवा ज्यांचा आपल्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.माहिती देताना संबंधित पर्यटकाचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण अथवा हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास देणे आवश्यक आहे. या माहितीच्या आधारे प्रशासनाकडून संबंधित पर्यटकांचा शोध घेऊन त्यांच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक समन्वय साधला जाणार आहे.

दरम्यान, आपत्तीग्रस्त भागातील परिस्थितीबाबत नागरिकांनी अफवा किंवा अपुऱ्या माहितीकडे लक्ष न देता अधिकृत यंत्रणेशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक माहिती मिळवून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, यवतमाळ :**
**दूरध्वनी : ०७२३२-२४०७२०**
**व्हॉट्सअ‍ॅप : ८३०८७५४४७३**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी तथा, भुसंपादन अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय,

E-mail :- sdo amravatit gmail.com     Ph. No. 0721-2565023

क्र.स.म.अ./भू.स.अ.वि.अम./कावि ४८०/२०२६     दि. १४/०८/२०२६

**कलम ११**

**(भूमीसंपादन पुनर्वसन, व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळणेचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**भूसंपादन प्रकरण क्र.:- ९/४७/२०२६-२७ मौजा- वडगांव जिरे, ता. जि. अमरावती**

मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे क्रमांक-अ. का/भूसंपादन/कावि-३९२/२०२६दिनांक-२७/०७/२०२६ आदेशानुसार

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतूकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११ २०१४/प्र.क्र.७७/अ-२. दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनयमाच्या कलम ३ च्या खंड (झेड- अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्रा करीता जमीन संपादन करण्याचे संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त मार्वजनिक प्रयोजन असा आलेला आहे) आवश्य आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून उक्त अधिनियमाचे **कलम ११ च्या पोट कलम (१)** च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे :

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत); आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जाडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषीत करण्यात येत आहे. की, उक्त अधिनियमाच्या **कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार** कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही . किंवा उक्त जमिनीवर जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही .

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केलेमुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी, यांचेकडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या **कलम ११ च्या पोट कलम (५)** अनुसर, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहीत केलेप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.**

भूसंपादन प्रस्तावाशी संबंधीत कलम ११ ची अधिसूचना, कलम १९ अधिसूचना व प्रारूप निवाडा मंजूरी इत्यादी प्रस्ताव जिल्हाधिकारी, यांचेकडे न पाविता भूसंपादन अधिकारी यांनी स्वतःचे स्तरावर कार्यवाही करुन अंतिम निवाड्यासह भूसंपादनाची पुर्ण प्रक्रिया पार पाडावी असे मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र.अ.का./प्र.अ./भूसंपादन/कावि-३१८/२०२५, दि. ०८/०७/२०२५ अन्वये, कळविण्यात आले आहे. त्यानूसार भूसंपादन प्रकरणात कार्यवाही करण्यात येत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

गांव- **वडगांव जिरे,**   तालुका - **अमरावती**   जिल्हा - **अमरावती**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ३/१ | २.०८ |
| २ | ३/२ | |
| ३ | ३/३ | |
| ४ | ४/१ | १.०४ |
| ५ | ४/१/अ | |
| ६ | ४/२ | |
| ७ | ८/१ | १.५५ |
| ८ | ८/१/अ | |
| ९ | ८/२ | |
| १० | ८/३ | |
| ११ | ९/१ | २.३१ |
| १२ | ९/१/अ | |
| १३ | ९/२ | |
| १४ | ९/३ | |
| १५ | ९/४ | |
| १६ | १०/१ | ०.०१ |
| १७ | १०/२ | |
| १८ | १०/२/अ | |
| १९ | १०/३ | |
| २० | १०/४ | |
| २१ | १०/३/अ | |
| २२ | ४९/१ | ०.२४ |
| २३ | ४९/१/अ | |
| २४ | १९/१/ब | |
| २५ | ४९/२ | |
| २६ | ४९/३ | |
| २७ | ४९/४ | |
| २८ | ४९/५/अ | |
| २९ | ४९/७ | |
| ३० | ५३/१ | २.३४ |
| ३१ | ५३/१/अ | |
| ३२ | ५३/२ | |
| ३३ | ५४/१ | २.१३ |
| ३४ | ५४/१/अ | |
| ३५ | ५४/२ | |
| ३६ | ५५/१ | १.५७ |
| ३७ | ५५/२ | |
| ३८ | ५५/३ | |
| ३९ | ५५/४ | |
| ४० | ५५/४/अ | |
| ४१ | ५६/१ | ०.५५ |
| ४२ | ५६/१/अ | |
| ४३ | ५६/२ | |
| ४४ | ५६/३ | |
| ४५ | ५६/४ | |
| ४६ | ६०/१ | |
| ४७ | ६०/२ | ०.८६ |
| ४८ | ६०/३ | |
| ४९ | ६०/४ | |
| ५० | ६०/५ | |
| ५१ | ६०/६ | |
| ५२ | ६०/७ | |
| ५३ | ६०/८ | |
| ५४ | ६०/९ | |
| ५५ | ६१/१/अ | ०.६५ |
| ५६ | ६१/२ | |
| ५७ | ६१/३ | |
| ५८ | ६१/१/ | |
| ५९ | ६३/१/अ | ३.४१ |
| ६० | ६३/१/ब | |
| ६१ | ६३/१/क | |
| ६२ | ६३/४/अ | |
| ६३ | ६३/५ | |
| ६४ | ६३/५/अ | |
| ६५ | ६३/६ | |
| ६६ | ६४ | १.९८ |
| | **एकुण** | **२०.७२** |

## प्रगती दिनेश कल्पेकर ठरली ‘कौन बनेगा करोडपती’ ची यशस्वी स्पर्धक

**अमरावती / का.प्र.**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयात लिपिक-नि- टंकलेखक पदावर कार्यरत कु. प्रगती दिनेश कल्पेकर हीने सोनी टिव्हीवरील ‘कौन बनेगा करोडपती’ या बहुचर्चित, सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धात्मक कार्यक्रमात विविध काठिण्यपातळ्या पार करीत प्रवेशित होऊन बिगबी श्री अमिताभ बच्चन यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत तीन? फे-या पूर्ण करून ५ लाखांचे मोठे बक्षिस पटकावले आहे. वाचन, मनन आणि स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाचा छंद जोपासलेल्या कु. प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रारंभी प्राथमिक प्रवेश फेरीत विविध कठीण चाचण्या व संगणकाद्वारे ह्दस्त्व निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये कु. प्रगती हीने मारलेली धडक अत्यंत कौतुकास्पद व लक्षवेधी ठरली. त्यानंतर केबीसीच्या चमूकडून संपर्क साधून तिला स्पर्धेसाठी बोलावले गेले. मागील आठवड्यात ही स्पर्धा खेळली गेली. प्रथम ‘फास्टेस्ट बझर फर्स्ट’ या चाळणी पद्धतीमध्ये केवळ काही मिलीसेकंदांचा फरकही कोणाची निवड होणार हे ठरवू शकतो.

त्यामुळे अंतिम निकाल हा केवळ ज्ञानावर नव्हे, तर वेळेचे अचूक भान, क्षणातील प्रतिक्रिया आणि काही प्रमाणात नशिबावरही अवलंबून असतो. यातही ती अव्वल ठरली व बिगबीच्या समोरील ‘हॉटसीट’ची ती मानकरी ठरली. प्रगतीच्या ‘कौन बनेगा करोडपती’ या स्पर्धेच्या चित्रीकरणाचे एपिसोड गुरुवार २७ ऑगस्ट आणि शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सोनी टीव्हीवर दोन भागात प्रसारित होणार आहेत. अमरावतीकर आपण सर्वांनी एपिसोड नक्की पाहावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :-** वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प मुख्य जोडकालवा - २

**प्रकल्प कार्याचे वर्णन :-** वैनगंगा -नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळयात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून तापणी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याव्दारे वर्लावणं प्रस्तावित आहे.

**समाजाला मिळणारे लाभ:-** वैनगंगा -नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भ वासियांसाठी महत्वाकांशी प्रकल्प असून या प्रकल्पामुळे विदर्भांतील निर्मित सिंचन क्षमता टक्केवारी वाढण्यास मदत होणार आहे.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.:-** विस्थापनाची आवश्यकता नाही. - सबब माहिती निरंक

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

(सामाजिक प्रभाग निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश, दिनांक-१३ मार्च २०२५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकिर्ण१/२०१५/प्र.क्र.३/अ-२.नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम** :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

**(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता:-** निरंक

**(क) ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील** :-निरंक

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उनविभागीय अधिकारी तथा, भूसंपादन अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक :-१४/०८/२०२६
ठिकाण :- अमरावती

**उपविभागीय अधिकारी
तथा, भुसंपादन
अधिकारी, अमरावती**

जिमाका/अम/जाहि/९४/२०२६

# अघोरी मेटा'

गेल्या महिन्यात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विद्यार्थ्यांना आवाहन करणारी फेसबुक पोस्ट काढल्यावरून सर्वत्र रणकंदन माजले. मेटाचे संस्थापक मार्क झुकरबर्ग यांनी आस्थापनाकडून झालेली चूक मान्य केली आणि मोदी यांची पोस्ट काही घंट्यात पूर्ववत करण्यात आली. परंतु त्यावेळी चे राजकीय, सामाजिक आणि १४० कोटी जनतेच्या राष्ट्रीय आस्थिरतेचे वातावरण संवेदनशील भारतीयांना विसरता येणे शक्य नाही. फेसबुकच्या अशा अक्षम्य चुकांचा पाढा न संपणारा आहे. झुकरबर्ग यांची समाजाची क्षमायाचना करण्याची सवय ही काही नवीन नाही.

गेल्या दोन दशकापासून फेसबुक आणि दीड दशकाहून अधिक काळापासून इन्स्टाग्राम यांनी मनुष्याला विशेष करून तरुणांना वश केले आहे. स्वतःला जागतिक शर्यतीत 'रेलेव्हँट' ठेवून मेटा यशस्वी तर झाले. परंतु मनुष्य प्राण्याला त्याची किंमत कुठवर मोजावी लागली आहे या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित आहे.मेटाने मानवी मनाचा अचूकपणे वेध घेतला परंतु तो स्वतःचे खिसे भरण्यासाठी. अमेरिकेतील तब्बल २९ राज्ये आज फेसबुक आणि इन्स्टाग्राम यांची पेरंट कंपनी(मूळ आस्थापन)मेटाच्या विरोधात दंड थोपवून उभी आहे. लहान मुलांच्या मनाच्या कोवळेपणाचा ठाव घेऊन, प्रसंगी त्यांचे प्राण संकटात टाकून मेटा अब्जावधी रुपये कमवत आहे.मुलांना सामाजिक माध्यमांच्या आहारी नेण्यात मेटाचा अघोरीपणा समोर आणला जात आहे.यावर कॅलिफोर्नियाच्या संघीय न्यायालयात १८ ऑगस्ट पासून सुनावणी सुरू झाली आहे.

अमेरिकेत 'चिल्ड्रन्स ऑनलाईन प्रायव्हसी प्रोटेक्शन ॲक्ट'हा कायदा अस्तित्वात आहे.इंटरनेट समाजात रूढ होण्याच्या काळात म्हणजे वर्ष २००० मध्ये हा दूरदर्शी कायदा अस्तित्वात आला.ऑनलाइन आस्थापना कडून तेरा वर्षाखालील मुलांना लक्ष केले जाण्यापासून त्यांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने हा कायदा आहे. मेटाला न्यायालयात खेचणाऱ्या अमेरिकेतील २९ राज्यांनी नेमके याच सूत्रावर बोट ठेवले आहे.ते सांगतात की जर फेसबुक प्रणालीला (अल्गोरिदमला ) लक्षात आले की अमुक वापरकर्ता हा १३ वर्षाखालील मुल आहे, तर ती त्याचे खाते डिलीट करते, परंतु 'इन्स्टाग्राम' वरही ते मूल असेल, तर ते खाते काढले जात नाही. म्हणजे ते मूल त्याला किती धोका असला तरी इन्स्टाग्राम वर अव्याहात वापरात राहू शकते. त्यामुळे 'कोप्प्या ' कायद्याचे हे उल्लंघन असल्याचे याचिकाकर्ते म्हणतात. ' इनफायनाईट स्क्रोलिंग ','लाईक' 'ऑटोप्ले' ची सुविधा,'इंस्टाग्राम स्टोरी' आदी गोष्टी मुलांच्या लक्ष वेधून घेण्याच्या दोषाला कैकपटीने वाढवत असल्याने त्यावर प्रतिबंध आणण्याच्या मागण्याही याचिकेतून करण्यात आल्या आहे.

बालिशपणा, अपरिपक्वता, अस्थिरता अशा नानाविध गोष्टींनी मुलांचे मन नटलेले असते. त्यांना कोणत्याही प्रकारची कृती करण्यास हा कोवळेपणा प्रवृत्त करत असतो. तारतम्य, संयत विचार, मनातील भावभावना वरील नियंत्रण यासाठी आवश्यक बौद्धिक सुज्ञता त्यांच्यापाशी खाचित नसते.त्यांच्या मनावर होत असलेले आघात आणि त्या आघाताला त्यांचे मन कशा प्रकारे प्रतिसाद देणार हे त्यांच्या जडणघडणीवर ठरते.हे सर्वकालिक सार्वत्रिक सत्य आहे मुळात ज्या वयात कुणा प्रौढ व्यक्तीचा आधार आणि मार्गदर्शन यांच्या साह्याने मुले मोठी झाली पाहिजेत त्या काळात आज ही सामाजिक माध्यमे भूमिका निभवतात.मुलांची मने घडवण्यात या माध्यमांचा मोठा वाटा आहे.या पार्श्वभूमीवर आजच्या पिढ्यांचा विचार झाला पाहिजे. ते करण्याचे दायित्व फेसबुक आणि इंस्टाग्राम यांनी झटकून टाकले आहे.किंबहुना किशोरवयीन मुलांच्या वयात आल्यावर निर्माण होणाऱ्या नैसर्गिक समस्यांचा गैरवापर स्वतःच्या आर्थिक भरभराटीसाठी ही माध्यमे करत असल्याचे पहावयास मिळते.'जेन झी' आणि 'जेन अल्फा' या मुलांच्या मानसिक अवस्था कोणत्या थराची आहे हे जग जाणते. तसे पाहिले तर पुढची पिढी ही मागच्या पिढीपेक्षा अधिक सरस, अधिक बुद्धिमान अधिक सशक्त असते. जेन झी चा विचार केल्यास चित्र तेवढेसे आशावादी नाही. शिक्षण आणि तांत्रिक क्षमता यांत उत्कृष्ट कामगिरी करत असूनही ही मुले अशी पहिली पिढी असू शकते, जिच्यात अनेक महत्त्वांच्या निर्देशकांमध्ये विशेषता मानसिक आरोग्यांमध्ये स्पष्टपणे उतरती कळा लागलेली आहे.'फ्रंटिअर्स'या संशोधकांच्या जागतिक माध्यमावर प्रकाशित जर्मनीच्या 'ब्रेमेन' विद्यापीठाचा संशोधनात मानवी जीवनाच्या भविष्यावर गंभीर प्रश्न उपस्थित करतो.




या शोध प्रबंधात तरुण पिढी मधील 'मानसिक आरोग्याचा ऱ्हास हे एकविसाव्या शतकातील सार्वजनिक आरोग्या पुढील एक प्रमुख संकट आहे' असे स्पष्ट केले आहे. विद्यापीठाने सर्वेक्षण म्हणून ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड किंगडम या विकसित राष्ट्रातील किशोरवयीन आणि तरुण प्रौढ यांचा अभ्यास केला. त्यानुसार गेल्या दशकात मानसिक अस्वस्थता, चिंता आणि नैराश्य च्या लक्षणात मोठी वाढ झाली आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना आणि अनेक वैद्यकीय अहवालही याच गोष्टी जोरजोरात ओरडून सांगत आहे. मुलांमधील वाढत चाललेला आत्मविश्वासाचा अभाव, रागीटपणा, हिंसक मनोवृत्ती, असूया, द्वेष येथ पासून आत्महत्या आणि हत्या येथ पर्यंत ही मुले पुढे गेलेली आहे. या भयंकर परिस्थितीचा संताप म्हणून अमेरिकेत मेटाविरोधी वातावरण निर्माण झालेले आहे.हा परिणाम केवळ सामाजिक स्तरावरच मर्यादित राहिलेला नाही तर त्याची व्याप्ती राजकीय स्तरावरही दिसून येत आहे.'जेन झी'आंदोलने आणि त्यातून काही देशात झालेले सत्तापालट होण्यामागे मुलांच्या अपरिपक्व मनांचा ठाव घेतला गेला.त्यांना इंस्टाग्राम, डिस्कार्ड, रेडिट या सामाजिक माध्यमातून चिथवण्यात आले. गेल्या महिन्यात जंतर-मंतर येथील हिंसाचारी आंदोलनाचे षडयंत्र 'माइनक्राफ्ट' या ऑनलाइन गेम च्या संकेतस्थळावर बनवण्यात आलेल्या गटात शिजले अशी विश्वासार्थ माहिती आहे. त्यामुळे मेटा यांच्यासारख्या आस्थापनांच्या अर्थकारणासाठी मनुष्याच्या भावी पिढीला संकटात टाकणे हा स्वार्थांधतेचा अतिरेक नाही तर अच्युत टोक आहे. ज्या प्रकारे एखादा आघोरी माणूस तंत्र मंत्र याच्या साह्याने लहान मुलांना वश करत असे आणि त्यांची हत्या करून त्यास 'नरबळी' चा मुलामा देत असे, तेच काम आज मेटा सारखी आस्थापने करत आहे. वेळ हाताबाहेर जाण्याआधीच पालकांनो जागृत व्हा आणि मुलांचे या आधुनिक पैशाचिक अधोरी षडयंत्र पासून रक्षण करा. तरुण पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी सामाजिक माध्यमांचे नियमन करण्यासह पालकांद्वारे मुलांचे नियंत्रण ही काळाची आवश्यकता आहे.

**लीना गाडगीळ**

# युपीआय डिजिटल पेमेंट विरुद्ध नगद/कॅश!

एका बाजूला युपीआय मधील डिजिटल व्यवहार आणि त्यांचे रुपयातील मूल्य यांचे आकडे आकाशाकडे झेपावत आहेत आणि त्याचवेळी भारतीय अर्थव्यवस्थेतील नगद/कॅश कमी न होता वाढतच आहे. याची मुळे ना रिझर्व्ह बँकेच्या धोरणात आहेत ना NPCI च्या तंत्रज्ञानात. तीच ती पुरातन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील जुनाट / मुरलेल्या रोगात आहेत.




बरोबर दहा वर्षांपूर्वी २५ ऑगस्ट २०१६ आपल्या देशात युपीआय (United Payments Interface) ही डिजिटल पेमेंट लॉन्च झाली. २०१६-१७ या पहिल्या वर्षात युपीएआय वापरून १.७८ कोटी व्यवहार झाले होते. २०२५-२६ मध्ये २४,००० कोटी व्यवहार झाले.म्हणजे त्यात १३,००० पट वाढ झाली.यात अजून वाढ होणार आहे हे नक्की २०१६-१७ मध्ये या व्यवहाराचे रुपयातील मूल्य ७००० कोटी रुपये होते. २०२५-२६ मध्ये त्याचे मूल्य ३१४ लाख कोटी रुपये होते. म्हणजे ४००० पट वाढ.(सर्व आकडेवारी लोकसत्ता २५ ऑगस्ट, पान क्रमांक ११)

डिजिटल देयकांचे व्यवहार आणि मूल्य दरवर्षी exponentially / घातांकी पद्धतीने वाढत असताना चलनातील नगद (कॅश इन सर्क्युलेशन) देखील दुहेरी अंकातील वृध्दीदराने वाढत आहे.अर्थव्यवस्थेत किती नोटा चलनात आहेत याचा एक धागा अर्थव्यवस्थेच्या आकाराशी असणार हे कॉमन सेन्सिकल आहे. अमेरिकेची जीडीपी ३२ ट्रिलियन डॉलर्स, युरोपियन युनियनची २३ ट्रिलियन डॉलर्स आणि भारताची ४ ट्रिलियन डॉलर्स पेक्षा थोडी जास्त आहे.

**आता नगदीचे आकडे**

सध्या भारतात १७६ अब्ज, (१७६०० कोटी) छोट्या मोठ्या दर्शनी मूल्यांच्या नोटा चलनात आहेत. तर अमेरिकेत ५६ अब्ज नोटा वापरात होत्या तर युरोझोन मध्ये ३० अब्ज नोटा.राज्यकर्ते देशाचा विकास म्हणजे जीडीपी असे कानीकपाळी ओरडत रहातात. पण नगद/कॅश आणि जिडीपीचे व्यस्त गुणोत्तर विषम आर्थिक विकासाचे लक्षण आहे हे ते तुम्हाला सांगत नाहीत. डिजिटल पेमेंट साठी स्मार्टफोन, इंटरनेट आणि सक्रिय बँक अकाउंट (जनधन वाला नाही ) अत्यावश्यक आहेत.

देशात ७० कोटी स्मार्ट फोन वापरले जातात. एकूण प्रौढ नागरिकांच्या संख्येच्या मानाने हा आकडा चांगला वाटेल. पण सत्य हे आहे की सध्या एकापेक्षा जास्त स्मार्टफोन असणाऱ्या नागरिकांनी संख्या प्रचंड आहे. शहरात तर अगदी मध्यम/निम्न मध्यमवर्गातील व्यक्तींकडे देखील दोन स्मार्टफोन सहज दिसतात.युनिक स्मार्टफोन धारक किती आहेत माहित नाही; पण हा आकडा अधिक सत्य सांगेल.

याचेच प्रतिबिंब युपीएयाय व्यवहारांचे वाढते आकडे आणि मूल्यांमध्ये आहे.त्याच व्यक्ती दिवसातून बऱ्याचवेळा डिजिटल देयकांचे व्यवहार करतात.भारतीय अर्थव्यवस्थेचे कोणत्याही कोनातून डिसेक्शन करा.पुन्हा पुन्हा त्याच त्याच चोक पॉईंट पाशी येऊन गाडी अडकते: आर्थिक विषमता, डिजिटल डिव्हाइड, शहरी ग्रामीण डिव्हाइड, पुरुष स्त्री डिव्हाइड!

डिजिटल देयकांसाठी स्मार्ट फोन, स्मार्ट फोन विकत घेण्याएवढी क्रयशक्ती, हवी तेव्हा त्याच्या चार्जिंग सोय देणारा अव्याहत वीज पुरवठा आणि २४ तास इंटरनेट कनेक्टिव्हिटी अत्यावश्यक आहे. हे आहेत चोक पॉईंट्स.महानगरे / शहरे बाजूला काढूया. पण ग्रामीण, नीम शहरी भागात अल्प उत्पन्न कुटुंबात, सूक्ष्म आर्थिक उद्योगात, त्या भूभागातील आर्थिक व्यवहारात आजदेखील मोठ्या प्रमाणावर नगदच वापरली जाते

अर्थ अडाणी लोक अंगावर येतील, म्हणजे तुम्ही काय डिजिटल पेमेंट प्रणालीचा जो विस्तार होत आहे त्याच्या विरोधी आहात का? त्यांच्याकडे दुर्लक्ष करा.खरेतर डिजिटल पेमेंटचा सर्वात मोठा लाभ छोट्या रकमांच्या व्यवहारात,अर्थ निरक्षर लोंकाना,जे केल्याने ज्यांचा अनुत्पादक वेळ वाचू शकतो ष्ठत्यांना होतो/भविष्यात देखील होईल.

या गरीब लोकांना डिजिटल पेमेंटचे लाभ सांगत लेक्चरबाजी करण्याची गरज नाही. त्यांची स्मार्टफोन घेण्याएवढी क्रयशक्ती कशी वाढेल,त्यांचे खरेदी विक्रीचे दैनंदिन आर्थिक व्यवहार काही पटींनी कसे वाढतील,अव्याहत वीज आणि इंटरनेट सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात कशी खेळवता येईल यावर धोरणकर्त्यांनी काम करण्याची गरज आहे.

**- संजीव चांदोरकर**

# 'जेन-झी' शी थेट संवाद वाढवण्यासाठी...

२०१६ पूर्वी भारतात मोबाईल कंपन्यांची स्पर्धा साधारण एकाच प्रकारे चालत होती.एका कंपनीचा कॉल रेट ६० पैसे असेल, तर दुसरी ५० पैसे करणार. कुणी रात्रीचे कॉल स्वस्त करणार, कुणी रोमिंग पॅक देणार. ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी कंपन्या त्याच जुन्या मॉडेलमध्ये थोडे इकडे-तिकडे करत होत्या.मग Reliance Jio आले.

Jio ने Airtel, Vodafone किंवा Idea पेक्षा कॉलचे दर आणखी पाच-दहा पैसे कमी करण्याचा प्रयत्न केला नाही.त्यांनी सरळ सांगितलें voice calls free.आणि लक्ष कॉलवरून डेटा कडे वळवले.२०१६ ला Jio ने मोफत voice calling आणि त्या वेळच्या बाजारभावापेक्षा प्रचंड स्वस्त डेटा आणला. काही महिन्यांत प्रश्नच बदलला.

पूर्वी ग्राहक विचारायचा,'एका मिनिटाला किती पैसे?'आता तो विचारू लागला,'दिवसाला किती GB?'स्पर्धक तेच होते. ग्राहकही तेच होते.पण खेळ बदलला होता. कारण मैदान बदलले होते. Buckminster Fuller यांचे एक वाक्य आहे.'You never change things by fighting the existing reality. To change something, build a new model that makes the existing model obsolete.' म्हणजे अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेशी सतत झगडत बसून बदल घडत नाही. असा नवा पर्याय निर्माण करा की जुनी व्यवस्था हळूहळू अप्रासंगिक वाटायला लागेल.

गेल्या काही आठवड्यांत राहुल गांधींच्या राजकारणाकडे पाहताना मला हे वाक्य आठवत आहे.कारण 'छात्रों की गूंज' हा केवळ आणखी एक राजकीय कार्यक्रम म्हणून पाहिला, तर त्यात फारसे नवीन काही दिसणार नाही.राजकारणी विद्यार्थ्यांना भेटतात. सभा घेतात. भाषणे करतात. हे पूर्वीही होत आले आहे.पण फॉरमॅट नीट पाहिला, तर थोडा वेगळा प्रयोग दिसतो.

कोटामधून सुरू झालेला हा उपक्रम नंतर देहरादून, प्रयागराज आणि आता पुण्यापर्यंत पोहोचला.पुण्यातील कार्यक्रम तर फक्त विद्यार्थिनींसाठी ठेवण्यात आला. त्यांच्या सुरक्षिततेपासून संधी, समानता आणि स्वातंत्र्यापर्यंतचे प्रश्न थेट त्यांच्याकडून ऐकले गेले.आणि इथे मला अधिक महत्त्वाची गोष्ट दिसते.आपल्या पारंपरिक राजकीय सभेची रचना काय असते?नेता स्टेजवर.हजारो लोक खाली.नेता बोलणार.लोक ऐकणार.शेवटी घोषणा.'छात्रों की गूंज'मध्ये किमान बाह्य स्वरूप तरी उलट करण्याचा प्रयत्न आहे.विद्यार्थी बोलतात. प्रश्न विचारतात. स्वतःचे अनुभव सांगतात. नेता त्यावर प्रतिक्रिया देतो.म्हणजे नेता हा केवळ संदेश देणारा राहात नाही; तो संवादात सहभागी होतो. हा फार छोटा बदल वाटेल.पण हा संवादातील power equation पूर्णपणे बदलून टाकतो.



विशेषतः Gen Z बाबतीत.ही पिढी तासभर भाषण ऐकण्यापेक्षा दोन मिनिटांचा खरा संवाद पाहण्याची शक्यता जास्त आहे. त्यांना polished manifesto पेक्षा त्यांच्यासारख्याच एखाद्या विद्यार्थ्याने विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न जास्त महत्वाचा वाटू शकतो.(आणि त्या एका प्रश्नापासून शेकडो content pieces तयार होऊ शकतात. म्हणजे कार्यक्रम मैदानावर होतो, पण खरी सभा Instagram आणि YouTube वर भरते.)

राहुल गांधींसाठी कदाचित हाच महत्त्वाचा बदल आहे.गेली अनेक वर्षे विरोधक नरेंद्र मोदी आणि BJP यांच्याशी त्यांच्याच मजबूत मैदानावर स्पर्धा करत होते.मोठ्या सभा विरुद्ध मोठ्या सभा.भाषण विरुद्ध भाषण. पोस्टर विरुद्ध पोस्टर.व्यक्तिमत्त्व विरुद्ध व्यक्तिमत्त्व.त्या मैदानावर BJP ची organisation, messaging आणि event machinery मजबूत आहे.मग प्रश्न असा आहे.तुम्ही प्रतिस्पर्ध्याला त्याच्या strongest game मध्ये हरवण्याचा प्रयत्न किती वर्षे करणार?कदाचित त्याऐवजी गेम बदलावा लागतो.

'मी तुम्हाला काय सांगतो' या राजकारणातून 'तुम्हाला काय सांगायचे आहे?' या राजकारणाकडे. आणि याचा सर्वात मनोरंजक पुरावा काँग्रेसच्या सभांमध्ये नाही.तो BJP च्या प्रतिक्रियेत दिसतो.याच काळात BJP ने Gen Z शी थेट संवाद वाढवण्यासाठी आणि विद्यापीठे व सरकारी शाळांमधील तरुणांशी अधिक थेट संपर्क साधण्याची तयारी सुरू केली आहे.राजकारणात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.तुमचा प्रतिस्पर्धी अचानक तुमच्या निवडलेल्या मैदानाकडे लक्ष देऊ लागला, तर किमान मैदानाची दिशा बदलते आहे असे म्हणता येते.

अर्थात इथे राहुल गांधींची जबाबदारी आणखी वाढते.विद्यार्थ्यांना बोलू देणे हे राजकीय परिवर्तन नाही.अशा कार्यक्रमांमधून ऐकलेल्या प्रश्नांचें पुढे policy मध्ये, पक्षाच्या उमेदवार निवडीत, संघटनेत आणि प्रत्यक्ष कृतीत रूपांतर झाले नाही, तर 'छात्रों की गूंज' आणखी एक चांगला इव्हेन्ट बनून राहील.पण जर हा प्रयोग मोठ्या प्रमाणावर वाढला जर तरुणांना केवळ प्रेक्षक न बनवता प्रत्यक्ष संवादात सहभागी केले तर राहुल गांधींकडून एक अधिक महत्त्वाची गोष्ट घडेल,ते भारतीय राजकारण अधिक सकस, अधिक सुदृढ आणि अधिक संवादप्रधान बनविण्यात मोलाची भूमिका बजावतील.कारण शेवटी लोकशाहीची ताकद केवळ कोण जिंकते आणि कोण हरते यात नसते.

लोकांचे किती ऐकले जाते, किती वेगवेगळ्या आवाजांना जागा मिळते आणि सत्ताधाऱ्यांना किती प्रश्न विचारले जातात.यावरही लोकशाहीची गुणवत्ता ठरते. भारतीय लोकशाही अधिक बळकट, अधिक सर्वसमावेशक आणि अधिक संवादी व्हावी, ही प्रत्येक भारतीयाची इच्छा आहे.आणि तसे झाले, तर त्याचा फायदा कोणत्याही एका पक्षाला नाही. संपूर्ण भारताला होईल.

**सलिल चौधरी**
नेटभेट ई-लर्निंग सोल्युशन्स

# अल्पसंख्य स्त्रियांचा विचार राहुल गांधी केव्हा करणार?

'छात्रोकी गुंज' या कार्यक्रमात तरुणीशी संवाद साधताना 'महिला कधीच स्वतंत्र होऊ नयेत हा मनुस्मृतीचा डाव आहे' असा थेट आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला. सोबतच महिलांना तुम्ही कोणालाही बांधील नसल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. भारतीय जनता पार्टीने एकामागोमाग अनेक राज्यांत सत्ता स्थापन केल्यानंतर आणि लोकसभेतही तिसरी टर्म जिंकल्यानंतर देशात हिंदूंची व्होटबँक तयार होत आहे की काय या भीतीने राहुल गांधी यांनी देशभरातील अनेक तीर्थस्थळांना भेटी दिल्या, भगव्या शाली परीधान केल्या.त्यामुळे कधी काळी अल्पसंख्याकांच्या मतपेटीच्या बळावर वर्षोनुवर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसची पावले चुकीच्या दिशेने तर जात नाहीत ना असा संभ्रम काँग्रेसच्या जुन्या जाणत्या नेत्यांमध्येही निर्माण झाला होता. 'छात्रोकी गुंज' या युवाशक्तीच्या कार्यक्रमातही राहुल गांधी यांनी मनुस्मृतीचा उल्लेख केल्यामुळे राहुल गांधी आता केवळ हिंदूंचाच विचार करू लागले आहेत असा दृढविश्वास सामान्य जनतेच्या मनातही निर्माण झाला आहे कारण गेल्या काही दशकांत हिंदूंच्या विचारसरणीत झालेला आमूलाग्र बदल प्रत्येकाने पाहिला आहे.

कधीकाळी पारंपारिक वेशभूषेत दिवसभर वावरणारी हिंदू स्त्री काळाला अनुसरून जीन्स आणि स्कर्टमध्येही समाजात मोकळेपणाने फिरू लागली आहे. याउलट स्वतंत्र भारतातील एका समाजात आज एकविसाव्या शतकातही स्त्रियांना बुरखा परिधान करण्याची सक्ती केली जात आहे, मग ती स्त्री शाळा महविद्यालयांत जाणारी किशोरी असो वा नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारी प्रौढ स्त्री असो. 'ट्रिपल तलाक' सारख्या प्रथा आजही या समाजातील स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण करत आहेत,'हलाला' सारख्या प्रथा स्त्रीला गुलामगिरीच्या वेदना देणाऱ्या आहेत. आजही या समाजात स्त्रियांना भगवंताच्या प्रार्थनास्थळात प्रवेश देण्यापासून रोखले जाते. अनेक मुले जन्माला घालण्यास प्रवृत्त केले जाते. वर्षोनुवर्षे चालत आलेल्या या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या स्त्रियांचा आवाज समाजातील पुरुषवर्गाकडून दाबला जातो.धार्मिक प्रथा परंपरांचे लेबल केवळ स्त्रियांनाच का?हा अत्याचार त्यांनी किती दिवस सहन करायचा? अल्पसंख्याकांना नेहमीच प्रथम प्राधान्य देणाऱ्या काँग्रेसचे नेते राहुल गांधीं याविषयी काही बोलतील अशी अपेक्षा असताना यावेळीही ते केवळ हिंदू स्त्रियांच्या बाजूनेच बोलले. अल्पसंख्य समाजातील स्त्रियांचे दुःख राहूल गांधी यांना केव्हा दिसणार?

**नरेश घरत**

# श्रावण-मनातला हिरवा ऋतू


'श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे'.. बालकवींच्या या ओळी कानावर पडल्या की मनाच्या एखाद्या कोपऱ्यात लपून बसलेला श्रावण अलगद जागा होतो. खिडकीबाहेरची रिमझिम,ओल्या मातीचा दरवळ, हिरवीगार झालेली धरती आणि आकाशात दाटून आलेले काळे ढग, हे सगळे पाहताना जाणवते, श्रावण हा केवळ पंचांगातील एक महिना नाही; तो मनाचा ऋतू आहे.

आषाढाच्या पावसानंतर श्रावणाची चाहूल लागते आणि सृष्टीचे रूपच बदलते. डोंगर हिरवे होतात, शेतांच्या बांधांवर मखमली गवत उगवते, झाडांच्या फांद्यांवर नव्या पालवीची लगबग सुरू होते. नदी-नाले भरून वाहू लागतात. कधी रिमझिम, कधी मुसळधार तर कधी अचानक ऊन-ऊन-पावसाचा हा लपंडाव श्रावणाच्या सौंदर्यात आणखी भर घालतो. दवबिंदूंवर पडणारे सूर्यकिरण जणू धरतीने हिऱ्यांचे दागिने ल्यावेत असे भासतात.

खरे तर माणसाच्या आयुष्यातील अनेक सुंदर स्मृती श्रावणाशी जोडलेल्या असतात. शाळेत जाण्यापूर्वी आईने दिलेली गरम भजी, ओल्या रस्त्यावर कागदी होडी सोडण्याची बालहौस, आजीने सांगितलेल्या पुराणकथा, देवघरातील अखंड तेवणारी समई, संध्याकाळी अंगणात दरवळणारा पारिजातक, या आठवणींचा सुगंध वर्षानुवर्षे तसाच टिकून राहतो.

श्रावण आपल्याला एक विलक्षण संतुलन शिकवतो. पाऊस कोसळतो, पण त्यानंतर ऊनही पडते. काळे ढग येतात, पण त्यांच्याच कुशीत इंद्रधनुष्य जन्माला येते. जीवनात दुःख आणि आनंद, विरह आणि मिलन, संघर्ष आणि समाधान हे सारे एकाच आकाशाखाली नांदत असतात. म्हणूनच श्रावणाचा संदेश केवळ हिरवाईचा नाही; तर आशावादाचा आहे.

श्रावण म्हणजे निसर्गाचा रंगोत्सव; पण त्याचबरोबर तो नात्यांचाही उत्सव आहे. वर्षभराच्या धावपळीत हरवलेली माणसे सणांच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येतात. घरात स्वच्छता होते, देवघरात फुलांचा सुगंध दरवळतो आणि अंगणात रांगोळी उमटते. माणसाच्या साचेबंद जीवनात आनंदाचे, समाधानाचे आणि आपलेपणाचे काही क्षण निर्माण व्हावेत, यासाठीच कदाचित आपल्या पूर्वजांनी सण-उत्सवांची सुंदर परंपरा निर्माण केली असावी.



श्रावणाने कवींनाही कायम भुरळ घातली आहे. मंगेश पाडगावकरांच्या शब्दांत..

'श्रावणात घननीळा बरसला,
रिमझिम रेशिमधारा,
उलगडला झाडांतून
अवचित हिरवा मोरपिसारा.'

या ओळी ऐकताना श्रावण जणू शब्दांतूनच आपल्या मनात उतरतो. आजच्या वेगवान जीवनात माणूस निसर्गापासून आणि माणसांपासूनही काहीसा दूर जात आहे. अशा वेळी श्रावण आपल्याला थोडे थांबायला शिकवतो. पावसाच्या सरी ऐकायला, हिरवाई न्याहाळायला, जुन्या आठवणी जागवायला आणि आपल्या माणसांशी मनापासून बोलायला भाग पाडतो.

श्रावण येतो,आपल्या हिरव्यागार सरींनी मनाला चिंब भिजवतो आणि अलगद निघूनही जातो; पण त्याच्या पावसाचा ओलावा मनाच्या गाभाऱ्यात दीर्घकाळ साठून राहतो. त्याच्या सरी थांबतात, आकाश निरभ्र होते, हिरवाई हळूहळू आपला रंग बदलते; तरी श्रावणाने मनावर उमटवलेली प्रसन्नतेची नक्षी सहज पुसली जात नाही.

कदाचित म्हणूनच श्रावण संपल्यावरही तो संपत नाही. तो राहतो ओल्या मातीच्या सुगंधात, पानांवरच्या दवबिंदूंत, अंगणातल्या फुलांच्या दरवळात, जुन्या आठवणींच्या कप्प्यात आणि आपल्या माणसांच्या हसऱ्या चेहऱ्यांत. म्हणूनच श्रावण हा केवळ ऋतू नाही, केवळ एक महिना नाही; तो मनाच्या गाभाऱ्यात दरवर्षी नव्याने फुलणारी हिरवी आठवण आहे, निसर्गाची, संस्कृतीची, नात्यांची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणुसकीची.....

**श्रीपाद टेंबे**
९१५८०८८०४२

## निर्भयाचे आवाहन..!

रक्षाबंधनाच्या पवित्र दिनी
अभागी निर्भया करते आहे
भगीनींना विणवणी-
परस्त्री असते मातेसमानची
भावाला द्यावी शिकवणी..

भाऊराया असतो ना
आपला जिव की प्राण
कुविचारांनी होते
जीवनाची धुळधाण
म्हणून प्रबोधन करणे
तुझे कर्तव्य जाण ..!

करू नये विनयभंग
अथवा अपहरण
कुटूंबाला लागते ग्रहण
तुरुंगात जाई व्यर्थ जीवन..!



**प्रा. अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# हातभट्टीवर एलसीबीचा ‘प्रहार’ ; नायगावात ४.९८ लाखांचा माल जप्त

## ३२०० लिटर सडवा मोहासह ७५ लिटर गावठी दारू ताब्यात ; दोन आरोपी पोलिसांच्या जाळ्यात



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील अवैध धंदेवाल्यांची झोप उडविणाऱ्या ‘ऑपरेशन प्रहार’ला स्थानिक गुन्हे शाखेने आणखी धार दिली आहे. अकोट फाईल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नायगाव परिसरात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर एलसीबीने थेट छापा टाकत दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईत तब्बल ३२०० लिटर सडवा मोहामाच, ७५ लिटर तयार गावठी दारू आणि इतर साहित्य असा एकूण ४ लाख ९८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला.

नायगाव परिसरात गावठी हातभट्टीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात दारू गाळली जात असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून एलसीबीच्या पथकाने अकोट फाईल पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक दिली. पोलिसांचा छापा पडताच हातभट्टीवर सुरू असलेल्या अवैध दारू निर्मितीचा पर्दाफाश झाला.

या कारवाईत हुसैन बुद्धू नौरंगाबादी (रा. फरीदनगर, फरीदिया मस्जिदजवळ, नायगाव, अकोला) आणि संतोष शिवराम घणे (वय ५०, रा. मंगरूळपीर, जि. वाशिम, ह.मु. बसस्थानकाजवळ, अकोला) हे दोघे गावठी दारू गाळताना आढळून आले. पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले.

छाप्यात ३२०० लिटर सडवा मोहामाच आढळून आला. त्याची अंदाजे किंमत ४ लाख ८० हजार रुपये आहे. याशिवाय ७५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारू, अंदाजे किंमत १५ हजार रुपये, तसेच ३ हजार ६०० रुपयांचे इतर साहित्य असा एकूण ४ लाख ९८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यात अवैध दारू, हातभट्टी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी ‘ऑपरेशन प्रहार’च्या माध्यमातून कठोर मोहीम उघडली आहे. या मोहिमेत केवळ किरकोळ कारवाई न करता अवैध धंद्यांच्या मुळावर घाव घालण्याची भूमिका पोलिसांनी घेतली आहे. नायगावातील ही कारवाई त्याच मोहिमेचा एक भाग मानली जात आहे. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी विशेष पथक तयार करून अवैध हातभट्टी दारूविरोधात मोहीम सुरू केली. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईने अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांना चांगलाच दणका बसला आहे.

### एलसीबीच्या पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईमध्ये सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण, पोलीस अंमलदार शेख हसन, फिरोज खान, अब्दुल माजिद, एजाज अहमद, सुलतान पठाण, अमित दुबे, खुशाल नेमाडे, धीरज वानखडे, राज चंदेल, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, चालक रामकिसन डोईफोडे आणि प्रकाश लोखंडे यांनी सहभाग घेतला.

# भरधाव कार डिव्हायडरवर आदळून पलटी ; सुदैवाने जीवितहानी नाही ; सहा जण जखमी

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

अकोला-अमरावती राष्ट्रीय महामार्गावर सोनोरी फाट्याजवळ बुधवारी दुपारी भरधाव कारचा भीषण अपघात झाला. नियंत्रण सुटलेल्या कारने डिव्हायडरला धडक देत दोन वेळा पलटी घेतल्याने कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात दोन महिला, दोन पुरुष आणि दोन लहान मुलांसह सहा जण जखमी झाले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

एमएच ३० बीडब्ल्यू ९९९४ क्रमांकाची कार अकोल्याहून अमरावतीकडे जात होती. दुपारी सुमारे एक वाजता सोनोरी फाट्याजवळील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील गोडाऊन परिसरातील वळणावर कार आली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.

भरधाव वेगातील कार प्रथम डिव्हायडरवर जोरात आदळली. त्यानंतर ती पलटी होऊन महामार्गाच्या दुसऱ्या बाजूच्या डिव्हायडरवर जाऊन आदळली. कार पलटी होत असतानाच तिच्या मागील भागालाही डिव्हायडरची जोरदार धडक बसली. त्यामुळे वाहनाच्या पुढील आणि मागील भागासह दोन्ही बाजूंचे मोठे नुकसान झाले. अपघाताचा आवाज आणि दृश्य पाहून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी मुसळधार पाऊस सुरू होता. पावसामुळे महामार्गाचा रस्ता निसरडा झालेला असताना कारचा वेग अधिक असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत कारमधील जखमींना तातडीने बाहेर काढले. त्यानंतर त्यांना अकोला येथील रुग्णालयात उपचारासाठी रवाना करण्यात आले. राष्ट्रीय महामार्गाच्या आपत्कालीन पथकानेही घटनास्थळी पोहोचून मदतकार्य केले. अपघातग्रस्त वाहनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून पथकाने तातडीने वाहतूक सुरळीत केली.



**धोकादायक वळणाकडे पुन्हा लक्ष**

*सोनोरी फाट्याजवळील हे वळण अपघाताच्या दृष्टीने धोकादायक ठरत असल्याचे या घटनेने पुन्हा अधोरेखित झाले आहे. पावसाळ्यात रस्ता निसरडा होत असताना या ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रणात ठेवण्यासाठी तसेच चालकांना धोकादायक वळणाची पूर्वसूचना मिळण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.*


## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४५/२०२६ प्रोसेस नं.१०८२७/२०२६
चौ.ता. २१/१०/२०२६ दिनांक : २४/०८/२०२६

**अर्जदार :** १. गंगाबाई सुभाष भोंडे २. योगेश सुभाष भोंडे ३. गजानन सुभाष भोंडे क. १ ते ३ रा. शमशान रोड, महात्मा फुले नगर, सिंधी कॅम्प, अकोला, ता. जि. अकोला. ४. अंकीता केशव शेंद्रे रा. पथ्रोट, ता अचलपूर जि. अमरावती..

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष दत्तुजी भोंडे
**पत्ता :-** रा.शमशान रोड, महात्मा फुले नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की. मयत सुभाष दत्तुजी भोंडे यांचे दि. १६/१०/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती व जनतेस यामार्फत जाहीर सूचित करण्यात येते की, माझ्या पक्षकार श्रीमती निर्मला गोवर्धन थोटे या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेच्या एकमेव व कायदेशीर मालक असून सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष, स्वतंत्र व निर्विवाद ताबा त्यांच्याकडे आहे. मालमत्तेचा तपशील : कर्मयोग निवास, गणपती मंदिराजवळ, खेडकर नगर, अकोला येथील २६२५ चौ. फुट प्लॉटवर बांधलेले १५४८ चौ.फु. पक्के घर ज्याचा अकोला महानगरपालिका वार्ड क्र. १७ व मालमत्ता क्र. ७०४ असून त्याच्या चतुःसीमा पूर्वेस– गोखले यांचे घर, पश्चिमेस– रिकामा प्लॉट, उत्तरेस – सरकारी रस्ता, दक्षिणेस – सार्वजनिक गल्ली आहे. सदर मालमत्तेमध्ये माझ्या पक्षकारांचा मुलगा अमित गोवर्धन थोटे, मुलगी रंजना भगवान गोरे, मुलगी वंदना राजू इंगळे व मुलगी अर्चना संजय गवई यांचा आजच्या तारखेस कोणताही मालकी हक्क, हिस्सा, स्वारस्य, ताबा किंवा अन्य कोणताही कायदेशीर अधिकार नाही. माझ्या पक्षकारांनी सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस स्वतंत्रपणे मालकी हक्क अथवा ताबा दिलेला नाही. तसेच, माझ्या पक्षकारांकडून सदर मालमत्ता कायदेशीररीत्या व अधिकृत दस्तऐवजाद्वारे अन्य कोणाच्या नावे हस्तांतरित केली जात नाही तोपर्यंत किंवा माझे पक्षकार जिवंत आहे तोपर्यंत सदर मालमत्ता ही पूर्णपणे माझ्या पक्षकार यांचीच मालकी व ताब्यात राहणार आहे. त्यामुळे सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीने खरेदी-विक्री, हस्तांतरण, ताबा, व्यवहार, गहाण, भाडेपट्टा किंवा आपला हक्क, हिस्सा किंवा ताबा असल्याचे भासवून तृतीय व्यक्तीस व्यवहार करण्यास प्रवृत्त करू नये, करिता जाहीर सूचना.

पक्षकारा तर्फे अधिवक्ता
ठिकाण : अकोला
दिनांक: २५.०८.२०२६
**ॲड. एस. ऐ. देशमुख**
कुणाल कमर्शियल कॉम्प्लेक्स,
रणपिसे नगर चौक, जवाहर नगर रोड अकोला.
मो नं. 7378336699

## PUBLIC NOTICE

I, **MOHAMMAD ALI KHAN TANWIR** S/o **QAYAM ALI KHAN,** holder of Passport No. H3319976, residing at QUAYAMA ENGG WORKS, LAL BANGLOW, BAIDPURA ,AKOLA, M.S.–444001, shall henceforth be known as **MOHAMMAD ALI KHAN,** S/o **QAIM ALI KHAN** Date: 25.8.2026 advocate shahnawaz Khan Place : Akola

## Change of Name


I, **FARAZ AHMAD KHAN RIYAZ AHMAD KHAN,** residing at Quayama Engineering Works, Lal Bangla, Baidpura, Akola, District Akola, Maharashtra – 444001, here by declare that my old name **FRAZ AHEMAD KHAN RIYAZ AHEMAD KHAN** has been changed/ corrected to **FARAZ AHMAD KHAN RIYAZ AHMAD KHAN.** Both names refer to one and the same person. Mobile: 9028757779 Advocate: Shahnawaz Khan


# सोनाळा येथील विजेच्या लपंडावामुळे कास्तकारांमध्ये असंतोष

■ प्रतिनिधी | अकोला ■

तालुक्यातील सोनाळा गावातील कास्तकारांच्या कृषी पंपांना होणारा विद्युत पुरवठा अनेक दिवसापासून सातत्याने खंडित होत असून यामुळे बागायतीतील पिके ही संकटात आली आहेत. एकीकडे पाऊस थांबून पिके होरपळत असतांना दुसरीकडे उरल्या सुरल्या बागायतीच्या पिकांना पण विद्युत पुरवठ्याअभावी पाणी मिळेनासे झाले आहे.

यामुळे उभी पिके संकटात येऊन कास्तकार वर्गात असंतोष निर्माण झाला आहे.त्याचप्रमाणे गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी विझोरा विद्युत उपकेंद्रामधून होणारा विद्युत पुरवठा पण सारखा खंडित होत असून तीन-तीन दिवस विद्युत पुरवठा होत



नसल्यामुळे गावाचा पाणीपुरवठा पण बंद होऊन गावकऱ्यांना पाणी समस्याचा असह्य त्रास सहन करावा लागत आहे.या संदर्भात ग्रामपंचायत सरपंच महानाम फुलके यांनी उपकार्यकारी अभियंता सब स्टेशन बोरगाव मंजू यांना तक्रार देऊन गावातील पाणीपुरवठ्याचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे, त्याचप्रमाणे कास्तकार निलेश अग्रवाल व अन्य कास्तकारांनी आपल्या शेतातील कृषी पंपांना होणारा विद्युत पुरवठा सातत्याने खंडित होऊन अघोषित लोड शेडिंग होत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, ग्रामीण, गोरक्षण रोड यांना अनेक कास्तकारा समवेत निवेदन सादर केले आहे.निवेदनात कृषी पंपाच्या विद्युत सप्लाय संदर्भात गावातील विद्युत कर्मचारी हेतू पुरस्कर विद्युत पुरवठा बंद करत असून अशा कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनात केली आहे. निवेदन प्रसंगी गावातील उपसरपंच पती गोपाल होणारे, इंदल दहीवाले, गजानन वज़ीरे, वैभव होनारे, सदानंद ढोरे, उमेश काठोडे, माजी सरपंच पुरुषोत्तम भटकर, दिलीप जानोरकर, दिनकर अंभोरे, निलेश अग्रवाल, रेणुका अग्रवाल, संजय होणारे, सदानंद ढोरे, दिलीप अग्रवाल, गोविंदा फुलके, सचिन अंभोरे ग्राप सदस्य आदीं उपस्थित होते.

# श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचा पदग्रहण सोहळा

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचा पदग्रहण सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार,अकोला लोकसभा संपर्क प्रमुख राजन साळवी यांच्या हस्ते व माजी आ गोपीकिसन बाजोरिया यांच्या नेतृत्वात शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनाचे प्रदेश कार्याध्यक्ष बाबासाहेब चव्हाण, प्रदेश सचिव अमित भटनागर,प्रदेश संघटक नानासाहेब बच्छाव,महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष सौ आशाताई वैकुंटे यांच्या आदेशानुसार तसेच जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर, अश्विन नवले,विदर्भ अध्यक्ष आकाश हेरोळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख रेखा राऊत,निशा ग्यारल, पातूर तालुका प्रमुख सपना नवले,शितल कंडारकर, कल्पना राठोड ओबीसी सेलच्या जिल्हाप्रमुख रेखाताई वारके यांच्या उपस्थितीत पदग्रहण सोहळा संपन्न झाला.

# शिव स्मरणाने शाश्वत आनंदाची प्राप्ती राजेश्वर मंदिरात स्थानिक पु. प्रेमानंद महाराज यांची शिवकथा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जगात शिवाची तपश्चर्या अतिशय पवित्र मानली जाते. शिवाची तपश्चर्या केल्याने काम, क्रोध,लोभ,अहंकार इत्यादी वाईट विकार मनात प्रवेश करू शकत नाहीत. शिव स्थान हे पवित्र स्थळ मानल्या जाते; तिथे कामदेवालाही प्रवेश नाही. म्हणूनच शाश्वत सुख मिळवण्या साठी अश्या पवित्र स्थळी तपश्चर्या करण्याचा उपदेश अकोल्याचे पु. प्रेमानंद महाराज यांनी दिला.श्री प्रेमानंद महाराज भक्त परिवाराने पवित्र श्रावण महिन्यात स्थानिक राजेश्वर मंदिरात विश्वकल्याणासाठी पु प्रेमानंद महाराज यांची महाशिवपुराण कथा आयोजित केली आहे. या कथेत प्रेमानंद महाराज शिव महात्म्याचे वर्णन करत आहेत. त्यांनी महाशिवपुराण कथेला मोठे महत्त्व देत रोज शिवस्मरण



करण्याचे आवाहन केले.या महाशिवपुराण कथेमध्ये पार्थिव शिवलिंगावर रुद्राभिषेक करण्यात येत असून यज्ञ, प्रसाद वितरण अशा धार्मिक विधीं करण्यात येत आहे. उपस्थित भक्तांना प्रसाद दिला जात असून रुद्राक्ष वाटप देखील केले जात आहे. ही कथा ३० ऑगस्टपर्यंत नित्य दु ३ ते साय ६ वाजेपर्यंत होत असून या पावन संगीतमय शिवकथेचा सर्व महिला-पुरुष भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# बार्शीटाकळी येथील खोलेश्वर संस्थानला मारवाडी युवा मंच अकोला शाखेची भेट



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व धार्मिक सेवेत सक्रिय असलेल्या मारवाडी युवा मंच, अकोला शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी श्रावण महिन्याच्या औचित्य साधित बार्शीटाकळी येथील प्रसिद्ध प्राचीन खोलेश्वर मंदिराला भेट देऊन भगवान भोलेनाथाचे पूजन व शिवलिंगावर अभिषेक केला. मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या दर्शन सोहळ्यात शाखा अध्यक्ष जितेंद्र बोरा, सचिव केतन गुप्ता, प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा, नमन खंडेलवाल, संतोष छाजेड, अभिषेक अग्रवाल, अभिजीत गोयनका, रितिक अग्रवाल,हरीश खंडेलवाल,भूषण अग्रवाल आणि ओम अग्रवाल यांनी खोलेश्वर मंदिरात जाऊन विधीवद्ध पूजा-अर्चना आणि अभिषेक केला.या पवित्र प्रसंगी खोलेश्वर संस्थानचे अध्यक्ष राम येलवनकर व कोषाध्यक्ष चंद्रकांत वाटमारे यांनी सर्व सदस्यांचे शॉल व श्रीफळ देऊन स्वागत केले.

# ‘ज्ञान माऊली’ कार्यक्रम उत्साहात संपन्न

**बाळापूर :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५०व्या जन्मजयंतीनिमित्त आयोजित ‘ज्ञान माऊली’ हा आगळावेगळा सांस्कृतिक व संस्कारक्षम कार्यक्रम बाळापूर येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे मुख्य संयोजक व सादरकर्ते विजय वाहोकार यांच्या संयोजनातून साकारलेल्या या कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मापासून ते समाधीपर्यंतचा जीवनप्रवास अभंग, निरूपण व झाकीद्वारे प्रभावीपणे सादर करण्यात आला. चिमुकल्यांनी भगवान पंढरीष परमात्मा पांडुरंग, संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, संत नामदेव आदी संतांच्या सुंदर वेशभूषा साकारत उपस्थितांची मने जिंकली.

# हर हर महादेवच्या जयघोषात दुमदुमले महानगर

## शेकडो मातृशक्तींच्या भव्य कांवड-कलश यात्रेने जागविला धर्म

■ प्रतिनिधी | अकोला ■

भगव्या आणि हिरव्या वेशात सजलेल्या शेकडो मातृशक्ती, डोक्यावर मंगल कलश, खांद्यावर आकर्षक कांवडी, मुखातून घुमणारा ‘हर हर महादेव’चा जयघोष आणि भक्तिमय वातावरण अशा मंगलमय वातावरणात अकोला शहरात मातृशक्ती कांवड-कलश यात्रा मोठ्या भक्तिभावात संपन्न झाली.

विश्वमांगल्य सभाच्या नेतृत्वात या भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.यात्रेचा शुभारंभ टिळक मार्गावरील मोठ्या राम मंदिरात निलेश देव यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चना व महाआरतीने करण्यात आला. त्यानंतर मातृशक्तींच्या उत्स्फूर्त सहभागाने कांवड -कलश यात्रेला प्रारंभ झाला.शहरातील विविध महिला संघटना, भजनी मंडळे तसेच शेकडो



धर्मप्रेमी व शिवभक्त मातृशक्तींनी यात्रेत उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी ‘हर हर महादेव’च्या जयघोष व भक्तिगीतांनी संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला.यावेळी साकार केलेल्या मनोहारी झांकीत सौ. राधिका मुळे यांनी भारतमातेची भूमिका साकारली, तर महिलांनी शंकर-पार्वतीची झाकी साकार करीत भक्तिचा विशेष रंग भरला.दरम्यान जय हिंद चौक येथे सर्व शाखीय ब्राह्मण सभेच्या वतीने कांवड यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यात्रेत सहभागी मातृशक्तींवर पुष्पवृष्टी करून त्यांचे औक्षण करण्यात आले. यावेळी सर्व शाखीय ब्राह्मण सभेच्या अंजलीताई जोशी यांच्यासह संस्थेचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.धर्म आणि संस्कृतीच्या या उपक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड देत नाईक होमिओपॅथीच्या पुढाकाराने महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# तक्रारी, नोटिसा अनब चौकशीचे अहवाल ; कारवाई मात्र कुठे ?

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

पंचायत समितीतील तक्रारी, अधिकाऱ्यांना बजावलेल्या नोटिसा आणि चौकशी अहवालातील गंभीर नोंदी यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रार झाली, नोटीस बजावली, चौकशीही झाली; मात्र त्यानंतर जबाबदारी निश्चित झाली का, हा सवाल आता ऐरणीवर आला आहे.

तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांनी ५ फेब्रुवारी २०२४ रोजी जा.क्र. ४८२/२०२४ अन्वये विस्तार अधिकारी विजय किर्तने यांना तक्रारींवर कार्यवाही का झाली नाही, याबाबत स्पष्टीकरण मागविणारी नोटीस बजावल्याचे कागदपत्रांवरून समोर आले आहे. मात्र, त्यानंतर नेमकी काय कार्यवाही झाली, याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

### एकाच पदावर १४ वर्षे कार्यरत असल्याचा दावा

विस्तार अधिकारी विजय किर्तने हे सुमारे १४ वर्षांपासून एकाच पदावर कार्यरत असल्याचा तक्रारदाराचा दावा आहे. हा कालावधी शासनाच्या बदली व पदस्थापना नियमांच्या चौकटीत आहे का, याची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### हातगावच्या कामाने वाढवली धग

हातगाव ग्रामपंचायतीतील जनसुविधा योजनेअंतर्गत रस्ता कामासाठी २० लाख रुपये मंजूर झाले असून, त्यापैकी १९ लाख ४२ हजार ५९१ रुपये खर्च झाल्याची नोंद चौकशी अहवालात आहे. या कामाबाबत तक्रार झाल्यानंतर १४ जुलै २०२६ रोजी चौकशी करण्यात आली. मोजमाप पुस्तिकेतील नोंदींबाबतही तक्रारदाराने प्रश्न उपस्थित केले आहेत. या आरोपांची अंतिम सत्यता स्वतंत्र चौकशीतच स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

### चौकशी अहवालातील २.२५ लाखांची नोंद

हातगाव ग्रामपंचायतीच्या माजी सरपंचांच्या कार्यकाळातील २ लाख २५ हजार रुपयांच्या आर्थिक अपहाराचा उल्लेख चौकशी अहवालात असल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित रक्कम शासकीय तिजोरीत जमा करण्यात आल्याची नोंदही असल्याने जबाबदारी निश्चित करण्यासाठी पुढे काय कारवाई झाली, हा प्रश्न अनुत्तरित आहे. तक्रारदार शिवदास राऊत यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, तसेच दोष सिद्ध झाल्यास गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

### कायदेशीर सूचना :

दरम्यान, विजय किर्तने, बलदेव झटाले किंवा अन्य संबंधितांवर कोणताही अंतिम दोषनिष्कर्ष या वृत्तातून काढण्यात येत नाही. संबंधितांची अधिकृत बाजू उपलब्ध झाल्यास ती प्रसिद्ध करण्यात येईल.

# रस्ता करा नाहीतर खुर्ची सोडा

## नांदपूर-टाकरखेड रस्त्यावरून नागरिक आक्रमक, दीड वर्षे झाली तरी रस्ता अधांतरी, आ.वानखेडेंच्या आश्वासनांचीही नागरिकांकडून आठवण

**आर्वी/जनमाध्यम**

श्री क्षेत्र टाकरखेडकडे जाणाऱ्या नांदपूर–टाकरखेड रस्त्याचे काम सुरू होऊन दीड वर्षांचा कालावधी उलटला, तरी अवघ्या सहा किलोमीटरच्या रस्त्याचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी पसरवून ठेवलेली गिट्टी, खड्डे आणि अपूर्ण कामामुळे वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



श्री क्षेत्र टाकरखेड येथे श्री संत लहानुजी महाराज यांच्या पंचावन्नाव्या पुण्यतिथी महोत्सवाला २० ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक टाकरखेड येथे दाखल होत आहेत. मात्र, भाविकांसाठी महत्त्वाचा असलेला हा मार्गच दुरवस्थेत असल्याने प्रशासनाच्या नियोजनाचा बोजवारा उडाला आहे.

ग्राम नांदपूर येथील नागरिक अरविंद लिल्लोरे यांनी याप्रश्नी प्रशासनाला थेट सवाल केला आहे. नागरिकांनी उपोषण केल्यानंतर ३ एप्रिल २०२५ पासून रस्त्याचे काम सुरू झाले. यावर्षी पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, कामाची गती पाहता अजून किमान दोन वर्षे लागण्याची शक्यता असल्याचा संताप लिल्लोरे यांनी व्यक्त केला.

विश्वविक्रमाच्या वेगाने कामे करण्याचा दावा एकीकडे आणि सहा किलोमीटरचा रस्ता दीड वर्षे रखडविण्याची नामुष्की दुसरीकडे, ही ग्रामीण विकासाची कोणती पद्धत असा प्रश्न त्यांनी केला. दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार वानखेडे यांनी मोठमोठी आश्वासने दिली होती. जनतेने त्यांच्यावर विश्वास ठेवला मात्र आता त्याच जनतेमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. माजी आमदार दादाराव केचे यांच्या कार्यकाळात अनेक रस्त्यांची कामे झाली. काही कामे रखडली असल्याने ती पूर्ण करण्याची अपेक्षा नागरिकांना होती. मात्र, विद्यमान आमदारांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नसल्याची टीका नागरिकांतून होत आहे.

ज्या विश्वासाने जनतेने आमदार निवडून दिले, त्या विश्वासाला तडा जाऊ नये. रखडलेला रस्ता तातडीने पूर्ण करून भाविक आणि नागरिकांना सुरक्षित मार्ग द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.रस्त्याचे काम तातडीने पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# पत्रकाराला धमकी; पोलिसांच्या भूमिकेवर पत्रकार संघटना आक्रमक

**कारंजा (घाडगे)/जनमाध्यम**



जनहिताचा आवाज उठविणाऱ्या पत्रकारालाच धमकी देऊन दबाव आणण्याचा प्रकार समोर आल्याने पत्रकारिता क्षेत्रात संताप व्यक्त होत आहे. खाद्यतेलातील भेसळीबाबत वृत्तांकन करणारे पत्रकार धीरज कसारे यांना कथितरीत्या धमकी देत जबरदस्तीने वाहनात बसविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी आक्रमक मागणी व्हाईस ऑफ मीडिया, आर्वी तालुका पत्रकार संघटनेने केली आहे.

याबाबत संघटनेने २५ ऑगस्ट रोजी आर्वी ठाणेदारामार्फत पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले. निवेदनानुसार, कसारे यांनी कारंजा तालुक्यातील खाद्यतेल भेसळीचा प्रकार उघडकीस आणणारे वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तामुळे नाराज झालेल्या होलसेल तेल विक्रेते अनुज राजेश जसानी यांनी कारंजा पोलिस ठाण्याच्या आवारातच पत्रकाराला मारण्याची धमकी दिल्याचा तसेच जबरदस्तीने वाहनात बसविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

**पोलीस ठाण्याच्या आवारातच धमकी**

सदर प्रकरणी पत्रकाराने पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर केवळ अदखलपात्र नोंद करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. पत्रकाराला धमकी देण्याच्या गंभीर प्रकारातही गुन्हा दाखल न झाल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पत्रकारांवर दबाव टाकण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. जनहिताचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकाराला संरक्षण देण्याऐवजी जर आरोपींना मोकळे रान मिळत असेल, तर ही लोकशाहीसाठी गंभीर बाब आहे, असा संताप संघटनेने व्यक्त केला.

संबंधित आरोपीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी तसेच प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर अध्यक्ष राजू श्रीहरी डोंगरे, उपाध्यक्ष प्रमोद एडाखे, सचिव नजीर खॉ बिसमिल्ला खॉ, कोषाध्यक्ष नितीन आष्टीकर, संघटक विनय इंगळे व विधी सल्लागार ॲड. दिलीप ठाकरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# स्मार्ट मीटरच्या सक्तीवरून रणशिंग

## मुसळधार पावसात हजारोंचा एल्गार; खा.अमर काळेंचा सरकारला इशारा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

स्मार्ट मीटरची सक्ती, वाढती महागाई, थकीत वीजबिले आणि ग्रामीण भागातील खंडित वीजपुरवठ्याच्या प्रश्नावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने हिंगणघाटमध्ये सरकारविरोधात रणशिंग फुंकले. मुसळधार पावसातही हजारोनागरिक, शेतकरी व कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाल्याने शहरात सरकारविरोधी घोषणांनी वातावरण दणाणून गेले.



खा.अमर काळे यांनी यावेळी महायुती सरकार आणि महावितरणवर जोरदार निशाणा साधला. स्मार्ट मीटरची सक्ती करणार नसल्याचे सरकारने सांगितले होते. मात्र, ग्राहकांची संमती न घेता जुने मीटर बदलण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. नवीन तंत्रज्ञानाबाबत जनतेला विश्वासात घेऊन पारदर्शक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

**स्मार्ट मीटर नको, आधी २४ तास वीज द्या**

आर्वी आणि हिंगणघाट मतदारसंघातील जंगलालगतच्या गावांमध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. वीज गेल्यानंतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका वाढतो. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्यापेक्षा ग्रामीण भागाला अखंडित २४ तास वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी काळे यांनी केली.

**महागाईच्या मुद्यावर सरकारला घेरले**

साखर, डाळी, गहू, तांदूळ आणि गॅसच्या वाढत्या दरामुळे सामान्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. केवळ योजनांची घोषणा करण्यापेक्षा महागाई आटोक्यात आणणे गरजेचे आहे, असा टोला काळे यांनी लगावला. सरकार आंदोलनांच्या दबावाखाली निर्णय घेत असल्याचा आरोप करत काळे यांनी जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, असा इशारा दिला. जनतेच्या संतापाचा उद्रेक झाल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. स्मार्ट मीटरची सक्ती तातडीने थांबवा, अशी मागणी त्यांनी केली.

मोर्चाचे आयोजन जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केले. माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, शशिकांत शिंदे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# साखर महागली, कांद्याने रडवले; स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले

## किलोचा भाव ७०च्या घरात; कांदाही ६० ते ७० रुपयांवर; लसूण-अद्रकानेही फोडणी महागली

**वर्धा/जनमाध्यम**

सणासुदीच्या तोंडावर महागाईने सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावरच घाला घातला आहे. साखरेचे दर ७० रुपयांच्या घरात पोहोचले असतानाच कांद्यानेही ६० ते ७० रुपयांचा टप्पा गाठल्याने महिन्याचे घरखर्चाचे गणित बिघडले आहे. रोजच्या जेवणात अपरिहार्य असलेल्या कांद्यासोबत लसूण आणि अद्रकाचे दरही वाढल्याने आता स्वयंपाकघरातील साधी फोडणीही महागली आहे.

गेल्या काही दिवसांत साखरेच्या दरात झालेली झपाट्याने वाढ देशभर चर्चेचा विषय ठरली आहे. काही बाजारपेठांमध्ये साखरेचा दर ६८ ते ७० रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त आहे. दरम्यान, केंद्र सरकारने साखरेचा पुरवठा वाढविण्यासाठी तसेच दर नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत.

कांद्याच्या दरानेही ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. जुन्या साठ्यात घट आणि नवीन आवक सुरू होण्यातील हंगामी तफावत यामुळे कांद्याच्या दरात वाढ झाल्याचे बाजारातील विश्लेषणातून समोर आले आहे. देशातील काही प्रमुख बाजारपेठांमध्ये कांद्याचा दर ६५ रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

**शेतकऱ्याला किती, ग्राहकाला किती**

दरवाढीचा सर्वाधिक बोचरा प्रश्न म्हणजे त्याचा फायदा नेमका कुणाला होतो, हा आहे. शेतमालाचा दर वाढला की ग्राहकाच्या खिशाला झळ बसते; मात्र त्या वाढलेल्या किरकोळ दराचा किती हिस्सा प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या पदरात पडतो, याचे उत्तर अद्याप स्पष्ट नाही.



कांद्याचा बाजार कोसळला की शेतकऱ्याला उत्पादन खर्चही निघत नाही. कांदा साठवून ठेवण्याची वेळ आली की साठवणूक, वाहतूक आणि खराब होण्याचा धोका वाढतो. दुसरीकडे बाजारात आवक घटली की किरकोळ दर झपाट्याने वाढतात. या दरम्यानच्या साखळीतील तफावत कमी करण्यासाठी प्रभावी बाजारव्यवस्था आणि पारदर्शक दरनियंत्रणाची गरज आहे.

**महागाईचा फटका कष्टकऱ्यांनाच**

ग्रामीण भागात शेतकरी, शेतमजूर आणि रोजंदारीवर काम करणारा वर्ग मर्यादित उत्पन्नावर संसार चालवतो. खत, बियाणे, औषधफवारणी, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढत असताना घरगुती गरजेच्या वस्तूही महागल्याने उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचा ताण वाढत आहे.

महागाई वाढली की बचतीवर पहिला परिणाम होतो. त्यानंतर घरातील आवश्यक वस्तूंच्या खरेदीवर काटकसर सुरू होते. सणासुदीच्या काळात हीच परिस्थिती अधिक गंभीर होते.

**दरवाढीवर नियंत्रण कधी**

कांद्याच्या वाढत्या दरावर नियंत्रण मिळविण्यासाठी केंद्राकडून बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणण्यासह विशेष पुरवठ्याची पावले उचलली जात आहेत. साखरेच्या दरासाठीही पुरवठा वाढविण्याचे निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र या उपायांचा फायदा किरकोळ बाजारात ग्राहकांना प्रत्यक्ष कधी मिळणार, हा प्रश्न कायम आहे.

शेतकऱ्याला योग्य भाव आणि ग्राहकाला परवडणारा दर मिळणे, हेच या संपूर्ण बाजारव्यवस्थेचे खरे यश ठरणार आहे. अन्यथा एकीकडे शेतकरी दरासाठी रस्त्यावर आणि दुसरीकडे ग्राहक महागाईविरोधात हैराण, असे विरोधाभासी चित्र कायम राहण्याची शक्यता आहे.

### लसूण ३००, अद्रक २४०; फोडणीही महाग

कांदा आणि साखरेपुरतीच महागाई मर्यादित राहिलेली नाही. लसणाचे दर ३०० रुपये किलोच्या आसपास, तर अद्रक २४० रुपये किलोपर्यंत पोहोचल्याने गृहिणींच्या मासिक बजेटवर अतिरिक्त भार पडत आहे. गोडे तेल, गूळ आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर या वाढीचा परिणाम अधिक तीव्र जाणवत आहे.

# पत्रकारितेच्या कार्याची दखल; सचिन महाजन यांचा सन्मान



**देवळी/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत जनसामान्यांचा आवाज बुलंद करणारे हिंगणघाट तालुक्यातील गांगापूर येथील पत्रकार सचिन महाजन यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात आले. नवस्वराज्य फाउंडेशनच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त देवळी येथे आयोजित कार्यक्रमात विद्रोही कवी गोविंद पोलाद यांच्या हस्ते महाजन यांना सन्मानचिन्ह, शाल, रोपटे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबु अग्रवाल होते. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध नितेश कराळे, रोहिणी बाबर, समाजसेवक आनंद सुरकार, ज्येष्ठ पत्रकार हरिदास ढोक,कार्तिक फुटाणे,पंकज गाडगे,वर्धा केंद्रनायक रवींद्र चरडे आदी उपस्थित होते. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, क्रीडा व कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचाही राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह, शाल व झाडाचे रोपटे प्रदान करण्यात आले.पत्रकार सचिन महाजन यांच्या पुरस्काराबद्दल वर्धा जिल्ह्यासह हिंगणघाट तालुक्यातील पत्रकार, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक तथा संपादक सचिन वैद्य यांनी केले. आभार राजेंद्र गोल्हर यांनी मानले. कार्यक्रमास पत्रकार, शिक्षक, महिला व सामाजिक कार्यकर्त्यांसह नागरिकांची उपस्थिती होती.

# बी.फार्मच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

## नानाजी नगरातील घटनेने खळबळ

**वर्धा**-सावंगी मेघे येथील नानाजीनगर परिसरात बी.फार्मच्या विद्यार्थ्याने राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. सानिध्य महेंद्र धामंदे (२४) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. सानिध्य हा बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील रहिवासी असून, दत्ता मेघे फार्मसी महाविद्यालयात बी.फार्मच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता. तो नानाजीनगर येथे मेहरकिरण पंजाबराव गुजर यांच्या घरी भाड्याने राहत होता. सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्याचा मित्र कृष्णा यादव भेटण्यासाठी आला. आवाज देऊनही प्रतिसाद मिळत नसल्याने घरमालकांनीही पाहणी केली. खिडकीतून पाहिले असता सानिध्य गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची माहिती डायल ११२ वर देण्यात आली. सावंगी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. काही दिवसांपासून सानिध्य चिंतेत असल्याचे सांगण्यात येत असले तरी आत्महत्येचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाअंतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या असमान निधी योजनेअंतर्गत राज्यातील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना राबविण्यात येतात. समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी येत्या ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करावे असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने यांनी केले आहे. कार्यान्वित असलेल्या अर्थसहाय्याच्या असमान निधी योजनांमधून ग्रंथालय संचालनालयामार्फत दरवर्षी अर्थसहाय करण्यात येते. यासंदर्भातील नियम, अटी आणि अर्जाचा नमुना www.rrrlf.gov.in या प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर उपलबध आहे. समान निधी योजनेसाठी इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय योजनेंतर्गत २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे व.या योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेअंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येणार असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करू नयेत.असमान निधी योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन सामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम आणि इमारत विस्तार यासाठी असमान निधीतून अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. याशिवाय राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ज्ञान कोपरा विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य, महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य, राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आणि जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य तसेच बालकोपरा स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. राजा रामामोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनांबाबत इच्छुकांनी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांशी संपर्क साधावा तसेच अधिक माहितीसाठी प्रतिष्ठानचे www.rrrlf.gov.in संकेतस्थळ पहावे.कोणत्याही योजनेसाठीच्या विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी हिंदी भाषेच्या प्रती संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास ३१ ऑगस्ट पर्यंत पाठवावे, असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी कळविले आहे.

# घरातून ३.२१ लाखांची रोकड लंपास

**हिंगणघाट**-शहरातील संत कबीर वॉर्डातील नांदगाव चौक परिसरात घरफोडी करून चोरट्यांनी तब्बल ३ लाख २१ हजार रुपयांची रोकड लंपास केली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये चोरट्यांची दहशत निर्माण झाली आहे.शैलेश दादाराव महाकाळकर (३२) यांचा मेडिकल दुकान व ऑनलाइन सेंटरचा व्यवसाय आहे. त्यांचे दुकान घरातच असून व्यवसायातील रोकड त्यांनी घरात ठेवली होती. शैलेश यांचे आई-वडील नातेवाईकांकडे गेले होते. रात्री शैलेश हे पत्नीसह घराला कुलूप लावून जेवणासाठी बाहेर गेले.

# शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जामध्ये अचूक माहिती भरावी

## महाडीबीटी २.० नवीन प्रणाली सुरु

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया महाडीबीटी २.० या नवीन प्रणालीवर सुरु करण्यात आलेली आहे. शिष्यवृत्तीची रक्कम थेट बँक खात्यामध्ये जमा होणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्ज भरतांना अचूक माहिती भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना राबविण्यात येतात.

विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करतांना महाआयडी नव्याने तयार करणे बंधनकारक असून मागील पोर्टलवरील युजर आयडी पासवर्डची आता गरज नाही.विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक वापरुन नवीन महाआयडी बनवावी व पोर्टलवर आपला पत्ता,मोबाईल क्रमांक, ई-मेल व बँक खाते यासारखी सर्व अचूक माहिती भरावी. जातीचा दाखला,उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र,शैक्षणिक गुणपत्रके आदी आवश्यक कागदपत्रे पीडीएफ स्वरुपात अपलोड करावी. विविध शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वरील https://mahadbt2.maharashtra.gov.in, या संकेतस्थळाला भेट देऊन लॉगिनद्वारे आधार बेस लॉगिन करुन अर्ज भरावा. महाविद्यालयासाठी केवळ एकच लॉगिन उपलब्ध आहे, जे थेट महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे असेल. लिपीक लॉगिन पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

महाविद्यालयाने मागील युजर आयडी व नवीन डीफॉल्ट पासवर्डने लॉगिन करुन आपली प्रोफाईल तपासून अभ्यासक्रमनिहाय निश्चित करण्यात आलेले शुल्क तात्काळ अद्यावत करावे.प्राचार्यांनी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित ठेवू नये, अर्ज विहित मुदतीत मंजूर करुन पुढे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांची असेल. महाविद्यालयांनी अनुसूचित जातीच्या कोणत्याही पात्र विद्यार्थ्यांकडून वेळेपुर्वी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम घेऊ नये.योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिक माहिती व मदतीसाठी ०२२-४९१५०८००/१८००१०२५३९९ दुरध्वनी क्रमांकावर तसेच helpdesk@mahadbt.gov.in यामेल आयडीवर संपर्क साधावा, असे समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

# वेगवान कार रापमच्या बसवर धडकली

**पुलगाव**-पुलगाव-देवगाव मार्गावरील आपटी फाट्याजवळ भरधाव कारने रापमच्या बसला जोरदार धडक दिली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, बस आणि कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या घटनेमुळे काही काळ मार्गावर वाहतुकीची कोंडी झाली होती.निलेश भीमराव पारवे (४८) हे रापमच्या बसचे चालक असून, ते बस क्रमांक एमएच १४ बीटी २८६६ घेऊन यवतमाळहून पुलगावच्या दिशेने जात होते. बसमध्ये वाहक सतीश भोयर यांच्यासह प्रवासी होते. आपटी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एमएच २७ डीएल ८३०७ क्रमांकाच्या कारने बसला जोरदार धडक दिली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# डॉ.हटकर यांची बदली रद्द करा; पशुपालकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## नांदगाव पेठच्या पशुवैद्यकीय दवाखान्यावर आठ गावांसह परिसरातील पशुपालकांचा भार

**नांदगाव पेठ/प्रतिनिधी-** नांदगाव पेठ येथील राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. देवराव नागोराव हटकर यांची बदली रद्द करून त्यांना याच ठिकाणी कायम कार्यरत ठेवावे, अशी जोरदार मागणी नांदगाव पेठ व परिसरातील शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, डॉ. हटकर यांच्या बदलीमुळे परिसरातील पशुपालकांच्या पशुवैद्यकीय सेवेला मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

हटकर यांची बदली अचलपूर येथील पशुवैद्यकीय रुग्णालय येथे करण्यात आली असून अभावी मनुष्यबळामुळे ते आठवड्यातुन तीन दिवस अचलपूर व उर्वरित तीन दिवस नांदगाव पेठ येथे सेवा देत आहे.

नांदगाव पेठ, सावर्डी, पिंपळखुटा , कठोरा गांधी, दोनद, खानापूर, नांदुरा लष्करपूर , थूगाव, माहुली जहागीर, यावली, शेवती, जळका तसेच परिसरातील अनेक गावांमधील शेतकरी व पशुपालक आपल्या पशुधनाच्या उपचारासाठी नांदगाव पेठ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे या दवाखान्यातील अनुभवी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची बदली ही केवळ प्रशासकीय बाब नसून, त्याचा थेट परिणाम पशुपालकांच्या दैनंदिन पशुवैद्यकीय सेवांवर होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. हटकर यांच्या कार्यकाळात पशुधनावरील विविध आजारांवर उपचार करण्यासोबतच पशुवैद्यकीय शस्त्रक्रिया, रोगप्रतिबंधक लसीकरण, कृत्रिम रेतन तसेच विविध शासकीय पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आल्याचे पशुपालकांनी सांगितले.विशेष म्हणजे, अनेक गुंतागुंतीच्या पशुशस्त्रक्रिया यशस्वीपणे करून डॉ. हटकर यांनी अनेक मुक्या प्राण्यांचे प्राण वाचविले आहेत. त्यामुळे त्यांच्या उपचारपद्धतीवर पशुपालकांचा विश्वास निर्माण झाला असून, आपत्कालीन परिस्थितीतही डॉ. हटकर यांच्याकडून मिळणाऱ्या सेवेमुळे अनेक पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



पशुधन हे ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. अशा परिस्थितीत अनुभवी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची बदली झाल्यास पशुधनाच्या उपचारासाठी दूरवर जावे लागू शकते. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा आपत्कालीन परिस्थितीत पशुवैद्यकीय सेवा मिळण्यास विलंब झाल्यास पशुधनाच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता पशुपालकांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे डॉ. हटकर यांची बदली रद्द करून त्यांना नांदगाव पेठ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातच कार्यरत ठेवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यापेक्षा सध्या कार्यरत असलेल्या अनुभवी अधिकाऱ्याचीच सेवा नांदगाव पेठ व परिसरातील शेतकरी-पशुपालकांना उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

प्रशासन या मागणीची दखल घेऊन डॉ. हटकर यांची बदली रद्द करणार का, याकडे नांदगाव पेठसह परिसरातील शेतकरी व पशुपालकांचे लक्ष लागले आहे.

# आनंदवाडी येथे शालेय विद्यार्थ्यांना मोफत साहित्याचे वाटप



**तिवसा/प्रतिनिधीः-** महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, तिवसा यांच्या वतीने ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या 'मिलिंद कोचिंग क्लासेस'चा शुभारंभ रविवारी, २३ ऑगस्ट रोजी आनंद बुद्ध विहार, आनंदवाडी, तिवसा येथे उत्साहात संपन्न झाला.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जुलै १९२४ रोजी स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभा'च्या शैक्षणिक विचारांचा वारसा पुढे नेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. नवोदय परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, तसेच आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. चरनदास सोलंके, या. द. व. देशमुख महाविद्यालय, तिवसा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. प्रमोद गाडे, अध्यक्ष, तिवसा तालुका वकील संघ होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रा. रवींद्र मुंद्रे, सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना नवोदय पाठ्यपुस्तके, वह्या, पेन, पेन्सिल आदी शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षणातून स्वावलंबी, विवेकी आणि सजग नागरिक घडवावेत, असा संदेश उपस्थित मान्यवरांनी दिला. या कोचिंग क्लासेससाठी राजेंद्र शेंडे सर, जनार्दन शेंडे सर, अमित शापामोहन सर, बाळासाहेब तेलमोरे व वैशाली खाकसे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या या मोफत उपक्रमाचे पालक व नागरिकांनी स्वागत केले असून, तिवसा परिसरातील विद्यार्थ्यांना या माध्यमातून स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी मोठी मदत मिळणार आहे. यावेळी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीचे, अध्यक्ष दिलीपराव जवंजाळ, संदीप चक्रनारायण , नंदकुमार वानखडे, जगदीश दहीवडे , कविता सरदार, वंदना रामटेके, रसिका गाडगे, प्रतीक्षा मकेश्वर, प्रणिती खोब्रागडे, संजय दहाट, अरविंद वानखेडे , जगदीश माहोरे, समाधान खाकसे, शेंडे काकू , सारिका खाकसे आदी उपस्थित होते.

# निमा अमरावतीतर्फे वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांना आधुनिक निदानपद्धती, उपचारतंत्रे आणि विविध सुपरस्पेशालिटी क्षेत्रातील अद्ययावत माहिती मिळावी, या उद्देशाने नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA), अमरावती शाखेतर्फे कोकिळाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हॉटेल रंगोली पर्ल येथे झालेल्या या कार्यक्रमाला अमरावती शहरासह परिसरातील ISM डॉक्टर, भारतीय चिकित्सा पद्धतीतील वैद्यकीय तज्ज्ञ आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या CME मध्ये विविध वैद्यकीय शाखांतील नामांकित तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमातील वैज्ञानिक सत्रांमध्ये यकृतविकार, हाडे व मऊ ऊतींचे आजार तसेच फुफ्फुसाचा कर्करोग या महत्त्वाच्या विषयांवर विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमातील पहिल्या वैज्ञानिक सत्रात डॉ. राजन गर्ग, यांनी मार्गदर्शन केले. बालकांपासून प्रौढांपर्यंत आढळणाऱ्या विविध यकृतविकारांचे प्राथमिक निदान, आधुनिक उपचारपद्धती तसेच गंभीर रुग्णांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची



आवश्यकता आणि त्यातील आधुनिक प्रगती याबाबत त्यांनी माहिती दिली.

दुसऱ्या वैज्ञानिक सत्रात डॉ. मनीत गुंडाव्हडा यांनी विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या वैज्ञानिक सत्रात डॉ. मनीष जेठानी यांनी फुफ्फुसाच्या कर्करोगाचे आधुनिक निदान, रुग्णाचे योग्य स्टेजिंग, शस्त्रक्रियेतील आधुनिक तंत्रज्ञान, विविध उपचारपद्धती तसेच कर्करोग उपचार क्षेत्रात झालेल्या अलीकडील प्रगतीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला NIMA अमरावतीचे प्रेसिडेंट डॉ. प्रवीण औगड, NIMA Central चे जॉईंट सेक्रेटरी डॉ. विजय अजमिरे, कोऑर्डिनेटर डॉ. कमल राऊत, NIMA महाराष्ट्रचे कोऑर्डिनेटर डॉ. आशिष येवतिकार, आयुर्वेद फोरम महाराष्ट्रचे प्रेसिडेंट डॉ. अमोल ठवळी, टीचर फोरम अमरावतीचे प्रेसिडेंट डॉ. यशवंत वानखडे, वूमेन्स फोरम अमरावतीच्या प्रेसिडेंट डॉ. प्रेमा चौधरी, आयुर्वेद फोरम अमरावतीचे प्रेसिडेंट डॉ. उन्मेष डालके तसेच स्टुडंट्स फोरम अमरावतीचे प्रेसिडेंट अंकित कात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण डॉ. यशवंत वानखडे यांनी केले. डॉ. उज्वल बारंगे आणि डॉ. पायल आशय रोकडे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. तर NIMA अमरावतीचे सेक्रेटरी डॉ. पंकज कावरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे डॉ.के.के.मोहाडीकर यांचा सत्कार व निरोप समारंभ

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ.के.के. मोहाडीकर यांची महिला महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्धल त्यांचा श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या कॉलेज कौंसिलच्या वतीने सत्कार करण्यात येऊन त्यांना निरोप देण्यात आला.



महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यगौरव व सत्कार सोहळ्याला इंग्रजी विभागप्रमुख डॉ.शिवाजी कानफाडे, डॉ.उमेश कडू, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.संगीता भुयार प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्व प्रमुख उपस्थितांनी तसेच डॉ.राजेश मिरगे, डॉ.ज्ञानेश्वर नामुर्ते, डॉ. संजय कटाईत, डॉ . वैशाली टाकोडे यांनी आपल्या भाषणातून डॉ.कुलदीप मोहाडीकर यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला.एक मित्र व सहकारी म्हणून मोहाडीकर यांच्या अनेक आठवणी सांगून त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.महेंद्र मेटे यांनी अॅकॅडेमिशियन म्हणून मोहाडीकर यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या नॅक समितीतील महत्त्वपूर्ण कार्याचा उल्लेख केला.

डॉ. मोहाडीकर यांनी नियुक्ती पासून आजपर्यंत केलेल्या कार्याचा उल्लेख करत सर्वांच्या वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानून भविष्यातही सर्वांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.या कार्यक्रमात डॉ.मोहाडीकर यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन कॉलेज कौन्सिलचे सचिव डॉ.जयराम गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रामानुजन गणितीय सोसायटीचे उद्घाटन उत्साहात

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथे गणित विभागाच्या वतीने रामानुजन गणितीय सोसायटीचे उद्घाटन मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर होते. यावेळी आय क्यु ए सी समन्वयक प्रा. एस. ए. वाणी, गणित विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. केने तसेच डॉ. एम. एस. पळसपगार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व रामानुजन गणितीय सोसायटीच्या स्थापनेमागील उद्दिष्टांची माहिती गणित विभागप्रमुख डॉ. रेखा केने यांनी दिली. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण करणे, तर्कशक्ती व गणितीय विचारसरणी विकसित करणे तसेच सर्जनशीलता आणि संशोधनवृत्तीला चालना देणे हा सोसायटीच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मान्यवरांच्या हस्ते रामानुजन गणितीय सोसायटीचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सोसायटीच्या सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार व गौरव करण्यात आला.



यावेळी प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांनी विद्यार्थ्यांनी गणिताकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता त्यातील तर्क, सर्जनशीलता आणि दैनंदिन जीवनातील उपयोग समजून घ्यावा, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एस्सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी गौरी गावंडे हिने प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रज्वली डांबरे हिने आभार प्रदर्शन करून उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

रामानुजन गणितीय सोसायटीच्या स्थापनेपासून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनापर्यंत डॉ. रेखा केने आणि डॉ. एम. एस. पळसपगार यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच गणित विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी जिज्ञासा निर्माण करून त्यांना गणितीय विचार, तर्कशक्ती आणि सर्जनशीलतेची नवी दिशा देण्यासाठी ही सोसायटी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ईद निमित्त काढण्यात आलेल्या रॅलीने मोर्शी नगरी दुमदुमली!

## -मोर्शीत हिंदू मुस्लिम बांधवांच्या एकात्मतेचे दर्शन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मुस्लिम बांधवांचे आराध्य दैवत हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जश्न ईद मिलादुन्नबी निमित्ताने काढण्यात आलेल्या बंधुभाव व सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या शोभायात्रा रॅलीने मोर्शीनगरी दुमदुमली. यावेळी शहरातील मुख्य रस्त्यावर व जयस्तंभ चौकात झेंडे व पताका लावून शहर सुसज्ज करण्यात






आले होते.

या शोभायात्रा रॅलीत मौलवी हजरत अल्लामा आशिक हुसेन,हजरत हाफिज व कारी फरहान रजा,हजरत हाफिज व कारी गुलाम मुस्तफा,हजरत हाफिज व कारी उमर फारूक, हजरत हाफिज व कारी नबील रजा,हजरत हाफिज सैफुलकमर, मौलाना इमरान हाशमी अल्हाज कमरुद्दीन सहभागी झाले होते. सर्वप्रथम पेठपुरा परिसरातील मदिना मज्जिद येथून सकाळी ८ वाजता या शोभायात्रा रॅलीची सुरुवात करण्यात आली. समोर ही रॅली मार्गक्रमन करीत फरीद कॉलनी,ताज कॉलनी,नूर कॉलनी,गिट्टीखदान येथून पेठपुरा चौक,आठवडी बाजार,जयस्तंभ चौक, मुख्य बाजारपेठ,गांधी चौक,गुजरी बाजार चौक येथून थेट या रॅलीची सांगता मदिना मज्जिद येथे करण्यात आली. शोभायात्रा रॅली मार्गावर जागोजागी नाश्ता प्रसाद पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सामाजिक कार्यकर्ते गोलू शेख यांच्या तर्फे रॅलीत सहभागी मौलवी यांचा व ठाणेदार राहुल आठवले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव विपुल भडांगे, नगरसेवक भूषण कोकाटे, पत्रकार अजय पाटील, गजानन हिरुळकर,संजय गारपवार यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक तथा मुस्लिम समाजातील वयोवृद्ध नागरिकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान रॅलीत सहभागी मुस्लिम बांधवांना तसेच उपस्थित हिंदू बांधवांना बुंदीच्या लाडूचे वाटप करण्यात आले.आठवडी बाजार येथे इसरार सरताज यांच्यातर्फे सर्व मौलवी, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, ठाणेदार राहुल आठवले, यासह शहरातील प्रतिष्ठित हिंदू मुस्लिम बांधवांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच रॅलीत सहभागी मुस्लिम बांधव व शहरातील हिंदू बांधव यांच्यासाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.या शोभायात्रा रॅलीने हिंदू मुस्लिम बांधवांच्या एकात्मतेचे दर्शन घडवून आणले.शोभायात्रा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील,पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.ही शोभा यात्रा रॅली अतिशय शांततेत पार पडली. शोभायात्रा रॅलीच्या यशस्वीतेसाठी मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्ते शेख गोलू, मोहम्मद इसरार सरताज, इम्रानोद्दीन साहिल, शहबाज़ खान,परवेज़ खान,मोहम्मद अफसर, मोहम्मद एजाज़,मोहम्मद ज़ैद,मोहममद जुमैर, मुश्ताक सर,वसीम कुरेशी,अजीज पठाण, शेराखान,वसीम सरताज, हाफिज़ सैफुल क़मर, अब्दुल नईम,युसुफभाई इत्यादी मुस्लिम बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

## पीएम मोदी साधणार पोटे पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी संवाद

# 'विकसित भारत युवा कनेक्ट' उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत सरकारच्या युवक आणि क्रीडा मंत्रालयाच्या 'विकसित भारत युवा कनेक्ट' या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी (२७ ऑगस्ट) विद्यार्थ्यांशी ऑनलाइन (व्हर्च्युअल) संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील ३७ महाविद्यालयांची निवड करण्यात आली असून, अमरावती जिल्ह्यातून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची या उपक्रमासाठी एकमेव निवड झाली आहे. यामुळे संस्थेच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेल्याचे स्पष्ट होत आहे. महाविद्यालयात गुरुवारी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान सकाळी ११ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाने केलेल्या उत्कृष्ट सामाजिक कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली असून, थेट पंतप्रधानांशी संवादाची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

महाराष्ट्र शासन

**श्री.प्रदीपकुमार पवार, उपविभागीय अधिकारी मोर्शी यांचे न्यायालय**

**वरुड रोड, मोर्शी- ४४४ ९०५**

**रा.मा.क्र. आर.टी.एस.-६४/नया वाठोडा/ /२०२५-२६**

**जाहीर नोटीस**

**प्रति,**

१. श्री पंजाबराव गुलाबराव लेव्हरकर
रा.कृषी कॉलनी मोर्शी, ता.जि.अमरावती
२. श्री पंजाबराव गुलाबराव लेव्हरकर
रा.नया वाठोडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. श्री शंकुतला भाऊराव नांदेकर
४. श्री जिजाबाई वासुदेव
दोन्ही रा.परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
५. कमल रविंद्र हातेकर
रा.अकोला, जि.अकोला
६. बेबी गुलाबराव लेव्हरकर
रा.नारा ककडा,ता.कारंजा घाडगे, जि.वर्धा

**विषय :-** रा.मा.क्र. आर.टी.एस.-६४/नया वाठोडा/ /२०२५-२
सौ.उषा गवळी विरुध्द श्री पंजाबराव लेव्हरकर व इतर.
प्रकरणात हजर राहणेबाबत.

याव्दारे जाहीर नोटीस प्रसिध्द येते की, उपरोक्त राजस्व प्रकरण या कार्यालयात दाखल झाले असून सदर प्रकरणात आपले नाव उत्तरार्थी म्हणुन नमुद आहे. तरी सदर प्रकरणात आपण आपले म्हणणे मांडण्याकरिता दिनांक ०८/०९/२०२६ रोजी ठिक ११.०० वा.या न्यायालयात हजर राहावे व येतांना आपले बचावार्थ संबंधित सर्व मुळ कागदपत्रांसह हजर न राहिल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी,
मोर्शी

**जाहीर नोटीस**

**वि.८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

सक्सेशन क्र.१५३०/२०२६ चौ.ता.०४.०९.२०२६

**अर्जदार -** Pradip Bhagwantrao Sawarkar,
Age 50 Yrs. Occu.: Labour
R/o Malipura Savata Chowk, Walgaon, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -**
1) Smt.Vandana Wd/o Manohar Sawarkar
Age 51 Yrs. Occu.: Household
2) Vaishnavi D/o Manohar Sawarkar,
Age 21 Yrs. Occu.: Education
Both R/o 1189, Scheme No.51, Near 155, Pani Tanki Industrial Estate, Indore, Dist.Indore
3) Priya W/o Sunil Thakare,
Age 29 Yrs. Occu.: Household
R/o 21, Govind Colony, Indore, Dist.Indore

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३८३ अन्वये या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दि.१२.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा.अधीक्षक (प्रशा.)**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर)**
**अमरावती**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॅट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशासाठी जिल्ह्याला २.६६ कोटींचा निधी

## शैक्षणिक सत्र सुरू होऊन दोन महिने उलटले; निधी वितरणास विलंब

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊन दोन महिन्यांहून अधिक कालावधी लोटल्यानंतर अखेर सरकारी शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशासाठी निधी प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला पहिल्या गणवेशाची शिल्लक रक्कम आणि दुसऱ्या गणवेशासाठी मिळालेला निधी मिळून एकूण २ कोटी ६६ लाख ४८ हजार ४०० रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील १ हजार ५५७ सरकारी शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ दिला जातो. शासनाकडून शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना दोन गणवेश उपलब्ध करून देण्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात दुसऱ्या गणवेशाचा निधी उशिरा मिळाल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

**पहिल्या गणवेशासाठीही निधी अपुरा**

पहिल्या टप्प्यात शासनाने प्रतिगणवेश २४० रुपये याप्रमाणे २ कोटी ४३ लाख १९ हजार ४४० रुपयांचा निधी मंजूर करून तालुकास्तरावर वितरित केला होता. मात्र, या रकमेतही गणवेश शिवून घेण्यासाठी पालकांना अतिरिक्त खर्च करावा लागला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याच गणवेशात शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळेत हजेरी लावली. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी दोन गणवेश देणे अपेक्षित आहे. यामध्ये नियमित शालेय गणवेशासह स्काऊट-गाईड गणवेशाचा समावेश आहे. दोन्ही गणवेशांसाठी एकूण ६०० रुपये निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.या योजनेचा लाभ सर्व विद्यार्थिनी, अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थी, बीपीएल कुटुंबातील विद्यार्थी तसेच पात्र ओबीसी व सामान्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिला जातो.



**शाळांना अन्य निधीचीही प्रतीक्षा**

दरम्यान, शाळांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेली समग्र शिक्षा अभियानाची निधी तसेच सादील रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अनेक शाळांमधील आवश्यक खर्च मुख्याध्यापक व शिक्षकांना स्वतःच्या खिशातून करावा लागत असल्याचे चित्र आहे. समग्र शिक्षा अभियानाची निधी आणि सादील रक्कम तातडीने शाळांना उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समित्यांकडून करण्यात येत आहे. दुसऱ्या गणवेशासाठी निधी उशिरा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर बराच काळ गणवेशाची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे प्राप्त निधी तालुकास्तरावर तातडीने वितरित करून विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पंचायत समिती निहाय निधी

| पंचायत समिती | अनुदान (रुपये) |
|---|---|
| १ अचलपूर | २९,०७,३०० |
| २ अमरावती | १५,४८,९०० |
| ३ अंजनगाव सुर्जी | १४,८१,७०० |
| ४ भातकुली | ११,११,२०० |
| ५ चांदूर बाजार | १८,६९,३०० |
| ६ चिखलदरा | २७,८७,६०० |
| ७ चांदूर रेल्वे | ९,७३,२०० |
| ८ दर्यापूर | १६,७८,८०० |
| ९ धारणी | ५४,८५,२०० |
| १० धामणगाव रेल्वे | ८,४९,९०० |
| ११ मोर्शी | १७,६४,३०० |
| १२ नांदगाव खंडेश्वर | १३,७७,९०० |
| १३ तिवसा | ११,००,१०० |
| १४ वरूड | १७,१३,००० |
| **एकूण** | **२,६६,४८,४००** |

## संक्षिप्त



### वाचनालयात हुतात्मा राजगुरू जयंती

**तिवसा-** येथील श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील थोर क्रांतीकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने वाचनालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला नगरसेवक अनिल थुल आणि पत्रकार हेमंत निखाडे यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.या अभिवादन कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रकाश विजयकर, सुमित अनासाने,भूषण बाखडे, अंकुश देशमुख, प्रशिक शापामोहन,सुरज तंवर,सतीश नंदनवार,दीपक धानोरकर, राजाभाऊ देशमुख, हृषीकेश गंधे, कृणाल गौरखेडे, यशवर्धन भगत, सचिन काळे, सौरभ कटारणे, राहुल धडांगे,गुणवंत दुबे,अशोक वानखडे, विठ्ठल राऊत,सुरेंद्र पाटणे,अजाब सरोदे, आयुष जोशी, विशाल गडलिंग,प्रशांत कुऱ्हेकर अमोल रुपणावर, कल्पेश धानोरकर, खुशी अलोणे, जेविका शेंद्रे, आचल मुंदाणे यांच्यासह वाचनालयातील बहुसंख्य वाचक वर्ग आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आरोग्य तपासनी शिबीर

**अमरावती-** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व (आयुषमान भारत) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत रहेमत नगर, हैदरपुरा, अमरावती येथे आरोग्य तपासनी शिबिराचे आयोजन डॉ. अमोल नराटे (वैद्यकिय अधिक्षक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती) व डॉ. मंगेश मेंढे (विशेष कार्य अधिकारी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती) यांच्या मार्गदशनाखाली करण्यात आले.आरोग्य तपासनी शिबिरामध्ये कर्करोग, हृदयरोग,मेंदुरोग संबंधित आजार,लघवी संबंधित आजार, किडणीरोग संबंधित आजार, किडणी प्रत्यारोपन, बालरोग संबंधित आजार, प्लास्टीक सर्जरी संबंधित आजार, कान, नाक घसा (कॉकरियल) संबंधित आजार व एन.सी.डी. संबंधित रुग्ण तपासनी करुण एकुण १०२ रुग्णांपैकी ९ रुग्ण विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात आले.मोफत आरोग्य शिबिरमध्ये तपासनी करीता विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील तज्ञ वैद्यकीय चमुमध्ये डॉ.खालीद इनामदार (वैद्यकीय अधिकारी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती,भुपेंद्र जेवडे (वैद्यकीय शिबीर समन्वयक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती), अभिजीत करवाडे, सुरज देशमुख (अधिपरीचारक ब्रदर) तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.



### पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये सामाजिक उपक्रम

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे नुकताच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे आयोजित कार्यक्रम सहभाग नोंदवला.या अंतर्गत शिवाजी ग्राउंड वर मृदा व जलसंधारण विभागातर्फे Walkathon ही मृदा व जलसंधारण च्या निर्धारक करता विविध कार्यक्रम व दिंडी आयोजित केली.यामध्ये विद्यार्थ्यांनी मृद व जलसंधारणाची घोषवाक्य या दिंडीमध्ये उद्घोषली. समारोपामध्ये शासनाच्या विभागामार्फत उपस्थित सहभाग्यांकरिता पारितोषिक वितरण झाले व शिवाजी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन जी देशमुख तसेच अमरावती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांची उपस्थिती लाभली.यानंतर महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता परदेशी शिक्षणाच्या संधी व योग्यता याविषयीचे केसी ओव्हरसीस नागपूर या संस्थेचे उपाध्यक्ष विपिन मुकादम यांचे सादरीकरण व व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानास सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



## मोहम्मद पैगंबरांचा जन्म मानवजातीच्या कल्याणासाठी सुखकर- आ.सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**

हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मानवजातीला सत्य, न्याय, करुणा आणि परस्पर सन्मानाचा मार्ग दाखविला. त्यांच्या शिकवणुकीतून समाजात शांतता, सद्भावना आणि एकोपा निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. त्यांचा जन्म हा संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी सुखकर ठरला, म्हणूनच जीवनात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे झालेल्या चुकांची क्षमायाचना करून सदाचाराचा मार्ग अवलंबित सर्वांनी विकासाच्या ध्येयाने प्रेरीत होऊन समृद्धीकडे वाटचाल करण्याचे आवाहन आ.सुलभा खोडके यांनी केले. अमरावती शहराच्या मुस्लिम बहुल भागातही जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीचा उत्साह दिसून आला. याप्रसंगी अमरावतीच्या आ.सुलभा खोडके व विधान परिषद आ.संजय खोडके यांनी जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीच्या कार्यक्रमात सहभागी होऊन अनुयायांसमवेत समरस होऊन ईद-ए-मिलाद चा आनंद द्विगुणित केला. दरम्यान ईद-ए-मिलादुन्नबीच्या पर्वावर मरकज मस्जिद मिस्कीन शाह मियाँ येथून भव्य जुलूस काढण्यात आला. दरम्यान चांदनी चौक परिसर स्थित आ.सुलभा खोडके जनसंपर्क कार्यालय समीप या भव्य शाही जुलूसचे आगमन झाले.यासोबतच पारंपारिक पद्धतीने वेशभूषा धारण केलेल्या चिमुकल्यांसह त्यांच्या पालकांना सुद्धा आमदार खोडके दाम्पत्यानी यावेळी शुभेच्छा दिल्या. हा जुलूस मार्गक्रमण करीत असतांना जागोजागी पुष्पवृष्टी करीत सहभागी अनुयायांचे स्वागत करण्यात आले.

## पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी साधणार पंतप्रधानांशी संवाद

### 'विकसित भारत युवा कनेक्ट' उपक्रमासाठी राज्यातील ३७ महाविद्यालयांमध्ये निवड




**अमरावती/का.प्र.**

'विकसित भारत युवा कनेक्ट' या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्चुअल संवाद साधण्यासाठी अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची राज्यातील ३७ महाविद्यालयांमध्ये निवड झाली आहे. विशेष म्हणजे, अमरावती जिल्ह्यातून या उपक्रमासाठी निवड झालेले हे एकमेव महाविद्यालय आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याचे मानले जात असून, ही अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या उपक्रमांतर्गत गुरुवार, २७ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्चुअल संवाद साधणार आहेत. सकाळी १० ते दुपारी ४ या कालावधीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी ११ वाजता पंतप्रधान विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

'विकसित भारत युवा कनेक्ट' हा भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाचा प्रमुख राष्ट्रीय उपक्रम आहे. 'विकसित भारत २०४७'च्या संकल्पनेशी देशातील युवकांना जोडणे, युवक व धोरणकर्त्यांमध्ये थेट संवाद निर्माण करणे तसेच शासन, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात युवकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'माय भारत' पोर्टलच्या माध्यमातून युवकांचा सहभाग वाढविण्यावरही भर देण्यात येत आहे. यंदा या उपक्रमात 'व्यसनमुक्त युवा, विकसित भारत' या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला आहे. त्याअंतर्गत महाविद्यालये, विद्यापीठे व विविध शैक्षणिक संस्थांमध्ये युवासंवाद, कार्यशाळा व परिसंवाद आयोजित केले जात आहेत.पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांची दखल घेत महाविद्यालयाची या राष्ट्रीय कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. राज्यातील ३७ महाविद्यालयांमध्ये स्थान मिळविण्यासोबतच अमरावती जिल्ह्यातून एकमेव महाविद्यालय म्हणून निवड झाल्याने महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकीच्या कार्याला विशेष अधोरेखित मिळाले आहे.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी थेट व्हर्चुअल संवाद साधण्याची संधी मिळणार असल्याने विद्यार्थी व शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. युवकांना देशाच्या विकासाच्या संकल्पनेशी जोडणारा आणि त्यांच्या विचारांना राष्ट्रीय स्तरावर व्यक्त होण्याची संधी देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची झालेली निवड ही अमरावती जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी निश्चितच मानाचा तुरा ठरली आहे.

## खाकी चहाच्या पेल्यात मग्न, पंचवटी चौकात चोरट्यांचा हैदोस

### अमरावतीत महिला सुरक्षा रामभरोसे!

**अमरावती/का.प्र.**

पंचवटी चौकात आज सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास खाकी वर्दीला काळीमा फासणारा प्रकार समोर आला आहे. अमरावतीवरून सुटणाऱ्या 'शिवाई' बसमध्ये चढणाऱ्या महिला प्रवाशांच्या पर्समधून पैसे आणि दागिने चोरण्याचा प्रयत्न काही भामट्यांनी केला.

विशेष म्हणजे, अवघ्या काही अंतरावर असलेल्या हॉटेलमध्ये वाहतूक पोलीस चहा पिण्यात मग्न होते. बस वाहकाने (कंडक्टर) आरडाओरड करूनही पोलिसांनी जागेवरून हलण्याचे कष्ट घेतले नाही. शेवटी पोलिसांची वाट न पाहता बस वाहकानेच चोरट्यांचा थरारक पाठलाग केला. या घटनेमुळे अमरावती पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पोलिसांसमोरच महिला असुरक्षित असल्याचे विदारक चित्र उघड झाले.

#### 'खाकी'ऐवजी 'कंडक्टर' धावला!

पोलिसांची उदासीनता पाहून अखेर बस वाहकाने स्वतःच हिंमत दाखवली. त्याने बसमधून उतरून थेट पळणाऱ्या चोरट्यांच्या मागे धाव घेतली. मात्र, पोलिसांच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि वेळेवर मदत न मिळाल्यामुळे चोरटे गर्दीचा फायदा घेऊन पसार होण्यात यशस्वी झाले. पंचवटी चौकासारख्या गजबजलेल्या ठिकाणी दिवसाढवळ्या महिलांवर चोरटे डल्ला मारत आहेत आणि पोलीस मात्र चहाच्या पेल्यात मग्न आहेत. या घटनेमुळे अमरावतीकरांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्त फळे, बिस्किटांचे वाटप

### मुस्लिम बांधवांचा समाजोपयोगी उपक्रम



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

ईद-ए-मिलाद-उन-नबीचे औचित्य साधून चांदूर रेल्वे शहरातील काझीपुरा येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. इस्लाम धर्मात ईद-ए-मिलाद-उन-नबीला विशेष महत्त्व आहे. इस्लाम धर्माचे अंतिम प्रेषित हजरत मुहम्मद मुस्तफा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. प्रेषित हजरत मुहम्मद यांच्या प्रेम, दया, बंधुभाव याच भावनेतून मुस्लिम बांधवांनी समाजसेवेचा उपक्रम राबवत निवासी मूकबधिर विद्यालय, विरुळ रोड,चांदूर रेल्वे, अपंग मूकबधिर शाळा, सोनगाव रोड तसेच ग्रामीण रुग्णालय आणि शहरातील इतर ठिकाणी फळे व बिस्किटांचे वाटप केले. या समाजोपयोगी उपक्रमात न.प. गटनेते हाजी मोहम्मद आनिस सौदागर,शेख गफ्फार,कुंदनसिंग राठोड,बाबर सौदागर,शहीद सौदागर,मोहसीन खान,अकबर सौदागर,आदिल सौदागर, हारिस सौदागर,वाहिद सौदागर,शासकीय कंत्राटदार इमरान सौदागर,नदीम सौदागर, परवेज मुशर्रफ, युसुफ सौदागर, शेख रेहान,अदनान सौदागर,शेख रिझवान, अजहर हुसैन, शहेजाद खान,मोहम्मद कबीर, अरझान सौदागर, माहेरा सौदागर, जुनैशा सौदागर,आयझा सौदागर, अयान, अक्सा, दानियाल, हाशिर, हानिया व कैफ यांच्यासह मुस्लिम बांधवांचा सहभाग होता. ईद-ए-मिलादच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, मानवता आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

### जि.प. पूर्व माध्यमिक शाळेच्या चिमुरड्या विद्यार्थ्यांची देशसेवा

## भारतीय जवानांना पाठवल्या स्वहस्ते बनवलेल्या राख्या!



**अमरावती/का.प्र.**

बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण असलेल्या 'रक्षाबंधना'च्या निमित्ताने समाजातील विविध घटकांकडून आनंद व्यक्त केला जात असतानाच, अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा निंभोरा देलवाडीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे. शाळेतील चिमुरड्या विद्यार्थ्यांनी आपल्या वीर जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्वतःच्या हाताने सुंदर राख्या तयार केल्या असून, त्या आता सीमेवर रक्षण करणाऱ्या भारतीय सैनिकांना पाठवण्यात येत आहेत.

शाळेमध्ये रक्षाबंधनानिमित्त नुकतीच 'राखी मेकिंग ॲक्टिव्हिटी' उत्साहात पार पडली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या आकर्षक आणि सुंदर राख्या बनवल्या. विशेष म्हणजे, या राख्या केवळ प्रदर्शनापुरत्या मर्यादित न ठेवता, 'देशाचे रक्षण करणाऱ्या आमच्या लाडक्या जवानांना आपल्या बहिणींच्या प्रेमाची आणि आदराची आठवण राहावी,' या उदात्त हेतूने त्या सैनिकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय मुलांनी व शाळा प्रशासनाने घेतला.

या राख्यांसोबतच विद्यार्थ्यांनी सैनिकांच्या नावे एक अत्यंत भावस्पर्शी पत्रही पाठवले आहे. 'तुम्ही सीमेवर आहात म्हणूनच आम्ही देशात सुरक्षित आहोत, तुमच्या त्याग आणि शौर्याला आमचा कोटी कोटी प्रणाम,' असा संदेश या पत्रातून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या या छोट्याशा परंतु देशभक्तीने ओतप्रोत भरलेल्या कृतीमुळे शिक्षण वर्तुळातून आणि ग्रामस्थांकडून शाळेच्या या उपक्रपाचे सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच देशाभिमान, सैनिकांविषयी आदर आणि सामाजिक जाणिवा रुजवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरला आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अमरावती-परतवाडा मार्ग चौपदरीकरणासाठी जनआंदोलनाची वज्रमूठ

### सर्वपक्षीय बैठकीत आंदोलनाचा निर्धार

**अचलपूर/वार्ताहर**

गजबजलेला आणि अपघातांच्या दृष्टीने संवेदनशील ठरलेल्या अमरावती-परतवाडा मार्गाच्या चौपदरीकरणाची मागणी आता तीव्र होणार आहे. मार्गाच्या चौपदरीकरणासाठी मतभेद बाजूला ठेवून एकत्रित जनआंदोलन उभारण्याचा निर्धार नुकतेच स्थानिक विश्रामगृहात झालेल्या सर्वपक्षीय व सामाजिक बैठकीत करण्यात आला.

परतवाडा शहरातील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र रोडे यांच्या प्रयत्नातून आयोजित बैठकीत सरकारचे लक्ष वेधणे,जनजागृती करणे आणि आंदोलनाची दिशा निश्चित करण्याबाबत चर्चा झाली. यावेळी सर्वानुमते 'नागरिक कृती समिती'ची स्थापना करून प्रमोद डेरे सचिव



आणि जितेद्र रोडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. लवकरच कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केल्या जाईल असे या बैठकीत ठरविण्यात आले.अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सतीशकुमार व्यास, हर्षद चव्हाण, अजय अग्रवाल, संतोष नरेडी, राजकुमार महल्ले, अरविंद घोम बहुतांश उपस्थितांनी आपले प्रभावी मत मांडले.

'अमरावती-परतवाडा मार्गाचे चौपदरीकरण झालेच पाहिजे', अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.या बैठकीला संजय जोशी, सतीश व्यास, संतोष नरेडी, अजय अग्रवाल, हर्षद चव्हाण, राजकुमार महल्ले, विजय गोंडचवर, जितेंद्र रोडे, प्रमोद डेरे, विश्राम कुळकर्णी,अरविंद घोम,निलकंठ गावंडे, गोवर्धन मेहरे, संतोष भालेराव,दीपक तायडे,गजानन पोरे, सचिन करडे, अजय अग्रवाल,श्रीकांत राजुरकर, विलास उदापूरकर, अनिल चऱ्हाटे, दिवाकर किटुकले, मुरलीधर ठाकरे, कैलास पेंढारकर, पदमाकर घोगरे, पंकज गुप्ता, डॉ. हर्षद मडघे, प्रितेश अवघड, बंडू घोम, शुभम बरडे, जय हावरे, इम्मानुएल चव्हाण, विजय सोसे, विलास लांडे, सागर डांगे, विनोद इंगळे, निलेश राऊत, संजीवकुमार डागा, अभिजित पडोळे, डॉ. कौस्तुभ ठाकरे, मधुकराव नाकट, डॉ. विजय मोहोड, गिरीष दौलतानी, विजयकुमार थावानी, आशिष तायडे, निखिल जाधव, प्रा. साहेबराव दामोदरे, ॲड.दादा टाले, मोनू सुळे, सानु खान, इमरान अहमद खा, विलास लांडे, वसीम सुलतानी, भानुदास वानखडे, हरिदास धोटे, यांचा समावेश होता.

# महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या संगनमताने आखलेला 'बेकायदेशीर मोजणी'चा डाव अंगलट!

## मूळ आदिवासी मालकाच्या तीव्र विरोधामुळे अधिकारी पाऊल मागे घेण्यास हतबल

### -आदिवासी खदानधारकाला त्रास देण्यासाठी त्रयस्थ व्यक्तीकडून मोजणी शुल्क स्वीकारल्याचा धक्कादायक प्रकार ?

**ॲड. समीर ठाकूर**
**अकोला** : तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील गट नंबर ३५ च्या महसूल प्रक्रियेत उपजिल्हाधिकारी महसूल, अकोट एसडीओ आणि भूमी अभिलेख कार्यालयाने कायद्याचे धिंडवडे उडवत एका त्रयस्थ व्यक्तीशी संगनमत केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. कायदेशीर परवानाधारक खदान व्यवसायाला नाहक त्रास देण्यासाठी चक्क एका अनोळखी तक्रारदाराकडून शासकीय मोजणीचे शुल्क स्वीकारून भूमी अभिलेखच्या अधिकाऱ्यांनी स्वतःच्याच गळ्याभोवती कायदेशीर फास आवळला आहे. मात्र, खदाणीचे मूळ आदिवासी मालक भीमराव कासदे यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाचा हा कथित 'चिरीमिरी' डाव पुरता उधळला गेला असून अधिकाऱ्यांना मोजणी न करताच रिकाम्या हाताने परतावे लागले आहे.




गाजीपूर येथील गट नंबर ३५ आदिवासी जमीन मालक भीमराव कासदे यांचा कायदेशीर आणि सर्व परवान्यांसह खदान व्यवसाय सुरू आहे. मात्र, या गटावर नाव नसलेल्या, आजूबाजूला कोणतीही शेतजमीन किंवा संबंध नसलेल्या जितू जेसवाणी नामक त्रयस्थ व्यक्तीने वैयक्तिक कारणाने थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केली. आश्चर्याची बाब म्हणजे, याप्रकरणी उपजिल्हाधिकारी महसूल यांनी कोणतीही पडताळणी न करता या तक्रारीची दखल घेत थेट 'शासकीय चौकशी'चे आदेश दिले. या प्रकरणात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्या आदेशाचा विपर्यास करून घेत भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी चक्क संबंध नसलेल्या त्रयस्थ व्यक्ती तक्रारदार जितू जेसवाणी यांच्याकडून मोजणी शुल्क भरून घेतले, एवढेच नव्हे तर मूळ जमीन मालकालाच मोजणीच्या पूर्वसंध्येपर्यंत कोणतीही पूर्व सूचना सुद्धा देण्यात आली नसल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे, तर या मोजणीची माहिती मिळताच मूळ आदिवासी जमीनधारक यांनी सदर प्रकरणी लेखी हरकत नोंदवत आपण ही मोजणी कोणत्या अधिकाराखाली त्रयस्थ व्यक्तीच्या तक्रारीवर मोजणी शुल्क भरून घेत करत आहात ? यांसह विविध कायदेशीर प्रश्नांची सरबत्ती लावून

चक्क भूमी अभिलेखच्या अधिकाऱ्यांनाच घाम फोडला. तरी मोजणीच्या दिवशी भूमी अभिलेख चे कर्मचारी यांनी सदर स्थळाचा पंचनामा करीत मूळ जमीन मालक उपस्थित नसल्याचे आणि त्यांचा कार्यालयात आक्षेप असल्याचे कारण दर्शवत मोजणी करता आली नसल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे.

**नियम धाब्यावर बसवून स्वीकारली 'चिरीमिरी'?**

वरिष्ठ न्यायालयांचे स्पष्ट आदेश आणि शासकीय परिपत्रकानुसार शासकीय चौकशीची मोजणी ही शासकीय खर्चाने होणे बंधनकारक आहे. जमिनीशी दूरदूरपर्यंत संबंध नसलेली तिसरी व्यक्ती कायद्यानुसार मोजणीचे शुल्क भरूच शकत नाही. असे असतानाही, अकोट भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी कथित 'चिरीमिरी'च्या जोरावर तक्रारदार जितू जेसवाणी याच्या नावाचे मोजणी शुल्क स्वीकारून खाजगी मोजणीची पावती फाडली असल्याचा आरोप होत असून हा प्रकार कायद्याच्या भाषेत अधिकाराबाहेरचे कृत्य आणि उघड प्रशासकीय अनियमितता या प्रकारात येतो.

**■ उच्च न्यायालय आणि लाचलुचपत विभागाकडे धाव घेणार!**

या प्रकरणातील भूमी अभिलेख कार्यालयाने स्वीकारलेले बेकायदेशीर मोजणी शुल्क याविरोधात आता आदिवासी जमीन मालक उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात 'रिट पिटिशन' दाखल करण्याच्या तयारीत आहेत. तसेच, त्रयस्थ व्यक्तीचे पैसे स्वीकारणाऱ्या भूमी अभिलेख अधिकाऱ्यांविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि भूमी अभिलेख विभागाच्या वरिष्ठ उपसंचालकांकडे या प्रशासकीय अनियमिततेची तक्रार केली जाणार असल्याची माहिती आहे.

**■ आदिवासी खदानधारकाच्या हरकतीने अधिकारी पळाले!**

या बेकायदेशीर चलनाची घाईघाईने अंमलबजावणी करण्यासाठी भूमी अभिलेखचे अधिकारी व कर्मचारी फौजफाटा घेऊन मोजणीसाठी थेट जागेवर पोहोचले. मात्र, जमिनीचे मूळ मालक आणि कायदेशीर खदानधारक भीमराव कासदे यांनी या बेकायदेशीर मोजणीला तीव्र आक्षेप घेतला. 'माझ्या संमतीशिवाय आणि मालकी हक्क नसताना त्रयस्थ व्यक्तीच्या सांगण्यावरून सरकारी अधिकारी माझ्या जागेवर घुसखोरी कशी करू शकतात?' असा धारदार सवाल कासदे यांनी उपस्थित करताच अधिकाऱ्यांची बोलती बंद झाली. कायदेशीर कचाट्यात अडकण्याच्या भीतीने अधिकाऱ्यांनी मोजणी तात्काळ स्थगित केली आणि त्यांना माघार घ्यावी लागली.

# अबब... श्वानांसाठी ९४ लाखांची इमारत

### पाच श्वानांसाठी दोन मजली इमारत;

## जिल्हा नियोजनातून निधी मंजूर

**वर्धा/प्रतिनिधीः-** पोलिस तपासात श्वान पथकाचे महत्त्व निर्विवाद असले, तरी वर्धा जिल्हा पोलिस दलातील श्वानांसाठी तब्बल ९४ लाख रुपये खर्चून दोन मजली स्वतंत्र इमारत उभारण्याचा निर्णय चर्चेचा विषय ठरला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या इमारतीसाठी ९४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे सध्या जिल्हा पोलिस दलाकडे पाच श्वान कार्यरत आहेत.



नव्या इमारतीत प्रत्येक श्वानासाठी स्वतंत्र खोली आणि पिंजरा, भोजन तयार करण्यासाठी स्वयंपाकघर, भोजन ठेवण्याची व्यवस्था, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था तसेच फर्निचरची सुविधा असणार आहे. भविष्यात श्वानांची संख्या आठपर्यंत वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन इमारतीची क्षमता निश्चित करण्यात आली आहे. व्हीव्हीआयपी बंदोबस्तासाठी इतर जिल्ह्यांतून येणाऱ्या श्वानांसह त्यांच्या हस्तक आणि अधिकाऱ्यांच्या निवासाची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. पोलिस ☞(पान २ वर)

# दर्यापूर बाजार समितीतील कथित वक्तव्यावरून आज शिवसेनेचे आंदोलन

## संचालकाच्या वक्तव्याविरोधात पोलीस स्टेशनला निवेदन

खल्लार/प्रतिनिधीः-
दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील एका कथित वक्तव्यावरून आता राजकीय वातावरण तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बाजार समितीचे संचालक आशिफ खान यांनी दि. ३ जुलै रोजी शेतकरी व हमालांनी भगवा दुपट्टा घेऊन येऊ नये अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या प्रकरणी बाजार समितीकडे तक्रार करण्यात आली असतानाही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर दि. २७ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता दर्यापूर बाजार समिती येथे शिवसेनेतर्फे जाब विचार आंदोलन करण्यात येणार असल्याची सूचना पोलिसांना देण्यात आली आहे.

यासंदर्भात गोपाल पाटील अरबट यांनी दर्यापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांना लेखी निवेदन देऊन आंदोलनाची माहिती दिली आहे. संबंधित वक्तव्याबाबत चौकशी करून योग्य ती ☞(पान २ वर)

# दीक्षाभूमीच्या धर्तीवर सार्शीत प्रवेशद्वारासाठी ग्रामस्थांची ग्रामपंचायतवर धडक

### -रात्री उशिरापर्यंत ठिय्या
### -३१ ऑगस्ट रोजी तहसीलदारांच्या उपस्थितीत होणार बैठक

**तिवसा/प्रतिनिधीः-**
तिवसा तालुक्यातील सार्शी गाईची येथे ग्रामपंचायतीच्या विशेष सभेत अनुसूचित जाती वस्तीमध्ये दीक्षाभूमीच्या धर्तीवर प्रवेशद्वार उभारणीस मान्यता मिळण्यासाठी ग्रामस्थांनी दुपारपासून जोरदार ठिय्या आंदोलन छेडले. रात्री उशिरा पर्यंत यावर तोडगा न निघाल्याने प्रशासक व ग्रा. पं. पदाधिकाऱ्यांनी सभेतून ☞(पान २ वर)



■ गेट उभारण्याच्या ग्रामसभेचा विषय असून सर्व नियम व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हा विषय सोडविण्यात येईल तसेच या मागणीबाबत गावातील सर्व ग्रामस्थांच्या भावना व अडचणीही समजून घेणे आवश्यक आहे.सर्वांची सहमती आणि गावातील सामाजिक सलोखा टिकवून निर्णय घेणे, ही भूमिका महत्त्वाची आहे.
**-रीनाताई मंजू,** माजी सरपंच तथा प्रशासक.

# इर्विन रुग्णालयाच्या नाल्याची सफाई आणि रुंदीकरणाचा गंभीर मुद्दा

### आमदार प्रवीण पोटे मनपा आयुक्तांवर संतापले



**अमरावती/प्रतिनिधीः-** डफरिन रुग्णालयातील भीषण आगीच्या दुर्घटनेनंतर रुग्णालय परिसराची सुरक्षा आणि मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या घटनेची पाहणी करण्यासाठी गेलेल्या भाजप नेत्यांच्या शिष्टमंडळासमोर इर्विन रुग्णालयाच्या मागून जाणाऱ्या मुख्य नाल्याची सफाई आणि रुंदीकरण न झाल्याचा गंभीर मुद्दा समोर आला. याप्रकरणी आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी अमरावती महानगरपालिका आयुक्त ☞(पान २ वर)

# रोख रकमेसह ४ लाख ५० हजारांची महिलेची पर्स मिळाली परत

### -पोलिसांची समयसूचकता व एसटी कर्मचा-यांची सतर्कता



**मोर्शी/प्रतिनिधीः-**
मोर्शी पोलिसांची समयसूचकता व एसटी महामंडळाचे कर्मचारी यांच्या सतर्कतमुळे एका महिलेला रोख रकमेसह जवळपास ४ लाख ५० हजाराचा मुद्देमाल परत करण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार मोर्शी लगतच असलेल्या तळणी येथील वैशाली संजय तिडके या महिलेच्या पर्समध्ये रोख ५१ हजार रुपये,अँड्रॉइड मोबाईल, सोन्याचा गोफ,सोन्याचे डोरले मनी पोत असा एकूण ४ लाख ५० हजाराचा मुद्देमाल होता. सदर महिलेची पर्स तळणी फाट्यावरील ☞(पान २ वर)

# सीएस व सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

### जिल्हा महिला रुग्णालयातील बालकांचे मृत्यू प्रकरणः

**अमरावती/प्रतिनिधीः-**
जिल्हा महिला रुग्णालयात लागलेल्या आगीत ३ बालकांचा मृत्यू आणि ६ बालके गंभीर झाल्याची दुर्दैवी घटना आता राज्यभरात चर्चेत आली आहे. याप्रकरणी जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय अशा ३ वेगवेगळ्या समित्यांकडून चौकशी सुरू आहे. रुग्णालयातील या गंभीर निष्काळजीपणाप्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक (CS) आणि सार्वजनिक बांधकाम (B&C) विभागाच्या इलेक्ट्रिकल कार्यकारी अभियंत्यावर कारवाईची टांगती तलवार आहे. याशिवाय संबंधित व्हेंटिलेटर सप्लायर शिलर कंपनीलाही ब्लॅक लिस्ट (काळ्या यादीत) टाकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जिल्हा शल्यचिकित्सकांनी स्वतः दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात अशी दुर्घटना घडण्याची शक्यता त्यांनी आधीच वर्तवली होती आणि याबाबत B&C विभागाला पत्र पाठवून स्मरणपत्रही दिले होते. मात्र, अशी भीती असतानाही पर्यायी व्यवस्था ☞(पान २ वर)

**हिवाळी अधिवेशनात पडसाद उमटणार**

डिसेंबरमध्ये होणाऱ्या विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याचे संकेत मिळाले आहेत. इलेक्ट्रिकल त्रुटींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईसोबतच व्हेंटिलेटर पुरवणाऱ्या कंपनीवरही कारवाईची कुऱ्हाड कोसळू शकते. या कंपनीने राज्यभरात सुमारे १० हजार व्हेंटिलेटर पुरवले आहेत. एकट्या अमरावतीमध्येच दोनदा व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या कंपनीला राज्यभरात काळ्या यादीत टाकले जाण्याची जोरदार चर्चा आहे.

# डफरिन आगीतील पीडित कुटुंबीय आणि कर्मचाऱ्यांना भाजपकडून आर्थिक मदत

**अमरावती/प्रतिनिधीः-**
डफरिन रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता कक्षात लागलेल्या भीषण आगीत तीन बालकांचा मृत्यू झाला, तर अनेक बालके जखमी झाली. या दुर्दैवी घटनेनंतर भारतीय जनता पक्षाच्या वतीने पीडित कुटुंबीय आणि जीवाची पर्वा न करता बालकांचे प्राण वाचवणाऱ्या बचाव कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली.



भाजप नेत्यांनी या दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन यंदाचा दहीहंडी उत्सव रद्द केला आणि त्या उत्सवाचा खर्च पीडित कुटुंबांच्या मदतीसाठी वापरला. यानुसार मृत बालकांच्या नातेवाईकांना प्रत्येकी एक लाख रुपये तर गंभीर ☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये 'शुद्ध पाण्याचा' प्रश्न गंभीर

## १२६ शाळांपैकी केवळ ३१ शाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा

### ४६ शिक्षकांची पदे रिक्त

**युवराज डोंगरे /खल्लारः-**
दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, मूलभूत सुविधा आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची असताना दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील परिस्थिती प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. तालुक्यातील तब्बल १२६ जिल्हा परिषद शाळांपैकी केवळ ३१ शाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित शाळांमध्ये शहानूर पाणीपुरवठा योजनेद्वारे नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात असला, तरी विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळते का, हा गंभीर प्रश्न कायम आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सुमारे ४५०१ विद्यार्थी शिक्षण घेत असून ३५९ शिक्षक कार्यरत आहेत. मात्र तब्बल ४६ शिक्षकांची पदे रिक्त असल्याने शिक्षकांची कमतरता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम करणारी ठरत आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शासन विविध योजना आणि उपक्रम राबवित असल्याचे सातत्याने ☞(पान २ वर)

**■ ४६ शिक्षकांच्या रिक्त पदांचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम-**

एका बाजूला मूलभूत सुविधांचा प्रश्न, तर दुसऱ्या बाजूला शिक्षकांची कमतरता अशी दुहेरी कोंडी जिल्हा परिषद शाळांसमोर उभी आहे. ४६ शिक्षकांची पदे रिक्त असताना नविन पदभरतीचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नसल्याने उपलब्ध शिक्षकांवर अतिरिक्त शैक्षणिक जबाबदारी येत आहे. याचा थेट परिणाम अध्यापन, विद्यार्थ्यांकडे दिले जाणारे वैयक्तिक लक्ष आणि शैक्षणिक गुणवत्तेवर होण्याची शक्यता आहे.

**■ पाण्यासाठी योजना, पण प्रत्यक्षात प्रश्न कायम**

विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी डीपीटीसीच्या माध्यमातून तसेच ग्रामपंचायतीच्या आराखड्यानुसार वॉटर कुलर व शुद्ध पाण्याच्या योजनेसाठी शाळांच्या मुख्याध्यापकांनी ग्रामसचिवांकडे अर्ज केल्याची माहिती समोर येत आहे. अर्ज करूनही सुविधा प्रत्यक्षात कधी उपलब्ध होणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

# डफरिन आगीप्रकरणी आरोग्य आयुक्त काटकर यांच्याविरोधात शिवसेना उबाठाचे आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-**
जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या नवजात बालकांच्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने डफरिन परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली. राज्यस्तरीय चौकशी समितीचे प्रमुख तथा आरोग्य आयुक्त संजय काटकर हे रुग्णालयात येणार असल्याने शिवसेना नेत्या सुषमा अंधारे, आमदार नितीन बापू देशमुख आणि आमदार गजानन लवटे यांच्यासह ☞(पान २ वर)